


राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

## कोरेगांव पार्क : सोशल मिडीयावरील मैत्री पडली महागात

# तरुणींवर सामुहिक बलात्कार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लहान मुली, शालेय, महाविद्यालयीन तरुणींवर वाढत्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांमुळे पोलिसांकडून शाळा, महाविद्यालयातून 'गुड टच, बॅड टच' कार्यक्रम घेतले जातात. अशाच एका कार्यक्रमातून तरुणीवर चौघांनी लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे. कोरेगाव पार्क पोलिसांनी याप्रकरणी पोक्सो अंतर्गत बलात्काराचा गुन्हा दाखल केला असून दोघा जणांना अटक केली तर, दोघा अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

ओम आदेश घोलप (वय २०) आणि स्वप्निल विकास देवकर (वय २२) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

तर दोघा अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

याबाबत पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी सांगितले की, कोरेगाव पार्क पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस अधिकारी एका महाविद्यालयात 'गुड टच, बॅड टच' संदर्भातील कार्यक्रमाला गेल्या होत्या. त्यावेळी एक तरुणीने तणावाखाली होती. ती कॉन्सिलरकडे गेली. त्यावेळी बोलताना या तरुणीने माझी एक मैत्रिण कायम तणावाखाली असून तिच्याबाबत काही गैर प्रकार झाल्याचा संशय आहे, असे सांगितले.

त्यानंतर या कॉन्सिलरने महाविद्यालयांच्या ट्रस्टींना याबाबत माहिती दिली. त्यांनी कोरेगाव पार्क पोलिसांशी २४ सप्टेबर रोजी रात्री संपर्क साधून माहिती दिली. त्यानंतर संबंधित तरुणीला आई वडिलांसह बोलविण्यात आले. तिचा इन्स्टाग्रामवरून चौघांशी संपर्क झाला होता.

त्यांच्याशी वेगवेगळ्या वेळी शारीरीक संबंध आल्याचे तिने सांगितले. ही तरुणी अल्पवयीन असल्याने पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल » पान ७ वर

### तीन वर्षीय चिमुरडीवर अत्याचार

● शिक्रापूर ता. शिरुर येथे चक्क तीन वर्षीय चिमुरडीवर एका अल्पवयीन युवकाने अत्याचार केल्याची खळबळजनक घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे चौदा वर्षीय युवकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्रापूर ता. शिरुर येथील पिडीत तीन वर्षीय चिमुरडीची आई बाहेर गेलेली असताना घरात आलेल्या चौदा वर्षीय अल्पवयीन युवकाने चिमुरडी घरात एकटी खेळत असल्याचा गैरफायदा घेत तिच्यावर अत्याचार केला, दरम्यान चिमुरडीची आई घरात येताच सदर युवक पळून जाऊ लागला, याबाबत पिडीत बालिकेच्या आईने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी चौदा वर्षीय अल्पवयीन युवकावर बाल लैंगिक अत्याचार सह बलात्कार प्रकरणी गुन्हा दाखल करत त्याला तातडीने ताब्यात घेतले असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहिणी सोनावले व पोलीस नाईक उमेश जायपत्रे करत आहे.

# काँग्रेसमध्ये पुन्हा वादाची शक्यता ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दीड वर्षांपूर्वी झालेल्या कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी विजय मिळवला. त्यांच्या विजयासाठी काँग्रेसमधील गटातटाचे वाद विसरून सर्व नेत्यांनी एकत्रित काम केलं. तसेच महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे देखील त्यांना साथ मिळाली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत देखील काँग्रेसने रवींद्र धंगेकर यांनाच पसंती देत उमेदवारी दिली. मात्र हीच गोष्ट आता काँग्रेसमधील एका गटाला पसंती पडत नसल्याच दिसत आहे. एकाच व्यक्तीला किती पदे दिली जाणार? असा प्रश्न विचारला जात आहे. त्यामुळे कसबा विधानसभेसाठी धंगेकर यांच्या उमेदवारीला विरोध होताना दिसत आहे. राज्यात काही दिवसांवर विधानसभा निवडणुक येऊन ठेपली आहे.




त्यादृष्टीने राज्याच्या राजकीय वातावरणात वेगाने राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत. यातच इच्छूक तसेच विरोधकांकडून वेगवेगळ्या पद्धतीने शक्तीप्रदर्शन केले जात आहे. यातच कसब्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांच्या कार्यकर्त्यांकडून मतदारसंघात पोस्टर्स आणि व्हिडीओच्या माध्यमातून प्रचार सुरू केलाय. यातच एका बॅनर्सची चर्चा सध्या सुरू आहे. "आमचं ठरलंय! कसबे दंगेकर, ना भाई, ना ताई" अशा आशयाचे बॅनर्स कसबा मतदारसंघात झळकले आहेत. काँग्रेसमधीलच एका गटाला या पोस्टच्या माध्यमातून टार्गेट केलं जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. » पान ७ वर

### खा. संजय राऊत यांची अटक टळली!

**मुंबई :** भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यात दोषी ठरवलेले शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांना मुंबईतील न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. १५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर हा जामीन मंजूर करण्यात आला. न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) आरती कुलकर्णी यांनी संजय राऊत यांना १५ दिवसांच्या साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.

### छगन भुजबळ रुग्णालयात दाखल

**मुंबई:** राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना अस्वस्थ वाटू लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. छगन भुजबळ काल पुण्यात आले होते. अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना विशेष विमानाने मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

### ऑनलाइन बैठकीत चंद्रकांत दादांचे संकेत !

# मोदींच्या सभेसाठी आता २९ किंवा ५ ऑक्टोबरचा मुहूर्त ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुसळधार पावसामुळे सभास्थानी झालेला चिखल आणि आज गुरुवारी जाहीर झालेल्या रेड अलर्टमुळे पुन्हा पावसाची शक्यता यामुळे मेट्रो भूमिपूजन आणि उद्घाटन तसेच नरेंद्र मोदी यांच्या सभेचा रद्द झालेला कार्यक्रम पुन्हा लवकरच होण्याची शक्यता आहे परंतु हा कार्यक्रम आता ऑनलाईन पद्धतीने होऊन मेट्रो चे उद्घाटन होईल. नरेंद्र मोदी यांच्याच हस्ते या मेट्रोच्या कामाचे उद्घाटन करण्याचा निर्णय पक्षाने घेतला असून त्यासाठी आता कदाचित दोन दिवसानंतर 29 तारखेचा मुहूर्त किंवा ५ ऑक्टोबर चा मुहूर्त निश्चित करण्यात येणार आहे. भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी समन्वय साधत कार्यकर्त्यांचे मनोबल वाढण्यासाठी आज ऑनलाईन बैठकीचे नियोजन केले होते देशभरातील काही उद्घाटने नरेंद्र मोदी हे ऑनलाईन पद्धतीने करणार आहेत त्यातच पुण्याच्या मेट्रोचे उद्घाटन देखील होईल. 29 तारखेला हा कार्यक्रम घ्यावा आणि राज्यभरातील भाजप कार्यकर्ते त्या ऑनलाइन कार्यक्रमात सहभागी करून घ्यावेत असे नियोजन सुरू आहे.

» ऑनलाईन

अन्यथा पाच ऑक्टोबर रोजी मुंबईतील काही उद्घाटने होणार असून त्याला जोडूनच नरेंद्र मोदी यांचा कार्यक्रम घेण्यात यावा आणि पुन्हा एकदा अशाच मोठ्या कार्यक्रमाचे नियोजन करावे , अशीही चर्चा आज झालेल्या भाजपाच्या ऑनलाईन मीटिंगमध्ये झाली. गेल्या दहा दिवसापासून » पान ७ वर

### 'तो' अभियंता पोलीसांच्या ताब्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एका अभियंत्याने पिंपरी चिंचवड पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला फोन केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवाला धोका असून त्यांना वाचवा, असे त्या व्यक्तीने सांगितले. या फोनमुळे राज्य पोलीस दलात एकच खळबळ उडाली. त्यानंतर पिंपरी चिंचवड पोलिसांनी काही कालावधीतच संबंधित तरुणाला ताब्यात घेतले. सध्या तरुणाकडे चौकशी करण्याचे काम सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा गुरुवारी (दि. 26) पुणे दौरा नियोजित होता.

मेट्रोसह एकूण 12 प्रकल्पांचे 22 हजार 600 कोटींच्या कामाचे लोकार्पण व भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार होते. मात्र, पुणे शहर परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे मोदी यांचा आजचा दौरा » पान ७ वर

# विधानसभा निवडणुका महायुतीतून लढणार !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आम्ही येणाऱ्या विधानसभा निवडणुका महायुतीतून लढणार आहोत, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात सांगितले. विधानसभा जागांच्या बाबत तालुकास्तरावर पेच सुटलेला नाही. परंतु, गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत झालेल्या बैठकीत एकत्र बसून त्यातून चार गोष्टी समजून सांगून मार्ग काढण्याचे ठरले आहे.'कार्यकर्त्यांना वाटते ते बोलून दाखवतात. लोकशाहीमध्ये सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे. वरिष्ठ पातळीवर बसून आम्ही निर्णय घेऊ,' असेही पवार म्हणाले.



पुण्यात असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर होत असलेल्या सभास्थळाची उपमुख्यमंत्री पवार यांन पाहणी केल्यावर झालेल्या पत्रकार परिषदेत पवार बोलत होते.

विधानसभेला महायुतीतून बाहेर पडणार का? या प्रश्नावर पवार म्हणाले, आम्ही येणाऱ्या विधानसभा निवडणुका महायुतीतून लढणार आहोत. समोरचे महाविकास आघाडीकडून लढतील आणि आणखी एक तिसरी आघाडी झालेली आहे. चौथी आघाडीचे ही काही उमेदवार आपआपले उमेदवार उभे करणार आहेत, अशी वेगवेळ्या उमेदवारांची संख्या मोठ्या प्रमाणात यावेळी विधानसभेला बघायला मिळेल. आम्ही महायुतीचा घटक पक्ष म्हणून लढणार आहोत. आम्ही व्यवस्थित महायुतीमधील एकमेकांचा मानसन्मान राखून जागा वाटप करू. सकारात्मक सगळ्या चर्चा चाललेल्या आहेत. समाविष्ट गावांमधील मालमत्ता कराच्या प्रश्नावर पवार म्हणाले, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री » पान ७ वर

# महालक्ष्मीची मर्डर मिस्ट्री; तब्बल ५९ केले तुकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरु :** बंगळुरु या ठिकाणी श्रद्धा



वालकर प्रकरणाची पुनरावृत्ती झाल्याचं पाहण्यास मिळाले. २१ सप्टेंबरला एका घरातून प्रचंड प्रमाणात दुर्गंधी येऊ लागली. ज्यानंतर शेजाऱ्यांनी या

### श्रद्धा वालकर प्रकरणाची पुनरावृत्ती

घरात राहणाऱ्या महालक्ष्मीच्या आई आणि बहिणीला ही माहिती दिली. त्यांनी घरी येऊन पाहिले तेव्हा त्या घरात सगळीकडे किडे झाले होते. तसेच फ्रिजमध्ये महालक्ष्मीच्या मृतदेहाचे तुकडे होते. या प्रकरणाला एक नवे वळण लागले आहे.

कारण संशयित आरोपीचा मृतदेह पोलिसांना आढळला आहे. तसंच या मृतदेहाबरोबर जी सुसाइड नोट आढळली त्यात गुन्ह्याची कबुली देण्यात आली आहे. » पान ७ वर

### सुसाईड नोटमध्ये आहे?

● "मला महालक्ष्मी खूप आवडत होती. माझं तिच्यावर खूप प्रेम होतं. मात्र ती माझ्याशी अजिबात नीट वागत नव्हती. महालक्ष्मी मला अपहरणाच्या प्रकरणात अडकवू पाहात होती. मी तिच्यासाठी खूप पैसे खर्च केले. मात्र तिला माझी कदर नव्हती. त्यामुळे मी तिची हत्या केली." असं मुक्तीरंजनने त्याच्या सुसाईड नोटमध्ये लिहिलं आहे.

### राज्यातील धरणांत ८६ टक्के साठा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्यात मुसळधार पावसामुळे एकीकडे शेती पिकांचे नुकसान होत असून धरणांमधीलपाणीसाठ्यात मात्र, झपाट्याने वाढ होत आहे. राज्यात आतापर्यंत सर्व विभागांत मिळून ८६ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या वर्षी याच तारखेला धरणांमध्ये ७० टक्के पाणीसाठा होता. यंदा सर्वाधिक ९४ टक्के पाणीसाठा कोकण विभागात जमा झाला असून दुष्काळी मराठवाड्यातही ७३ टक्के पाणीसाठा आहे. दरम्यान, राज्यामध्ये सप्टेंबरच्या पावसाने सरासरी ओलांडली असून आतापर्यंत १०३ टक्के पावसाची नोंद कृषी विभागाकडून करण्यात आली आहे. पुण्यातील खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणे मिळून ९९.३१ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे.

# धर्मा-धर्मात भिडवणे काँग्रेसची पॉलीसी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर :** काँग्रेसने स्वामीनाथन आयोग आणला पण शिफारस मान्य केली नाही. मग मोदी आले पण त्यांनी देश खड्यात घातला. आम्ही सतरंजी उचलणारे आहोत, पण ज्यांच्यासाठी सतंजरी टाकल्या त्यांचे वाटोळे केल्या शिवाय हा कार्यकर्ता राहणार नाही. धर्मा-धर्मात भिडवणे ही यांची पॉलीसी आहे. बाप मेला तरी चालेल पण नेता जीवंत राहिला पाहिजे. एका कलेक्टरवर साडेसात लाख खर्च होतात आणि तो कार्यालयातून उठत नाहीत. मी मोठा नेता आहे असे नाही. काँग्रेसवाल्यांचे कोथळे काढण्यासाठी ही सभा आहे. ज्या गडावर भेटतील त्या गडावर मारू", असे म्हणत आमदार » पान ७ वर

### कर्नाटक सरकार निर्णय ; सीबीआयला तपास

# राज्य सरकारची परवानगी हवी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरु :** कर्नाटक सरकारने आज मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने सीबीआयला राज्यातील तपासासाठी दिलेली परवानगी मागे घेतली आहे. म्हणजेच आता सीबीआयला कर्नाटकात कोणताही तपास करायचा असेल तर आधी राज्य सरकारची परवानगी घ्यावी लागेल. त्यानंतरच सीबीआयला तपास प्रक्रियेत सुरु करावी लागेल. गुरुवारी कर्नाटक मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला. या निर्णयानंतर सीबीआय राज्य सरकारच्या » पान ७ वर

# पुजा खेडकरांना दिलासा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बडतर्फ प्रशिणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या अटकेपासूनचे अंतरिम संरक्षण उच्च न्यायालयाने ४ ऑक्टोबर 2024 पर्यंत वाढवले आहे. खेडकरांच्या वकिलांनी तपशीलवार म्हणणे मांडण्यासाठी वेळ मागितल्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाला स्थगिती दिली. दिल्ली पोलिसांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, या प्रकरणी तपासात मोठे कट समोर येत आहे. खेडकर यांच्यावर चुकीच्या » पान ७ वर




### पहिल्या टप्यात ९० आगारांत 'एलएनजी'चे पंप बांधण्यात येणार

# आता पहिल्यादांच एसटी 'एलएनजी'वर धावणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डिझेलवर राज्य परिवहन महामंडळाचा दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च होतो. त्यामुळे एसटी प्रशासनाने मागील काही वर्षात ई-बससह, सीएनजीवर गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार काही बस सीएनजीवर, तर काही ई-बस धावत आहेत. आता पहिल्यादांच एसटी 'एलएनजी'वर धावणार आहे.

राज्य परिवहन महामंडळाचा प्रवास आता 'एलएनजी'वर होणार आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या पाच हजार डिझेल बसेसचे द्रवरूप नैसर्गिक वायू (एलएनजी) या पर्यायी इंधनावर चालणाऱ्या वाहनामध्ये रूपांतर करण्यासाठी कतार येथील किंग ११ गॅस कंपनीसोबत करार झाला. इंदापूर आगारात पहिला 'एलएनजी' पंप बांधण्यात येणार आहे. हा विभागातला पहिला पंप असेल. मात्र, यासाठी आणखी काही महिने




### सहा महिने लागणार

राज्यातील विविध आगारांत 'एलएनजी'चे ९० पंप बांधले जाणार आहेत. हा टप्पा पूर्ण झाल्यावर सहा टप्यांत डिझेल एसटीचे 'एलएनजी'मध्ये रूपांतर केले जाईल. यामुळे एसटीच्या खर्चात बचत होणार आहे. इंदापुरात एलएनजीवर एसटी धावण्यास किमान सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

वाट पहावी लागणार आहे.

पहिल्या टप्यात राज्यातील ९० आगारांत 'एलएनजी'चे पंप बांधण्यात येणार आहेत. यात पुणे विभागातील इंदापूर आगाराचा समावेश आहे. येत्या दोन महिन्यांत पंपाची निर्मिती होईल. त्यानंतर 'एलएनजी'मध्ये रूपांतर झालेल्या एसटीपैकी सुमारे ६० एसटी बस पुणे विभागात धावणार आहेत. यामुळे इंधनावर होणाऱ्या खर्चात बचत होईल. एका डिझेल बसचा 'एलएनजी'मध्ये रूपांतरित करण्याचा खर्च सुमारे १९ लाख इतका आहे. हा खर्च राज्य सरकार स्वतः » पान ७ वर

## पुण्यातून जाणाऱ्या ८० टक्के गाड्या 'वेटिंग'वर

# सणासुदीच्या तोंडावर रेल्वे बुकिंग फुल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नोकरदार, व्यावसायिक व सुटीमुळे गावी जाण्याचे प्रवाशांचे नियोजन कोलमडत आहेत. रेल्वे गाड्यांना आरक्षण मिळत नसल्याने प्रवासी नाराज होत आहेत. दिवाळीच्या दोन महिने आधीच रेल्वे फुल असल्याने रेल्वे प्रवासी हतबल झाले आहेत. यामुळे दिवाळीला लांब पल्ल्याच्या गावी कशाने जायचे, असा प्रश्न पडत आहे. सणासुदीच्या काळात गावी जाण्याची प्रत्येकाला ओढ असते. ऐनवेळी अडचणी येऊ नयेत यासाठी प्रवासी आगाऊ रेल्वे तिकीट बुक करून ठेवतात. त्यात रेल्वेच्या गाड्या या १२० दिवस आधी बुकिंग करण्याची सुविधा आहे. त्यामुळे पुण्यातून जाणाऱ्या जवळपास ८० टक्के गाड्या सध्या 'वेटिंग'वर आहेत. त्यामुळे आयत्या वेळी जाणाऱ्या प्रवाशांना आता दुसरा पर्याय शोधण्याची वेळ आली आहे.

दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण आहे. त्यामुळे गावी जाऊन सण साजरा करणाऱ्यांचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे या काळात एसटी, खासगी गाड्या या 'फुल्ल' असतात. त्यामुळे प्रवासी रेल्वेचे तिकीट आगाऊ बुक करून ठेवतात. पुण्यातून जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या नागपूर, गोरखपूर, दानापूर, झेलम, आझाद हिंद एक्स्प्रेस व इतर प्रमुख गाड्यांना आतापासूनच वेटिंग सुरू झाले आहे. परिणामी, प्रवासात कोणत्याही प्रकारचा त्रास नको असेल, तर आताच इतर पर्याय शोधणे किंवा तिकीट बुक करून ठेवणे हे फायद्याचे ठरेल.

### प्रमुख गाड्या

पुण्यातून बाहेरील राज्यात जाणाऱ्या प्रमुख गाड्या

- पुणे-दानापूर,
- पुणे-हावडा,
- पुणे-झेलम,
- पुणे-मंडूवाडी,
- पुणे-दरभंगा,
- पुणे-गोरखपूर,
- पुणे-लखनौ,
- पुणे-निझामुद्दीन.

तर, मुंबईहून पुणेमार्गे दक्षिणेकडे जाणाऱ्या

- मुंबई-चेन्नई
- मुंबई-भुवनेश्वर
- मुंबई-हैदराबाद
- मुंबई-बंगळुरू

या गाड्यांनासुद्धा सध्या ७० ते ९० पर्यंत वेटिंग आहे.

### वेटिंगवर असणाऱ्या गाड्यांची माहिती...

- पुणे-दानापूर - १२०
- पुणे-गोरखपूर - १४५
- पुणे-हावडा - २०५
- पुणे-जम्मू तावी - १०८
- पुणे-कन्याकुमारी -४०
- पुणे-हैदराबाद - १०२
- पुणे - नागपूर - २४०

> दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पुण्यातून पर्याय म्हणून रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांच्या सोयीसाठी जादा गाड्यांचे नियोजन केले आहे. यातूनही गाड्या वेटिंग असतील, तर आणखी जादा गाड्या सोडण्याचे नियोजन सुरू आहे.
>
> — डॉ.मिलिंद हिरवे, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक.

## 'गीत-भीमायन पुष्पांजली'चे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनाच्या विचारांनी प्रेरित होऊन काव्य आणि गायनातून प्रसार करण्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या शांताबाई राजानंद गडपायले यांना अभिवादन करण्यासाठी 'गीत-भीमायन पुष्पांजली' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.शनिवार, दि.२८ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. आंबेडकर पुतळा प्रांगणात हा कार्यक्रम होणार आहे. पुणे आणि परिसरातील गायक, कवी, कलाकार, जलसाकार, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते वसंतराव साळवे, जांबुवंत मनोहर आणि नागेश भोसले यांनी ही माहिती पत्रकाद्वारे दिली. शांताबाई राजानंद गडपायले यांचे नुकतेच पुण्यात वृद्धापकाळाने निधन झाले. त्यानंतर या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रसंचार सामाजिक रा

## अडीच हजार झोपडीधारकांचे होणार पुनर्वसन

### प्राधिकरणाकडून निविदांची मागणी

**पुणे :** पाटील इस्टेट येथे सुमारे साडेचार एकर जागेवर झोपडपट्टी आहे. ही जागा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मालकीची आहे. या जागेवर २०१६ च्या सर्वेक्षणानुसार एक हजार १४० तर सद्यस्थितीमध्ये सुमारे दोन हजार झोपड्या आहेत. तर लक्ष्मीनगर झोपडपट्टीची जागा सुमारे दोन एकर असून तेथे ४५० झोपड्या आहेत. ही जागा म्हाडाची आहे. पहिल्या टप्प्यात या दोन्ही जागांवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्याकरिता प्राधिकरणाकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

### झोपडपट्ट्याबाबत महत्वाची माहिती :

- पुणे शहरातील झोपडपट्ट्यांची संख्या - **४८६**
- पिंपरी-चिंचवडमधील झोपडपट्ट्यांची संख्या - **७१**
- दोन्ही शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांची संख्या - **१० लाखांहून अधिक**
- गेल्या पंधरा वर्षांत केवळ आठ हजार ३४३ झोपडीधारकांचे पुनर्वसन
- झोपडीधारकांची संख्या विचारात घेतल्यानंतर अवघ्या चार टक्के झोपडीधारकांचे आतापर्यंत पुनर्वसन

> झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांसाठीच्या सुधारित नियमावलीत टेंडर मागवून पुनर्वसन करण्याचे अधिकार प्राधिकरणाला आहेत. त्या तरतुदीचा वापर करून पुणे शहरातील दोन जागांवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यासाठी प्रथमच टेंडर मागविण्यात आले आहेत.
>
> — नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, एसआरए

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देण्यासाठी आता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (एसआरए) एक पाऊल पुढे टाकले आहे. शहरातील दोन शासकीय जागांवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यासाठी टेंडर प्रक्रिया सुरू केली आहे. अशा प्रकारे प्रथमच प्राधिकरणाकडून स्वत:हून पुढाकार घेत पुनर्वसन योजना राबविण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.

या तरतुदीचा प्रथमच वापर करीत प्राधिकरणाने पुणे शहरातील पाटील इस्टेट आणि लक्ष्मीनगर अशा दोन झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यासाठी निविदा मागविल्या आहेत. या निविदा 'डीबीओटी' (डिझाईन, बिल्ट, ऑपरेट आणि ट्रान्सफर) तत्त्वावर मागविल्या आहेत, असे प्राधिकरणाकडून सांगण्यात आले.

## फाईव्ह-जी'मुळे शहरातील सर्व अनधिकृत टॉवर शुल्क भरून अधिकृत होणार ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** फाईव्ह-जी'मुळे शहरात कुठेही मोबाईल टॉवर उभारण्याचे धोरण ठरविण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असलेली ही यंत्रणा (डिव्हाईस) कोठेही बसविता येऊ शकते. त्यामुळे इमारतींसह, वस्त्यांमधील घरांवर, पथदिव्यांच्या खांबांवर, उद्यानात, मोकळ्या जागेत हे टॉवर उभारता येणार आहेत. यासह यापूर्वीचे सर्व अनधिकृत टॉवर शुल्क भरून अधिकृत होणार असल्याची माहिती महापालिकेतील अधिकृत सूत्रांनी दिली.

शहरात 'फाईव्ह-जी' सेवा सुरू होऊन दोन वर्ष होत आहेत. शहरातील ६० टक्के मोबाईल टॉवर अनधिकृत आहेत. यामध्ये रिलायन्स कंपनीच्या जिओ टॉवरची संख्या अधिक आहे. हे मोबाईल टॉवर खासगी जागेसह, मोकळ्या जागेत, इमारतींवर आणि उपनगरात वस्त्यांमधील घरांवरही उभारले आहेत. शहर व उपनगरांतील इमारतींवर पाण्याच्या टाक्यांवर हे मोबाईल टॉवर उभारले आहेत.



### नेमकी समस्या काय आहे?

- शहरातील विविध मोबाईल टॉवर्सच्या गर्दीत अनेक वेळा नेटवर्क बंद होत असल्याच्या तक्रारी अनेकांनी केल्या आहेत. कॉल ड्रॉप होणे, संवादात व्यत्यय येणे, वाय-फाय बंद झाल्यामुळे टीव्ही बंद होणे अशा तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. पालिकेच्या वस्त्यांमध्ये इमारतींवर पाण्याच्या टाक्यांमध्ये मोबाईल टॉवर बसवले आहेत. वस्त्यांमध्ये अशा इमारती बांधताना पालिकेची परवानगी घेतली जात नाही. त्यामुळे अशा इमारतींच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा प्रश्नच उद्भवत नाही. अशा इमारतींवरील मोबाईल टॉवर कोसळल्यास जीवितहानी होऊ शकते. मात्र, मोबाईल कंपन्या आणि जागामालक परस्पर व्यवहार करीत असून याचा थांगपत्ता महापालिकेला नसतो.


यावर महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाने कारवाई केली नाही. शहरातील अनेक वस्त्यांमध्ये ७/१२ चा उतारा नसल्यामुळे मोबाईल कंपन्यांना टॉवर उभारण्याची परवानगी महापालिका बांधकाम विभाग देत नव्हते. त्यामुळे विविध मोबाईल कंपन्यांनी चक्क वस्त्यांमधील इमारतींवर, पाण्याच्या टाक्यांवर मोबाईल टॉवर उभारले आहेत. टॉवर उभारल्यानंतर मोबाईल कंपन्या महापालिकेकडे परवानगीसाठी प्रस्ताव देतात. शहरातील मोबाईल कंपन्यांचे ६० टक्के टॉवर अनधिकृत असून त्यांना महापालिकेने परवानगीच दिली नसल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे.

### परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या संपामुळे कोटींचे नुकसान

## वाहतूकदारांसह सर्वसामान्य वाहन चालकांना फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील ५५ आरटीओ कार्यालयात आरटीओमधील कर्मचारी क्लार्क विभागाने संप पुकारून कामकाज पूर्णतः बंद केले आहे. राज्यातील वाहतूकदारांच्या वाहनांचे वाहन पासिंग, परवाना नुतनीकरण, बँक बोजा, वाहन ट्रान्सफर, वेगवेगळ्या प्रकारच्या ना हरकत अशी कामे रखडल्यामुळे राज्यातील वाहतूकदारांना रोज पाच कोटीचे नुकसान होत आहे. तसेच अनेक खाजगी वाहन चालकांनाही याचा त्रास होत आहे. ठप्प असलेले काम संपामुळे अजून काही दिवस लांबल्यास देशाचा कणा असलेल्या या वाहतूक क्षेत्राचे नुकसान प्रचंड प्रमाणात होणार आहे.



यासह परिवहन विभागाच्या रोज ३० ते ४० कोटी रुपयांच्या महसूलवर परिणाम होत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता राज्य सरकारने त्वरित या संपाबाबत विचार करून संप तडजोड करून मिटवण्याबाबत पुढाकार घ्यावा असे मी राज्याचा माल व प्रवासी वाहतूक संघटनेच्या अध्यक्ष या नात्याने सदस्याच्या वतीने विनंती करीत आहे, असे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष बाबा शिंदे यांनी सांगितले.

### ससून अधीक्षकांची नियुक्ती आता शासन स्तरावरून

## रुग्णालयातील गोंधळाला लगाम ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपल्या मर्जीतील वैद्यकीय अधीक्षक नेमण्याची परंपरा ससूनमध्ये खूप वर्षांपासून कायम आहे. मात्र, गेल्या वर्षीपासून अधीक्षकपदाची संगीतखुर्ची सुरू झाली. अधिष्ठात्यांनी अधिकार हातात आहेत म्हणून अधीक्षक बदलण्यास सुरुवात केली. यामुळे वारंवार अधीक्षक बदलण्याचे प्रकार सुरू झाले. ससूनमधील गोंधळामुळे हा निर्णय घेतला जाणार असून, तो राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना लागू होईल.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अधीक्षकांच्या नियुक्तीचे अधिष्ठात्यांना असलेले अधिकार काढून घेण्यात येणार आहेत. अधीक्षकांची नियुक्ती शासन स्तरावरून केली जाणार आहे. यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांत आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयात झालेल्या गैरप्रकारांमुळे हा निर्णय घेतला जाणार असल्याचे समजते.

राज्यात २५ वैद्यकीय महाविद्यालये असून, त्यात अधीक्षक हे पद अतिशय महत्त्वाचे असते. वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर असते. वैद्यकीय शिक्षण विभागाने नुकतेच सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना पत्र पाठवून विद्यमान अधीक्षकांची माहिती मागविली आहे. त्यामुळे अधीक्षक नियुक्तीचा अधिकार अधिष्ठात्यांना नसेल.

## आता लाडक्या बहिणींना वेध तिसऱ्या हफ्त्याचे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी करणाऱ्या महिलांची संख्या ४ लाखांवर पोहोचली आहे. ही योजना चांगलीच पसंतीस उतरली असून प्रतिसादही चांगला मिळत आहे. यापूर्वी दोन हफ्ते मिळाल्यानंतर आता लाडक्या बहिणींना तिसऱ्या हफ्त्याची प्रतीक्षा लागली आहे.

यापूर्वी १५ ते २८ ऑगस्टदरम्यान जिल्ह्यात तीन टप्प्यांत या अनुदानाचे वितरण झाले होते. सप्टेंबर महिना संपत असल्याने आता तिसऱ्या महिन्याच्या अनुदानाकडे लाडक्या बहिणींचे लक्ष लागले आहे. राज्य शासनाने जून महिन्यात राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू केली आहे. या योजनेंतर्गत दरमहा पात्र महिलेला १ हजार ५०० रुपये अनुदान दिले जात आहे. योजनेतील काही अटी कमी करत शासनाने ही योजना सुलभ करण्याचा प्रयत्न केला. योजनेसाठी नोंदणी करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. आता मात्र लाडक्या बहिणींना तिसऱ्या हफ्त्याच्या अनुदानाचे वेध लागले आहेत. दरम्यान, आजही अनेक महिलांची अर्ज करण्यासाठी धावाधाव सुरु आहे.

## कोद्रे आणि गुजर यांना पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचा जीवन गौरव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सहकार व बँकिंग क्षेत्रात बहुमूल्य योगदान दिल्याबद्दल पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. (महाराष्ट्र) तर्फे सन २०२२-२३ वर्षासाठी पुणे कँन्टोमेंट बँकेचे अध्यक्ष कैलास कोद्रे आणि सन २०२३-२४ वर्षासाठी प्रेरणा सहकारी बँक थेरगावचे संस्थापक संचालक तुकाराम उर्फ भाऊसाहेब गुजर यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता शिवदर्शन येथील राजीव गांधी ॲकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल येथे हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.सुभाष मोहिते यांनी पत्रकार परिषदेत दिली. उपाध्यक्ष ॲड.साहेबराव टकले, सुनिल रुकारी, निलेश ढमढेरे, डॉ. प्रिया महिंद्रे, बाळकृष्ण उंद्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत शेळके आदी उपस्थित होते.





Selected

## खडकी शिक्षण संस्थेत केस्त्रो अॅस्ट्रॉनॉमी लॅबचे उद्घाटन



**खडकी :** विर्द्यार्थाना वैज्ञानिक विषयांत रुची निर्माण करुन नवीन करिअर संधी निर्माण व्हाव्यात यासाठी हेंकेल अनेक ऑस्ट्रानॅमी लॅब उभारत असुन विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे, असे उद्गार हेंकेल सी एस आर प्रमुख रमित महाजन यांनी काढले. खडकी शिक्षण संस्थेच्या वतीने नव्याने स्थापित केलेल्या केस्त्रो ॲस्ट्रॅानॉमी लॅबच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत वाघ, खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, रिजनल मॅनेजर भूपेश सिंग, सचिव आनंद छाजेड, लायन्स क्लब पुणे सहकारनगर अध्यक्ष श्रद्धा हाते, प्राचार्य व सहसचिव डॉ. संजय चाकणे, संचालक अजय सूर्यवंशी, रमेश अवस्थे आदी उपस्थित होते. केस्त्रो लॅबच्या माध्यमातून ज्ञानोपासना वाढीस लागणार असून सामाजिक उन्नतीच्या दृष्टीने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याचे मत फर्ग्युसन महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. वसंत वाघ यांनी व्यक्त केले.

## ४०० पेक्षा अधिक दिव्यांगांना मोफत शिबिराचा लाभ



**पुणे :** भारतातील स्वयंचलित वाहनांच्या सुट्या भागांचे अग्रगण्य उत्पादक असलेल्या टाटा ऑटोकॉम्प सिस्टीम्स समूहाने आपल्या सीएसआर उपक्रमांतर्गत पुण्यात सात दिवसीय कृत्रिम अवयव फिटमेंट शिबिराचे आयोजन केले. त्याचे उद्घाटन टाटा ऑटोकॉम्प सिस्टीम्स लिमिटेडचे अध्यक्ष अरविंद गोयल, पिनॅकल इंडस्ट्रीजचे अध्यक्ष अरिहंत मेहता आणि संचालिका रितिका मेहता आणि इनर व्हील क्लब ऑफ खडकी, डिस्ट्रिक्ट ३१३ च्या अध्यक्षा डॉ. सुनीती गोयल याच्या हस्ते करण्यात आले. पुणे आणि पंचक्रोशीतील ४०० पेक्षा अधिक दिव्यांगांना या शिबिराचा लाभ होणार आहे. शिबिराला दिनांक २४ सप्टेंबर रोजी प्रारंभ झाला असून, २९ सप्टेंबर पर्यंत आयोजित केले आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळ या पुण्यातील दोन प्रतिष्ठित संस्थांचेही सहकार्य या शिबिराला लाभले आहे. हे शिबिर सर्वांसाठी खुले असून, लाभार्थ्यांना मदतीसाठी शिबिराच्या ठिकाणी नाव नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

## सूर्यदत्तच्या विद्यार्थ्यांना शेअर बाजार कामकाजाचे प्रशिक्षण

**बावधन :** सूर्यदत्त एजुकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शेअर बाजाराच्या (नॅशनल स्टॉक एक्स्चेंज-एनएसई) बांद्रा (मुंबई) येथील कार्यालयास भेट दिली. शेअर बाजाराचे काम नेमके कसे चालते, हे जाणून घेण्याचा या भेटीचा उद्देश होता. प्रा. प्रल्हाद जोशी, डॉ. रागिणी भट, प्रा. सुनील धनगर आणि प्रा. ज्योती गायकवाड यांच्यासह 'एमबीए'च्या ३५ आणि 'पीजीडीएम'च्या ३५ विद्यार्थ्यांनी या अभ्यास दौऱ्यात सहभाग नोंदवला. येथील अधिकाऱ्यांशी भेटून शेअर बाजाराविषयी माहिती घेतली. 'एनएसई'चे अधिकारी श्रीमती जिता आणि पूर्व शहा यांनी विद्यार्थ्यांना शेअर बाजाराविषयी माहिती देताना एसआयपी, पोर्टफोलियो मॅनेजमेंट, गुंतवणूक, मिड कॅप आणि लार्ज कॅप शेअर याविषयी मार्गदर्शन केले, अशी माहिती सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया यांनी दिली.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी सप्ताहाचे शरद पवार यांच्या हस्ते उदघाटन

**बावधन :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलातर्फे 'राष्ट्रपिता महात्मा गांधी सप्ताहा'चे पुण्यात दि.१ ते ७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. ज्येष्ठ नेते, माजी संरक्षण मंत्री शरद पवार यांच्या हस्ते सायंकाळी ५.३० वाजता सप्ताहाचे उद्घाटन होणार आहे. ज्येष्ठ हिंदी साहित्यिक अशोक वाजपेयी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. सुरेश द्वादशीवार यांच्या 'गांधी आणि त्याचे टिकाकार' या पुस्तकाच्या Gandhi And His Critics या इंग्रजी अनुवादाचे प्रकाशन होईल. उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.कुमार सप्तर्षी असतील.



या सप्ताहामध्ये महात्मा गांधींच्या विचारांचा प्रसार, सत्य, अहिंसा आणि शांती यांचे महत्त्व तसेच त्यांच्या योगदानाची आठवण ठेवून व्याख्याने, परिसंवाद, पुस्तक प्रकाशन, भजन, शांती मार्च, खादी प्रदर्शन, गांधी चित्रपट महोत्सव, पुरस्कार वितरण असे विविध कार्यक्रम होणार आहेत. गांधी सप्ताह आयोजनाचे हे १३ वे वर्ष आहे. गांधी सप्ताहाचे कार्यक्रम गांधी भवन, कोथरूड, येथे होणार आहेत.

### जिमखाना व्यवस्थापकीय समिती (जी.एम.सी.) विद्यार्थी परिषदे चे उदघाटन

## शिस्तीचे महत्व व जबाबदारीची जाणीव ठेवा : सपना अग्रवाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कँटोन्मेंट :** एम. सी. इ. सोसायटी, डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठाशी संलग्नित एच. जी. एम. आझम कॉलेज ऑफ एज्युकेशन यांच्या वतीने नुकतेच जी.एम.सी. विद्यार्थी परिषदेचा उदघाटन कार्यक्रम असेम्ब्ली हॉल, आझम कॅम्पस येथे अतिशय जल्लोषात पार पडला. याप्रसंगी डॉ. पी. ए. इनामदार विद्यापिठाचे कुलपती डॉ. पी. ए. इनामदार व एम.सी.ए. सोसायटीच्या उपाध्यक्षा आबेदा इनामदार आदी उपस्थित होते.



या कार्यक्रमासाठी फिनलॅंड इंटरनॅशनल स्कूलच्या सिनिअर प्राचार्या आणि प्रशिक्षण प्रमुख सपना अग्रवाल या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. आबेदा इनामदार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना टीम वर्क चे महत्व पटवून दिले तसेच नेतृत्वाला नैतिकतेची जोड देत सर्व धर्म समभाव सांगत मानवतेचे महत्व प्रभावी शब्दात विद्धयार्थ्यांना पटवून दिले.

अधिष्ठाता व प्राचार्या डॉ. अनिता बेलापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाच्या वर्षीच्या जी.एम.सी प्रमुख या नात्याने सहायक प्रा. दिपाली मेहकरकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शनाचे काम केले

> विद्यार्थ्यांना नेतृत्व व त्यातून निर्माण होणाऱ्या शिस्तीचे महत्व व जबाबदारीची जाणीव ठेवावी. नेतृत्व, हा केवळ एक टॅग नसून एक कृती आहे. जी पुढील वर्षभर निवडून आलेल्या प्रतिनिधींची ती नैतिक जबाबदारी आहे.
>
> — सपना अग्रवाल

#रा

परभन्ना फाउंडेशन आणि पर्यटन संचालनालय यांचा पुढाकार

Parbhanna Foundation

National Tourism Short Film Festival

# राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सव

## दिमाखदार सोहळ्याचे उद्घाटन

डॉ. विश्वास केळकर यांना 'जीवनगौरव पुरस्कार'

'टुरिझम, युथ अँड पीस'वर चर्चासत्र

१५ राज्यांतून ६० लघुपट

'टुरिझम, युथ अँड पीस' विषयावर चर्चासत्र

जागतिक पर्यटन दिवसानिमित्त परभन्ना फाउंडेशन आणि पर्यटन संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे हे तिसरे वर्ष आहे. यंदा महोत्सवात १५ राज्यांतून आलेल्या ६० लघुपट, माहितीपटांपैकी १२ माहितीपट, तीन लघुपट व एक व्ही-लॉगचे स्क्रीनिंग होणार आहे. अशा या महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम, स्क्रीनिंग, चर्चासत्र आणि पुरस्कार प्रदान सोहळा अशी रंगतदार कार्यक्रमांची जोड असणार आहे.

राष्ट्रसंचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तिसरा गौरवशाली राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सव आज शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्र, घोले रोड पुणे येथे होत आहे. या गौरवशाली महोत्सवासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अभिनेते माधव अभ्यंकर, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मीडिया आणि कम्युनिकेशन स्टडीज विभागाच्या प्राध्यापक आणि प्रमुख प्रा. डॉ. माधवी रेड्डी, पर्यटन संचालनालयाच्या उपसंचालिका शमा पवार यांची उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती लघुपट महोत्सवाचे प्रमुख गणेश चप्पलवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रसंगी महोत्सव सल्लागार समितीचे जीवराज चोले, कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिसेस प्रा. डॉ. महेश ठाकूर, संचालनालयाचे उपलेखापाल आनंद जोगदंड, संयोजन समितीचे असीम त्रिभुवन, के. अभिजीत, सारंग मोकाटे आदी उपस्थित होते.

### महोत्सव चार टप्प्यांमध्ये पार पडणार

● यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, स्क्रीनिंग, चर्चासत्र आणि पुरस्कार प्रदान सोहळ्याचा समावेश आहे. 'टुरिझम, युथ अँड पीस' या विषयावर होणाऱ्या चर्चासत्रात कर्वे इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सर्व्हिसेसचे संचालक महेश ठाकूर, बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनचे अधिक कदम, बजेट ट्रॅव्हलर प्रज्ञेश मोळक, टुरिझम प्रॅक्टिशनर ऋतुजा अचलारे, प्रबुद्ध इंटरनॅशनलचे संस्थापक सिद्धार्थ अहिवळे सहभागी होणार आहेत.

### विविध पुरस्कार प्रदान सोहळा

● "टूर्स अँड ट्रॅव्हल्स क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल यंदाचा जीवनगौरव पुरस्कार डॉ. विश्वास केळकर यांना देण्यात येणार आहे. प्रसाद गावडे (कोकणी रानमाणूस) यांना 'बेस्ट रिस्पॉन्सिबल टुरिझम अवॉर्ड २०२४' आणि आनंद कृषी पर्यटन केंद्रचे आनंद शिंदे यांना 'बेस्ट ॲग्री टुरिझम अवार्ड' प्रदान करण्यात येणार आहे. यासह सर्वोत्कृष्ट लघुपट व सर्वोत्कृष्ट व्ही-लॉग असे विविध पुरस्कार देण्यात येणार आहेत. लघुपट महोत्सवाचे परीक्षक म्हणून अभिनेत्री वैशाली केंदळे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सिमरन जेठवानी यांनी काम पाहिले आहे."



"दरवर्षी २७ सप्टेंबर रोजी जागतिक पर्यटन दिवसाचे औचित्य साधून परभन्ना फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. भारताच्या पर्यटनाचे विविध रूप, छटा लोकांनी पाहिल्या व अनुभवल्या पाहिजेत. यावर लिहिले आणि वाचले गेले पाहिजे. भारतीय संस्कृती, परंपरा आणि सण कायमच सर्वांना आकर्षित करत असतात. त्याची जगाला ओळख व्हावी आणि जास्तीत जास्त परदेशी पर्यटकांनी भारतात येऊन हे पाहावे, ही यामागची भावना आहे."

— गणेश चप्पलवार, लघुपट महोत्सवाचे प्रमुख

### पहिला राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सव २०२२

● लघुपट, माहितीपट, व्ही-लॉग, छायाचित्रण या प्रकारात हा महोत्सव झाला. माहितीपट प्रकारात 'फाईव्ह टेल्स ऑफ मल्लाभूम' ला प्रथम क्रमांक, 'उमरिया की यात्रा'ला द्वितीय क्रमांकाने गौरवण्यात आले. 'गोमीरा मास्क डान्स' तसेच 'विठुलाचं झाड' यांना फेस्टिवल मेन्शन तर 'श्रीक्षेत्र टू शेजाता' आणि 'टू व्हील्स ४३५ दिवस' या लघुपटांना ज्युरी मेन्शन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. छायाचित्र प्रकारात वारी-फुगडी छायाचित्रासाठी योगेश पुराणिक यांना प्रथम क्रमांक, तर निसर्गचित्रासाठी थुल्लीमिल्ली प्रिन्स यांना द्वितीय क्रमांक, निसर्गरंग छायाचित्रासाठी ओंकार भोसले यांना फेस्टिवल मेन्शन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. लघुपट प्रकारात ट्रॅव्हलर्स डिलाईट या लघुपटाला फेस्टिवल मेन्शन पुरस्कार तसेच व्ही-लॉगसाठी 'नेमाची वॉटरफॉल' ला फेस्टिवल मेन्शन पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल गिरीकंद ट्रॅव्हल्सच्या शुभदा जोशी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



### दुसरा राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सव २०२३

● दुसऱ्या राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवात 'यात्रा' या माहितीपटाने, तर 'जवाबों का सफर' या लघुपटाने बाजी मारली. उत्कृष्ट कृषी पर्यटन (मेघ मल्हार कृषी पर्यटन केंद्र), सेफरॉन हॉलिडे इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (उत्कृष्ट ट्रॅव्हल्स अँड टुरिझम कंपनी) तर कृषी पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सगुणा रूरल फाउंडेशनचे चंद्रशेखर भडसावळे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. कोहिनुर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, माजी प्रधान वनसंरक्षक सुनील लिमये यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले होते.



# आर.एम.डी. सिंहगड स्कूल ऑफ इंजीनियरिंगमध्ये इंडक्शन कार्यक्रमातुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आर.एम.डी. सिंहगड स्कूल ऑफ इंजीनियरिंग येथे नवीन अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. पराग काळकर, इन्फोसिस कंपनीचे वित्त सल्लागार सागर पाटील, आर.एम.डी. इन्स्टिट्यूट चे प्राचार्य डॉ. वैभव दीक्षित, अकॅडमिक डीन डॉ. शरद मुळीक, एम.बी.ए. डीन डॉ. स्वाती विजय, कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. शिखा सक्सेना सर्व विभाग प्रमुख डॉ. प्रतिभा आळंदकर, डॉ. सचिन कुलकर्णी, डॉ. विना लोमटे, डॉ. वर्षा क्षीरसागर, प्रो. सौरभ पराड, अमित आदत आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. शिखा सक्सेना यांनी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी आणि पालक यांना कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. कार्यक्रमावेळी बोलताना डॉ. वैभव दीक्षित यांनी सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी बद्दल तपशीलवार माहिती दिली. त्याचबरोबर आर.एम.डी. सिंहगड इन्स्टिट्यूटने

» शैक्षणिक

मागील बारा वर्षांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल माहिती दिली.

याप्रसंगी प्रा. एम. एन. नवले (संस्थापक अध्यक्ष), डॉ. सुनंदा नवले (संस्थापक सचिव), डॉ. रचना नवले-अष्टेकर (उपाध्यक्ष प्रशासन) आणि डॉ. रोहित नवले (उपाध्यक्ष एचआर) यांचे सतत सहकार्य आणि मार्गदर्शन केल्याबद्दल आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे पाहुणे सागर पाटील यांनी विद्यार्थ्यांनी नवीन




तंत्रज्ञान आणि तंत्रज्ञानातील बदल वेळोवेळी माहिती घेणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. आर एम डी सिंहगड इन्स्टिट्यूट चे डीन डॉ शरद मुळीक यांनी विद्यार्थ्यांनी त्यांच्या कामगिरीद्वारे चांगले अंतर्गत गुण मिळविण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे असे मत व्यक्त केले. आर. एम. डी. सिंहगड इन्स्टिट्यूट चे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर अमित आदत यांनी मागील पाच वर्षांमधील विद्यार्थ्यांना मिळवून दिलेल्या नोकरीच्या संधी बद्दल तपशीलवार माहिती दिली.

नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर चार वर्षाच्या अभयांत्रिकी कार्यक्रमातील विद्यार्थ्यांची भूमिका त्यांनी स्पष्ट केली आणि विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासासोबत विविध कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे.

— डॉ. पराग काळकर
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उप कुलगुरू

## बोगदा प्रकल्प कामासाठी टेंडर प्रक्रिया सुरू

**पुणे :** खडकवासला धरण ते फुरसुंगीदरम्यान २८ किलोमीटर लांबीच्या बोगद्यातून पाणी नेण्याची योजना जलसंपदा विभागाकडून तयार केली आहे. या प्रकल्पाच्या विस्तृत प्रकल्प अहवालास मुख्य अभियंता आणि त्यांनतर राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने (स्टेट लेव्हल टेक्निकल अॅडव्हायजरी कमिटी) यापूर्वीच मान्यता दिली आहे. या प्रकल्पामुळे सुमारे अडीच टीएमसी (अब्ज घनफूट) पाण्याची बचत होणार आहे. तर अतिरिक्त ३ हजार ४७२ हेक्टरवरील क्षेत्राला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. शहराला अतिरिक्त पाणी पुरवठा उपलब्ध करून देणारा आणि शेतीलाही पुरेसा पाणीपुरवठा करणे शक्य होणाऱ्या या प्रकल्पाच्या कामाच्या टेंडर भरण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात रक्तदान शिबिराचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रीय अभियंता दिनाच्या निमित्ताने येथील एमआयटी एमआयटी आर्ट, डिझाइन, आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) व राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



विद्यापीठाच्या या सामाजिक आवाहनाला विद्यार्थ्यांनीही उदंड प्रतिसाद देल्याने या शिबिरातून तब्बल १५० रक्त पिशव्या संकलीत करण्यात आल्या. यावेळी उपस्थित प्रत्येक मान्यवराने रक्तदानाचे महत्व विशद करताना, एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या सामाजिक उपक्रमाचे व विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधीलकीचे भरभरून कौतुक केले. एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष आणि कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करून महाविद्यालयीन जिवनात आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, हा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.



'एमआयटी एडीटी' विद्यापीठा मध्ये अभियंता दिनाच्या निमित्ताने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्सफुर्त सहभाग नोंदवून उदंड प्रतिसाद दिला.

# अभाविपची २०२४-२५ पुणे महानगर कार्यकारणी घोषित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** २५ सप्टेंबर रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पुणे महानगराची २०२४-२५ साठीची कार्यकारिणी घोषणा गणेश हॉल, न्यू इंग्लिश स्कूल टिळक रोड येथे करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तांत्रिक अभियांत्रिकी विद्यापीठ पुणे चे कुलगुरू प्रा.डॉ. सुनिल भिरुड, प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थी परिषदेचे पश्चिम क्षेत्राचे क्षेत्रीय संघटनमंत्री श्री. देवदत्त जोशी, पुणे महानगर अध्यक्ष प्रा.डॉ. प्रगती ठाकूर, महानगर मंत्री हर्षवर्धन हरपुडे हे उपस्थित होते. प्रा. प्रगती ठाकूर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. हर्षवर्धन हरपुडे यांनी मंत्रिप्रतिवेदन केले. ज्यात मागील वर्ष २०२३-२४ मधील कार्यक्रम, उपक्रम व आंदोलने याबाबत त्यांनी विस्तृत मांडणी केली. त्यांनी विद्यापीठातील ललित केंद्रात, प्रभू श्रीराम यांची झालेली विटंबना व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त पुण्यात झालेल्या विवेकानंद रन मॅराथॉन चा विशेष उल्लेख केला.

कुलगुरू प्रा. डॉ. सुनिल भिरुड यांनी त्यांच्या मनोगतात, 'विद्यार्थी परिषद गेली ७६ वर्षे काम करत आहे, हे कौतुकास्पद आहे. समस्यांवर काम करत असतानाच निसर्गातील अवेळी होणारे बदल आणि त्याचा पडणारा परिणाम या विषयातही विद्यार्थी परिषदेने काम करावे.' अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली

# वस्तू पुनर्वापरबाबत 'सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज'चा स्तुत्य उपक्रम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : पर्यावरण क्षेत्रात काम करणारी 'सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज' या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून 'प्रीलव्हड इको हाट' या आगळ्यावेगळ्या उपक्रमाची सुरवात पुण्यातील व्हीके ग्रुपच्या कर्मचाऱ्यांनी केली. 'प्रीलव्हड इको हाट' या उपक्रमाद्वारे आपल्याकडील वस्तू जी वापरात नाही पण ती इतर कोणी वापरण्यायोग्य असेल तर




ती ह्या प्रदर्शनामध्ये ठेवली जाते. त्यामुळे वापरलेल्या उत्पादनांची, कपड्यांची अदलाबदल, विक्री आणि दान एकाच व्यासपीठावर होणे शक्य असते. बोर्ड गेम्स, पुस्तके, शूज, ज्वेलरी, शो पिसेस आणि कपड्यांपासून ते बॅग, पर्स आणि पेंटिंगपर्यंत, अनेक वस्तू या प्रदर्शनात आहेत. सेनापती बापट रोडवरील व्हीके ग्रुपच्या कार्यालयात दर महिन्याच्या चौथ्या सोमवार, मंगळवार आणि बुधवारी या वस्तू प्रदर्शित केल्या जातात. या उपक्रमास खूप चांगला प्रतिसाद मिळत असून आत्तापर्यंत या प्रदर्शनाद्वारे २३० हुन अधिक वस्तूंची देवाणघेवाण झाली आहे. हा उपक्रम केवळ वापरलेल्या वस्तूंची अदलाबदल करणे, विक्री करणे किंवा देणगी देण्याबद्दल नव्हे तर एक अर्थपूर्ण मार्गाने टिकाऊपणा स्वीकारण्यासाठी एकत्र येण्याबद्दल आहे.

# भिडेवाड्यातील प्रकल्पग्रस्त व्यापाऱ्यांचा एल्गार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय स्मारकाच्या भूमिपूजन होताना भिडे वाड्यातील प्रकल्प बाधित व्यापारांना योग्य न्याय देऊन त्यांच्या पुनर्वसन करा अशी मागणी भिडेवाडा व्यापारी संघर्ष कृती समितीच्या वतीने करण्यात आली. यावेळी भिडे वाड्यात पिढ्यान पिढ्या व्यवसाय करणारे व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डोक्याला काळ्याफिती, हातात बॅनर घेऊन मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, आमचे पुनर्वसन झालेच पाहिजे अशा घोषणाबाजी करून व्यापाऱ्यांनी परिसर दणाणून सोडला. याप्रसंगी व्यापारी एम. आर. धाडगे, पोपट



### आम्हाला न्याय मिळाला पाहिजे : व्यापारी

● या घटनेला नऊ महिने उलटून गेले तरी आमच्या सर्व व्यापाऱ्यांची महाराष्ट्र शासनाने तसेच पुणे महानगरपालिका आणि मंत्री महोदयांनी घोर निराशा केली आहे. आम्ही यात व्यापारी भरडले गेलो आहोत. आम्हाला न्याय मिळाला पाहिजे. भविष्यात आम्हाला न्याय नाही मिळाला तर आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र प्रमाणात आंदोलन करू. यातून पुढे कोणताही अनुचित प्रकार घडल्यास याची सर्व जबाबदारी महाराष्ट्र शासनाची आणि पुणे महानगरपालिकेची राहील असे कृती समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

हिरजी शहा, हसमुख हिरजी शहा, व्ही. व्ही. गोखले, अरविंद हिरजी, बाबूभाई सट्टची जडेजा, मुकेश सिंह भिवभा जडेजा आदी उपस्थित होते.

यावेळी व्यापारी म्हणाले की पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले व समाज प्रबोधनाचे प्रणेते महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली. या ऐतिहासिक भिडे वाड्यात सावित्रीबाई फुले यांचे स्मारक होत आहे ही अत्यंत आनंदाची व अभिमानाची बाब आहे, परंतु या प्रकल्पात या भिडे वाड्याच्या जागेत आम्ही पिढ्यानपिढ्या व्यवसाय करीत आहोत. आमची दुकाने उध्वस्त करण्यात आली. त्यावेळी आम्हा व्यापाऱ्यांना दुकाने देऊन त्यांचे पुनर्वसन करू असे आश्वासन मंत्री चंद्रकांत पाटील, छगन भुजबळ, अतुल सावे यांनी दिले होते.

# जमिनीवरचे अर्थवर्तमान

जगभरातील पतमानांकन संस्थांकडून आणि राज्य व केंद्रातील सत्ताधारी पक्षांकडून भारताच्या आर्थिक विकासाचे गोडवे व प्रगतीदर्शक आकडे ऐकणे हा आता तमाम भारतीयांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेला आहे. आपल्या देशाची आर्थिक प्रगती ही देशवासीय म्हणून प्रत्येकासाठी अभिमानाचीच असते. असे असताना भारताच्या आर्थिक विकासाबाबत देशातीलच एक मोठा वर्ग सतत टीका का करत असतो? याची राजकारण वगळता असणारी कारणे दोन. पहिले म्हणजे सर्व व्यासपीठांवरुन आर्थिक विकासाचे ढोल बडवताना सादर केल्या जाणाऱ्या आकडेवारीची दुसरी बाजू कधीच मांडली जात नाही. सतत आपल्या पूर्वसुरींशी तुलना करुन वर्तमानातील चित्र किती सुखावह आहे हे सांगितले जाते. ही बाब अनेकांना रुचत नाही. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे, या विकासामुळे सर्वसामान्यांच्या रोजच्या जगण्याच्या संघर्षात किती फरक पडला, त्यांचे उत्पन्न वाढण्यास, जीवनमान सुखावण्यास, जीवनशैलीचा दर्जा उंचावण्यास किती मदत झाली याचे जमिनीवरचे वास्तव विचारात न घेणे. याखेरीज वर्तमानातील स्थितीवरुन अतिशयोक्त भविष्यचित्र रंगवणे हाही एक प्रघात दिसतो. या सर्वामधील अव्यवहारिकपणामुळे विरोधकांना टीकेची संधी मिळते. उदाहरणच घ्यायचे झाल्यास सध्या काही प्रमुख पतमानांकन संस्थांनी भारताच्या चालू आर्थिक वर्षातील विकासाचा अंदाज सुधारीतरित्या सादर केला असून त्यात कपात केली आहे. नोमुरा या संस्थेने अलीकडेच या आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी ग्रोथ रेटचा अंदाज ६.९ टक्क्यांवरुन ६.७ टक्क्यांवर आणला आहे. दुसरीकडे देशातील पारंपारिक सणासुदीच्या खरेदीचा हंगाम सुरू होताच भारतीय शहरांमधील ग्राहक खर्चात कपात करत आहेत. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थेसाठी हे चिंताजनक लक्षण आहे. मोटारींपासून मोबाइल फोनपर्यंत सर्वच वस्तूंच्या विक्रीने कोविडोत्तर काळात मागणीची त्सुनामी पाहिली. पण सद्यस्थितीत भारतातील शहरी ग्राहक अधिक सावध होताना दिसत आहेत. याचे संकेत वाहनउद्योगात मिळत आहेत. २०२३-२४ हा काळ वाहनउद्योगासाठी सुवर्णकाळ ठरला. वाहनविक्रीने नवनवीन उच्चांक प्रस्थापित केले. पण आता खरेदीदारांची संख्या घटताना दिसत आहे. भारतातील सर्वात मोठी कार निर्माता कंपनी मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडसारख्या कार कंपन्या, ज्या काही महिन्यांपूर्वी ग्राहकांची मागणी पूर्ण करू शकल्या नाहीत, त्यांच्याकडे आज विक्रमी संख्येने वाहनसाठा शिल्लक आहे. सबब मारुती सुझुकीने उत्पादन कमी केले आहे. टाटा मोटर्सने त्यांच्या काही मॉडेल्सच्या किमती २००,००० रुपयांनी कमी केल्या आहेत. दुसरीकडे देशातील हवाई प्रवास मंदावला आहे. मीठ, मैदा आणि तेल यांसारख्या पॅकेज केलेल्या अन्नाची विक्री घसरत चालली आहे. यावर्षी मे आणि जुलैमध्ये शहरी भागातील ग्राहकांचा खरेदीकल कमी झाल्याचे आकडेवारी दर्शवत आहे. उच्च व्याजदर, जोखमीच्या कर्जावरील प्रतिबंध आणि तंत्रज्ञान आणि रिटेल इंडस्ट्री यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील नोकऱ्यांमधील मंदी यामुळे ग्राहक खर्चात कपात करत आहेत, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. रिलायन्स रिटेल लि.ने मार्चपर्यंत वर्षभरात ३८,००० हून अधिक नोकऱ्यांची कपात केली आहे; तर आदित्य बिर्ला फॅशन आणि रिटेल लिमिटेडलाही अपेक्षेपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. वेस्टलाइफ फूडवर्ल्ड लिमिटेड ही कंपनी भारतातील काही प्रदेशांमध्ये मॅकडोनाल्डचे रेस्टॉरंट चालवते. या कंपनीसह पिझ्झा हट स्टोअर्स चालवणारी सॅफायर फूडस् इंडिया लिमिटेड या कंपन्यांची गेल्या तिमाहीतील स्टोअर विक्री घटली आहे. भारतातील तीन महिन्यांच्या सणासुदीच्या काळात ऑटो डीलर्सपासून रेस्टॉरंट चेनपर्यंतचे व्यवसाय त्यांच्या वार्षिक विक्रीच्या २० ते ३० टक्के कमवतात. त्यांच्यासाठी यंदाचा सणासुदीचा हंगाम आव्हानात्मक ठरण्याची शक्यता आहे. या सर्व परिस्थितीत दिलासादायक बाब म्हणजे ग्रामीण भागातील खर्च पुन्हा वाढू लागला आहे. यंदा मान्सूनची बरसात समाधानकारक राहिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा खरीप चांगला झाला आहे. रब्बीसाठीचे पाण्याचे संकट टळले आहे. महागाई कमी झाल्यामुळे आणि चांगल्या पावसामुळे ग्रामीण क्रयशक्तीत सुधारणा होण्याची शक्यता आहे. एकंदरीत, शहरी भागातील खरेदीतील मंदावलेला कल आणि ग्रामीण भागातील वाढणारी क्रयशक्ती या विचलनामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेचा दृष्टीकोन गुंतागुंतीचा होईल, असे काहींचे म्हणणे आहे. याचा परिणाम जीडीपीवर होणार आहे. मार्चमध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात ८टक्क्यांपेक्षा जास्त राहिलेला जीडीपी या वर्षी सुमारे ७ टक्क्यांवर येण्याची शक्यता आहे. मंदावलेल्या शहरी मागणीमुळे वाढीवर परिणाम झाल्यास तो औद्योगिक आणि गुंतवणुकीवरही दिसून येऊ शकतो. सद्यस्थितीत सणासुदीच्या हंगामात ग्रामीण भागातील मागणीवर व्यावसायिकांची, उत्पादकांची भिस्त असल्याने त्यांनी या क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केल्याचे दिसते. असे असले तरी येणाऱ्या काळात महागाई वाढण्याची शक्यताही वाढली आहे. अलीकडेच सरकारने आयात तेलावरील कर वाढवल्याने बाजारात खाद्यतेलाच्या किमती वाढल्या आहेत. दुसरीकडे, केंद्र सरकारने १३ सप्टेंबर रोजी कांद्याच्या निर्यातीवरील निर्बंध शिथिल केले. कांदा निर्यातीवर असणारे प्रतिटन ५५० डॉलरचे किमान निर्यात मूल्याचे बंधन पूर्णपणे हटविले आहे. तसेच निर्यातीवरील ४० टक्के निर्यात शुल्क निम्म्यावर म्हणजे २० टक्क्यांवर आणले आहे. यामुळे स्थानिक बाजारात कांद्याचे भाव ६० रुपयांहून अधिक झाले आहेत. पाऊस चांगला होऊनही बाजारात भाजीपाल्याचे भाव कमी झालेले नाहीयेत. तोच प्रकार इंधनाबाबत आहे. जागतिक बाजारात ५२ आठवड्यातील नीचांकी पातळीवर क्रूड ऑईलचे भाव जाऊनही देशात पेट्रोलचे भाव कमी झालेले नाहीयेत. वाढत्या महागाईमुळे लोकांच्या घरगुती उत्पन्नात घट झाली आहे. ब्रोकरेज फर्म सिस्टमॅटिक्स इन्स्टिट्यूशनल इक्विटीजच्या अहवालात ही माहिती समोर आली आहे. भारताला बचतीचा देश म्हटले जाते. बचत करण्याच्या या सवयीमुळे भारताला २००८ च्या जागतिक आर्थिक मंदीसारख्या अरिष्टाला सामोरे जाण्यास मदत झाली. मात्र, आता भारतीय कुटुंबांची बचत सातत्याने कमी होत आहे. गेल्या दोन वर्षांत भारतीय कुटुंबांच्या निव्वळ बचतीचा आकडा सुमारे ४ टक्क्यांनी घसरला आहे. या सर्व बाबी अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने दर्शवणाऱ्या आहेत; मात्र त्यांना चर्चेतच येऊ द्यायचे नाही ही बाब एकांगीपणादर्शक आहे. वास्तविक 'विकसित भारता'चे स्वप्न पूर्ण करण्यासाठी . २०४७ पर्यंत भारताला आपले दरडोई उत्पन्न हे साधारणतः ५० हजार डॉलरपर्यंत वाढवायचे असेल तर त्यासाठी यामध्ये प्रतिवर्षी १२ टक्क्यांची वाढ होणे गरजेचे आहे.

**हिमाचल प्रदेश सरकार सध्या आर्थिक संकटात सापडले आहे. मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खु यांनी स्वत:, मंत्री व मुख्य सचिवांना दोन महिन्यांपर्यंत वेतन न घेण्याचा निर्णय घेतला आहे. कॅबिनेट दर्जाचे आठ सल्लागार आणि महामंडळाचे अध्यक्ष अणि उपाध्यक्षांना देखील या काळात वेतन आणि भत्ते दिले जाणार नाहीयेत. आमदारांनाही वेतन न घेण्याचे आवाहन केले आहे. निवडणुकीच्या काळात मोफत घोषणांचा पाडलेला पाऊस आणि ते पूर्ण करताना रिकामी होणारी राज्याची तिजोरी यामुळे हिमाचलची आर्थिक कोंडी झाली आहे. वित्तीय शिस्तीचे पालन न केल्यास आर्थिक नियोजनाचा गाडा कसा कोलमडतो याची उदाहरणे आपण श्रीलंका, पाकिस्तान या देशांमध्ये पाहिली आहेत. पण भारतातील अनेक राज्ये लोकानुनयाचा आधार घेत असल्याने वित्तीय शिस्त कोलमडत आहे. यामध्ये भाजपाशासित राज्यांचाही समावेश आहे.**

# हिमाचलच्या 'संकटाचा' धडा

विश्वास सरदेशमुख, ज्येष्ठ पत्रकार

हिमाचल प्रदेश सरकार सध्या आर्थिक संकटात सापडले आहे. राज्याची ढासळलेली आर्थिक स्थिती पाहता त्यातून सावरण्यासाठी राज्य सरकारने काही धोरणात्मक निर्णय घेतले. राज्याची आर्थिक स्थिती पाहता मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खु यांनी स्वत:, मंत्री व मुख्य सचिवांना दोन महिन्यांपर्यंत वेतन न घेण्याचा निर्णय घेतला आहे. कॅबिनेटचा दर्जा असलेले आठ सल्लागार आणि सार्वजनिक महामंडळाचे अध्यक्ष अणि उपाध्यक्षांना देखील या काळात वेतन आणि भत्ते दिले जाणार नाहीत. राज्यातील आमदारांना देखील वेतन आणि भत्ता न घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच दोन महिन्यांनंतर परिस्थिती पाहून निर्णय घेतला जाईल, असेही म्हटले आहे. हिमाचल प्रदेशमध्ये काही दिवसापूर्वीच पावसाने हाहाकार उडविला.परिणामी बराच आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. अनेक भागात मुसळधार पाऊस पडल्याने आणि ठिकठिकाणी भूस्खलन झाल्याने रस्त्यांची मोठी हानी झाली आहे. अशातच आर्थिक टंचाईचा डोंगर देखील राज्यासाठी मोठे संकट उभा करत आहे. आर्थिक चणचण पाहून मुख्यमंत्री सुक्खु यांनी सहकाऱ्यांना सल्ला देत मंत्री आणि सरकारी कर्मचाऱ्यांनी राज्याच्या आर्थिक स्थितीचे आकलन करावे असे म्हटले आहे.

राज्याचा ढासळलेला आर्थिक गाडा विचारात घेऊन मुख्यमंत्र्यांनी काही धोरणात्मक निर्णय घेतले. राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाकडून नियमित वेतन आणि भत्त्यासंदर्भात अधिसूचना जारी करण्यात आली. त्यानुसार, सध्या वेतनाबाबत हात आखडता घेतला जात आहे. पण माजी मुख्यमंत्री अणि विरोधी पक्ष नेते जयराम ठाकूर यांनी सरकारवर आरोप केला असून मुख्यमंत्री आणि मंत्र्यांचे वेतन आणि भत्ते बंद केलेले नसल्याचा दावा केला आहे. तथापि, मुख्यमंत्री सुक्खु यांनी राज्याचे उत्पन्न वाढवणे आणि बिगर उत्पादक खर्च कमी करण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलल्याचा दावा केला आहे. त्याचा परिणाम दिसण्यास वेळ लागेल, असेही ते म्हणत आहेत. सध्या हिमाचल प्रदेशवर ८७,५८९ कोटी रुपयांचे कर्ज आहे. पुढील वर्षी मार्चपर्यंत या कर्जाचा आकार ९५ हजार कोटींपर्यंत पोचण्याची शक्यता आहे. सुक्खु सरकारने पावणे दोन वर्षांच्या काळात १९ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. पेन्शन, वेतन आणि विकासकामासाठी हे कर्ज घेतल्याचे सांगितले जात आहे. परंतु या गंभीर आर्थिक स्थितीला मुख्यमंत्र्यांनी जुन्या सरकारच्या धोरणाला जबाबदार धरले आहे. भाजपच्या सरकारने सरकारी तिजोरीची लुट केली आणि म्हणूनच राज्यासमोर आर्थिक संकट वाढले, असा आरोप केला. मात्र आम्ही आर्थिक नियोजन केल्याने राज्याच्या स्थितीत सुधारणा होत आहे. सरकार महागाई भत्त्याचा फरक लवकरच देईल, असा त्यांचा दावा आहे.

प्रत्यक्षात या संकटाचे मूळ रेवडी कल्चरमध्ये आहे. हिमाचल प्रदेशची विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी काँग्रेसने दहा मोफत योजनांची घोषणा केली होती. या योजनांना अंमलात आणता आणता राज्य सरकार मेटाकुटीला आले आहे. म्हणूनच हिमाचल प्रदेश आर्थिक गाळात जाताना दिसत आहे. राज्यातील महिलांना मासिक पंधरा हजार रुपये देण्याची घोषणा अमलात आणण्यासाठी हिमाचल सरकारला वार्षिक ८०० कोटी रुपये खर्च करावे लागत आहे. जुनी पेन्शन योजना लागू केल्याने एक हजार कोटी अतिरिक्त खर्च येत आहे. काँग्रेसने ३०० युनिट मोफत वीज देण्याची हमी दिली होती; मात्र १२५ युनिटपर्यंतच मोफत वीज मिळत आहे. यावर सुमारे १८ हजार कोटी रुपये खर्च होत आहेत. प्राप्तिकरदात्यांना मोफत वीजेच्या सवलतीतून वगळले आहे. या योजनांचा भार पेलवेनासा झाल्याने काँग्रेस सरकारकडून अन्य घोषणा बासनात गुंडाळून ठेवण्यात आल्या आहेत.

काँग्रेसच्या दोन हमी योजना लागू करण्यासाठी ३५०० कोटी रुपये खर्चाचा अंदाज आहे. अधिकाऱ्यांच्या मते, राज्याला केंद्राकडून ५२० कोटी रुपयांचे अनुदान येणे बाकी आहे. या निधीचा उपयोग वेतनासाठी केला जाणार आहे. हिमाचल प्रदेशच्या सरकारी कर्मचारी संघटनेचे नेते हीरालाल वर्मा यांच्या म्हणण्यानुसार, या आर्थिक चणचणीचा सर्वाधिक फटका सरकारी कर्मचाऱ्यांना बसला आहे. कर्मचाऱ्यांना दर महिन्याच्या शेवटपर्यंत वेतनाची वाट पाहवी लागत आहे. आर्थिक संकट असेल तर सरकारने ते दूर करायला हवे. वार्षिक अर्थसंकल्पात पेन्शन, वेतन, मेडिकल आदी गोष्टींची तरतूद केलेली असते. त्यामुळे सरकार या पैशाचा दुरपयोग करत आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. माजी मुख्यमंत्री जयराम ठाकूर यांनी राज्यात आर्थिक आणीबाणी असल्याचा आरोप केला. कर्मचाऱ्यांच्या खात्यात वेतन जमा होत नाहीये आणि निवृत्तीवेतनधारक पेन्शनची वाट पाहत आहेत. राज्याची अर्थव्यवस्था पूर्वीसारखीच राहू द्या. कारण त्या काळात लोकांना वेतन, पेन्शन, सरकारी भत्ते, सुविधा, महागाई भत्ते नियमितपणे मिळत होते. मुख्यमंत्री आपल्या धोरणात सातत्याने बदल करत असल्याने राज्यांत आर्थिक पेच वाढत असल्याचा आरोप ठाकूर यांनी केला. एक दिवस म्हणतात, राज्याची आर्थिक स्थिती चांगली नाही. दुसऱ्या दिवशी म्हणतात, सर्वकाही ठिक आहे. पण सुक्खु सरकारला धोरण राबविण्यासाठी आणि भूमिकेत बदल करण्यासाठी पुरेसा वेळ दिला. मात्र दीड वर्षाच्या कार्यकाळात त्यांना जनहिताच्या अन्य गोष्टी अमलात आणण्यात यश आले नाही आणि तसा रस नसल्याचे दिसून आले. ही मंडळी केवळ आपल्या मित्राचा अजेंडा पुढे रेटण्यासाठी काम करत आहेत. भाजपकडून यां भूमिकेला कधीही पाठबळ दिले जाणार नाही आणि त्यांना तीव्र विरोध केला जाईल. सरकारला राज्याच्या जनतेच्या भावना समजत नाहीत. मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्री सकाळी वेगळेच बोलतात आणि सायंकाळी वेगळेच सांगतात. विधिमंडळात मुख्यमंत्री म्हणाले की, मंत्री, सीपीएस,. मंत्री, आमदारांना दोन महिन्यांपर्यंत वेतन दिले जाणार नाही आणि सायंकाळी मात्र मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या जवळच्या मित्रांचे मानधन तीस हजारावरून एक लाख तीस हजार केल्याचे समजते, असा आरोप जयराम ठाकूर यांनी केला. एकंदरीतच हिमाचल प्रदेशाची आर्थिक स्थिती अडचणीत असल्याने त्याचा फटका लोकप्रतिनिधीबरोबरच कर्मचाऱ्यांना आणि जनतेलाही बसत आहे. यातून बाहेर पडण्यासाठी कडक आर्थिक धोरण राबविणे गरजेचे असून वायफळ खर्चांना कात्री लावणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. हिमाचल प्रदेश हे आकारमानाने छोटे राज्य असले तरी तेथील सद्य आर्थिक स्थितीचा धडा मोठा आहे. वित्तीय शिस्तीचे पालन न केल्यास आर्थिक नियोजनाचा गाडा कसा कोलमडतो याची उदाहरणे आपण श्रीलंका, पाकिस्तान या देशांमध्ये पाहिली आहेत. पण भारतातील अनेक राज्ये सत्ता मिळवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी लोकानुनयाचा आधार घेत असल्याने वित्तीय शिस्त कोलमडत आहे. यामध्ये भाजपाशासित राज्यांचाही समावेश आहे. २०२३-२०२४ च्या अहवालानुसार, २०२२ ते २०२४ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, देशातील अनेक राज्यांचा केंद्राकडून घेतलेल्या कर्जाचा आकडा वाढला आहे. आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, केरळ, पंजाब, राजस्थान, मध्य प्रदेश, तामिळनाडू, तेलंगणा, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल या १५ राज्यांमध्ये मागील दोन वर्षांत घेतलेल्या कर्जाच्या संख्येत वाढ झाली आहे. या राज्यांनी उत्पन्नापेक्षा खर्चात वाढ केली आहे. गेल्या वर्षीच्या आकडेवारीनुसार, २०२३-२४ च्या अखेरीस भारतातील ३३ टक्क्यांहून अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची कर्जे त्यांच्या जीडीपीच्या ३५ टक्क्यांहून अधिक राहतील असा अंदाज व्यक्त केला होता. या राज्यांची या आर्थिक वर्षातील वित्तीय तूट त्यांच्या जीएसडीपीच्या ४ टक्क्यांहून अधिक असण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. महाराष्ट्रावरील कर्जाच्या बोजात एका वर्षात ८२,०४३ कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आकडेवारीनुसार देशातील राज्यांचे एकूण कर्ज त्यांच्या एकूण उत्पादन क्षमतेच्या ३१.३ टक्क्यांवर पोहोचले आहे. पंजाबसारख्या राज्यांचे एकूण कर्ज २०२०-२१ मध्येच जीएसडीपीच्या ४९.१ टक्के होते, ते आता ५३.३ टक्क्यांवर पोहोचण्याचा अंदाज आहे. याच कालावधीत राजस्थानचे एकूण कर्ज त्यांच्या जीएसडीपीच्या ४०.५ टक्के, बिहारचे ३६.७ टक्के, पश्चिम बंगालचे ३७.१टक्के आणि उत्तर प्रदेशचे २९.१टक्के झाले आहे. विशेष म्हणजे कर्जाचा बोजा इतका वाढूनही राज्य सरकारे लोकानुनयवादी राजकारणाबाबत पुनर्विचार करण्यास तयार नाहीयेत. पण यातून भविष्यात गंभीर आणि मोठे संकट उभे राहू शकते. जाता जाता, महाराष्ट्रात जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी आंदोलन झाले होते तेव्हा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधीमंडळात बोलताना हिमाचल प्रदेश, राजस्थान यांसारखी राज्ये अशा योजनांमुळे भविष्यात अडचणीत सापडतील असे भाकित वर्तवले होते. आज हिमाचलबाबत ते खरे ठरताना दिसत आहे. महाराष्ट्रही त्या दिशेने जात नाहीये ना?

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२४**

भाद्रपद कृ. १० बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू, शुभ दिवस, (दु.१.१९ ते उ. रात्रौ १.१९ पर्यंत) एकादशी श्राद्ध, पुंडलिकबाबा पुण्यतिथी – मूर्तिजापूर (अकोला), मारोती महाराज पुण्यतिथी – माकनेर (बुलढाणा)

**सूर्योदय :** स.०६.०६ **सूर्यास्त :** सायं.०६.०३ वा

**नक्षत्र** : पुष्य, **योग :** शिव, करण : बव

**राहू काळ :** दुपारी : १:३० ते ३:००

**दिनविशेष**


*जागतीक पर्यटन दिन * १९०७ : संगीत समीक्षक वामनराव देशपांडे यांचा जन्म. * १९२५ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना. * १९२५ : शिवराम महादेव परांजपे यांचे निधन. *१९८८ : आंग सान सू की यांच्या नेतृत्वाखाली म्यान्मारमध्ये नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसी या पक्षाची स्थापना. * १९९२ : समाजसेविका अनुताई वाघ यांचे निधन. * २००८ : प्रसिद्ध गायक महेंद्र कपूर यांचे निधन.

**राशीभविष्य**

***मेष** : विवास जुळून येतील. ***वृषभ** : आज केलेल्या कामाचा मोबदला आजच मिळेल. * **मिथुन** : भावंडाशी संपर्क होईल. ***कर्क** : दुपारपर्यंत थकवा जाणवेल. ***सिंह** : सहकार्याचे वातावरण लाभेल. ***कन्या** : आज सुरु केलेल्या कामाला अपेक्षित सहकार्य मिळेल. ***तूळ** : संततीसाठी वेळ द्याल. ***वृश्चिक** : कामात शिथिलता येईल. * **धनु** : कामासाठी खूप धावपळ होईल. ***मकर** : गाठीभेटीसाठी धावपळ होईल. ***कुंभ** : स्वत:च्या आणि कुटुंबाच्या आवडीकडे लक्ष द्याल. ***मीन** : रेंगाळलेली कामे सुरु कराल.

**मेसेज आया**

सूर्योदय हे केवळ एक औचित्य असते, खरं तर
दिवस हा आपल्या सुंदर विचारांनी सुरू होतो...।।
नसते, सुख दुःखाने भरलेले हे आयुष्य असते,
कुठे काही हरवले तर कुठे काही सापडते, त्यातूनच
सापडलेले जपायचे असते...



**मराठी व्याकरण**

शीतलने गहू आणले, या वाक्यात शीतलने हे पद आहे. यात मूळ शब्द शीतल हा आहे. मूळ शब्दाला व्याकरणात प्रकृती असे म्हणतात. ने हा प्रत्यय आहे. येथे शब्दाच्या मूळ रूपाला म्हणजे प्रकृतीला ने हा प्रत्यय लागून शीतलने हे जे रूप झाले त्याला विकृती असे म्हणतात. विकृती म्हणजे शब्दाच्या मूळ रुपाचे बदललेले रूप. यालाच पद असे म्हणतात. वाक्य हे शब्दांचे किंवा पदांचे बनलेले असते.

**व्यक्तीविशेष**

### अनुताई वाघ

सामाजिक कार्यकर्त्या व शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ यांचा जन्म १७ मार्च १९१० रोजी पुणे येथे झाला. वयाच्या तेराव्या वर्षी वैधव्य येऊन सुध्दा तत्कालीन सामाजिक रूढींचे बंधन झुगारून त्यांनी शिक्षण घेतले. शिक्षिका म्हणून कार्यरत असतानाच त्यांना ताराबाई मोडक भेडल्या. त्यांनी बोर्डी (ठाणे) येथे आदिवासींसाठी असलेल्या ग्रामबाल शिक्षण केंद्रात प्रवेश केला. तेथे १९४७ ते ९२ अशी ४७ वर्षे त्यांनी निरपेक्ष वृत्तीने ग्रामशिक्षणाचे कार्य चालविले. पुढे कोसवाडच्या नूतनबाल शिक्षण केंद्राच्या चालक, राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकारिणी सदस्य, अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा म्हणुनही त्यांनी काम पाहिले. आदिवासींच्या शिक्षणासाठी अनेक संस्था स्थापन करून आयुष्य वेचणाऱ्या या अनुताईंना आदर्श शिक्षिका, दलितमित्र, आदर्श माता, फाय फौंडेशन, सावित्रीबाई फुले, बालकल्याण राष्ट्रीय पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांबरोबर पद्मश्री ने सुध्दा सन्मानित केले. बोर्डी येथेच दि.२७ सप्टेंबर १९९२ रोजी त्यांचे निधन झाले.

**बोधकथा**

### मनाची श्रीमंती

एका दरोडेखोराची ही कथा. त्याचा मुलगा जेव्हा सोळा वर्षांचा झाला. तेव्हा त्याने त्याला आपल्या व्यवसायाची गुपिते सांगण्यास सुरूवात केली. मुलाला तो सांगत होता. तुझ्या चोरीची सुरूवात चांगली व्हायला हवी. कुठेतरी जाशील आणि पोलिसांच्या हाती सापडशील. तेव्हा मी सांगतो त्याच ठिकाणी तुझ्या आयुष्यातील पहिली चोरी कर. असे म्हणून त्याने आपल्या मुलाला एका साधूची झोपडी दाखवली. मुलगा म्हणाला, पण तिथे चोरी करून काय मिळणार? दरोडेखोर म्हणाला, अरे तिथे गेलास तर दोन फायदे होतील. एक म्हणजे तिथं पोलिस नक्की येत नाहीत. दुसरं म्हणजे त्या साधूला लोक भरपूर भेटवस्तू देतात. सोनं, चांदी, फळ... पण तो ते सर्वांना वाटत राहतो. तो सारं वाटणार आहे तर आपण का आणू नये? आणि मी गेली तीस वर्षे तिथंच चोरी करतो. त्यानं कधीही पोलिसांत तक्रार केली नाही. हे ऐकून मुलगा म्हणाला, म्हणजे तुम्ही तीस वर्षे चोरी करूनही त्याला कधीही काहीही कमी पडलं नाही आणि तुम्हाला मात्र अजून चोरी करावी लागते. याचाच अर्थ सज्जनपणाने जगूनच श्रीमंती लाभते. मग हा धंदा करण्यापेक्षा मी त्या साधूकडेच जाऊन राहतो.

**तात्पर्यः– सज्जनांचे समाधान, त्यांची श्रीमंती कधीच कमी होत नाही.**

**भूगोल**

### वनस्पती – पाने

फोटोसिंथेसिस आणि वाष्पीभवन या वनस्पतींच्या दोन महत्वाच्या कार्यांत पानांचा समावेश असतो. सर्वसामान्यपणे पानात बारीक, सपाट असा लॅमिना हा घटक असतो. त्यावर शिरा आणि पानांचे देठ आणि पानांचा बसे किंवा पाया असतो, जेथे पानांचे देठ जोडलेले असते. काही पानांची रचना साधी असते. म्हणजे त्यात एकच घटकसमूह असतो. तर काही पानांची रचना गुंतागुंतीची असते. त्यातील लॅमिना म्हणजे पान विभागलेले असते. अशा प्रकारची पाने पिनेट असू शकतात. म्हणजे एका मोठ्या देठाला दोन्ही बाजूला पाने येतात. किंवा ती पेटीयोल म्हणजे एकाच देठाच्या टोकावर पाने येतात. अशी असू शकतात. पानाच्या सर्वसाधारण आकारप्रमाणे पानांचे वर्गीकरण केले जाते. **(क्रमशः)**

**नवं संशोधन**

### कॉर्निया प्रत्यारोपणाला मिळाला पर्याय

कॉर्नियाच्या समस्येने ग्रस्त असलेल्या रुग्णांना दिलासा देणारे एक संशोधन झाले आहे. आता कॉर्निया प्रत्यारोपणाची गरज उरणार नाही, असे हे संशोधन आहे. अमेरिकेतील संशोधकांनी त्यासाठी नवा पर्याय शोधला आहे. त्याला 'डेसीमेट स्ट्रिपिंग' असे नाव देण्यात आले आहे. शिकागो युनिव्हर्सिटीतील संशोधिका डॉ. कॅथरीन कॉल्बी यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांच्या एका पथकाने ही कामगिरी केली. कॉर्नियाच्या आतून पेशीचा काही चौरस मिलीमीटरचा भाग हटवला की प्रत्यारोपणाच्या कटकटीतून मुक्तता मिळू शकते, असे त्यांनी म्हटले आहे. प्रभावित भागातून पेशीचा केवळ एक स्तर हटवल्यावर कॉर्निया योग्य प्रकारे काम करु लागतो. या तंत्राने फुक्स एंडोथीलियल डायस्ट्रॉफी (एफईडी) च्या प्रत्येक चार रुग्णांपैकी तिघांना पुन्हा दृष्टी मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. एफईडीच्या रुग्णांच्या कॉर्नियामध्ये पाणी भरते. पंपिंग सेल्सच्या कार्यप्रणालीतील बिघाडामुळे असे घडते. खराब पेशींना काढून टाकल्यावर निरोगी पेशी त्यांची जागा घेतात. त्या पंपिंग सेल्ससारखेच काम करु लागतात. त्यामुळे कॉर्नियाच्या वरील भागात तरल पदार्थ जमा होत नाही.

**सोडवा सुडोकू**

**सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.**

**क्रमांक ४४९**

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4 | |
| | 1 | | 2 |
| 2 | | 1 | |
| | 4 | | |

**क्रमांक ४४८ चे उत्तर**


| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 2 | 4 | 1 |
| 4 | 1 | 3 | 2 |
| 2 | 3 | 1 | 4 |
| 1 | 4 | 2 | 3 |

**हास्यविनोद**

**डॉक्टर :–** तुम्हाला काही प्रॉब्लेम नाही. फक्त आरामाची गरज आहे.

**महिला :–** अहो, डॉक्टर अजून तुम्ही माझी जीभ पाहिली नाही.

**डॉक्टर :–** तिलासुध्दा विश्रांतीची गरज आहे.



**महिलायन**

### रडताना घाबरु नका

अनेकदा महिलांचं रडणं हा आपल्याकडे चेष्टेचा, विनोदाचा विषय झाला आहे. पण, रडणंही किती फायदेशीर ठरु शकतं याचा विचार कोणी केला आहे का?

संवेदनशील महिलांच्या डोळ्यातून अश्रू येणं स्वाभाविक आहे. आपल्याकडे रडणं ही स्त्रियांचीच मक्तेदारी आहे, असं म्हटलं जातं. तिच्या रडण्यावरुन अनेकदा विनोदही केले जातात. महिलांकडे अश्रू पुसण्यासाठी रुमालाऐवजी दुपट्टा असायला हवा, असंही विनोदाने म्हटलं जातं. महिला आनंद, दु:ख, तिरस्कार, राग, प्रेम अशा कोणत्याही प्रसंगी रडू शकतात, त्यांच्या डोळ्यांमध्ये पाण्याचा पुरवठा करण्यासाठी खास नद्या असतात, असंही काही लोक म्हणतात. एखाद्या पुरुषाच्या, इतकंच काय अगदी पाच वर्षाच्या एखाद्या मुलाच्या डोळ्यात अश्रू आले तर त्याला 'अरे बायकांसारखं रडतोस काय?' असं म्हटलं जातं. याचाच अर्थ रडणं हा केवळ महिलांचाच हक्क मानला गेला आहे. पण, रडणंही किती फायदेशीर ठरु शकतं, याचा विचार तुम्ही कधी केला आहे का? रडल्यामुळे आपल्या शरीरातील निगेटिव्ह केमिकल्स बाहेर पडतात, असं विज्ञान सांगतं. वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार, अश्रू तीन प्रकारचे असतात. एकतर ते भावना किंवा कोणत्याही प्रकारचा ताण अनावर झाल्यावर बाहेर पडतात. **(पूर्वार्ध)**

**घरगुती औषध**

### चाफा (२)

वायूने अंग बधीर झाले तर चाफ्याचा रस अंगास चोळतात व काढा करून पोटात देतात. त्याने बरे वाटते. चाफ्याची साल, मूळ, पाने, फुलेही एकत्र कुटून त्याचा रस काढावा. त्यात तितकेच मोहरीचे तेल घालावे व त्या दोहोंच्या चौपट खोबऱ्याचे तेल घालावे. चाफ्याचा नुसता रस अंगास लावू नये. त्याने अंगावर बारीक पूरळ उठतो. वरीलप्रमाणे सिध्द केलेले तेल सांधेदुखीवर लावतात. शरीराच्या कोणत्याही भागावर गळू झाले तर त्यावर चाफ्याचा चीक लावल्याने गळू फुटून वाहू लागते. भ्रम झालेल्या म्हणजे मस्तक फिरलेल्या माणसाच्या डोक्यास चाफ्याच्या पानास तूप लावून बांधल्याने काही दिवसांनी गुण वाटू लागतो.

**म्हणी**

''जया अंगी मोठेपण तया यातना कठीण''

अर्थ– मोठे होणे, नाव कमवणे, सोपे नसते. आपल्याला एखाद्या व्यक्तीचे मोठेपण दिसते, पण त्यासाठी भोगलेले कष्ट, त्रास मात्र दिसत नाही. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक क्रांतिकारकांचं, महात्म्यांचं नाव आजही आदरानं घेतलं जातं. पण या सर्वांनी इंग्रजांचा अतोनात छळ सहन केला. यातना सहन केला. पण हेच त्यांच्या मोठेपणाचे लक्षण होते.

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# चला चॉकलेटच्या देशा...

चॉकलेटचा वापर जवळपास जगभरात केला जातो. भारतीय बाजारपेठेतही चॉकलेटला मोठे स्थान आहे; पण तुम्हाला माहीत आहे का, जगात सर्वात जास्त चॉकलेटचे उत्पादन कोणत्या देशात होते ? आफ्रिकेतील दोन छोटे देश जगातील ७० टक्के चॉकलेटचे उत्पादन करतात.



चॉकलेटचा इतिहास सुमारे चार हजार वर्षांचा आहे, जो प्राचीन मेसोअमेरिकेत आढळतो. आज ते मेक्सिको म्हणून ओळखले जाते, जेथे कोकोची वनस्पती प्रथम आढळली. अमेरिकेतील सर्वात प्राचीन असलेल्या ओल्मेक सभ्यतेच्या लोकांनी कोको वनस्पतीचे चॉकलेटमध्ये रूपांतर करण्याचे काम केले. तथापि, चॉकलेटच्या इतिहासाबद्दल इतर अनेक मत-मतांतरे आहेत. दरम्यान, चॉकलेट कोकोच्या झाडापासून मिळणाऱ्या फळापासून बनवले जाते. या वनस्पतीच्या प्रत्येक फळामध्ये सुमारे ४० कोको बिया असतात. झाडापासून तोडल्यानंतर, कोकोच्या बिया प्रथम वाळवल्या जातात आणि नंतर भाजल्या जातात. [illegible]चा शोध अमेरिकेत लागला असला, तरी आज जगातील सर्वाधिक कोको उत्पादन पश्चिम आफ्रिकेतील दोन छोट्या देशांतून होते. हे दोन देश म्हणजे कोटे डी आयव्होर आणि घाना. हेच दोन देश जगातील सुमारे ७० टक्के चॉकलेटचे उत्पादन करतात. कोट डी आयव्होर आणि घानामध्ये दोन दशलक्षाहून अधिक छोटे-छोटे कोको फार्म आहेत. येथील हवामान आणि सुपीक जमीन यामुळे येथे कोकोची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. सन २०२२ मध्ये, जगातील कोको उत्पादनापैकी एक तृतीयांश उत्पादन कोट डी आयव्होरचे होते. यावर्षी देशात २.२ दशलक्ष टन कोकोचे उत्पादन झाले. २०२२ मध्ये सर्वाधिक कोकोचे उत्पादन करणारा कोट डी आयव्होर नंतर घाना हा देश दुसऱ्या क्रमांकावर होता. या देशाचे उत्पादन १.१ दशलक्ष टन होते. या दोन देशांव्यतिरिक्त इंडोनेशिया, इक्वेडोर, कॅमेरून, नायजेरिया, ब्राझील आणि पेरू या देशांमध्ये कोकोचे उत्पादन जगात सर्वाधिक प्रमाणात केले जाते. स्वित्झर्लंडमधील लोक जगात सर्वाधिक चॉकलेट खातात. भारताबद्दल बोलायचे झाले तर केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये चॉकलेटचे सर्वाधिक उत्पादन केले जाते.

# पोटातील जीवाणूंचे आरोग्य समजणार



जीवाणू हे नेहमीच हानीकारक असतात असे नाही. पोटातील विशिष्ट जीवाणू हे तर आपल्या पचनसंस्थेचा अविभाज्य भाग आहेत आणि त्यांचा शारीरिक आरोग्यासाठी अनेक प्रकारे लाभ होत असतो. 'गट मायक्रोबियम' म्हणजे मोठ्या आतड्यातील सूक्ष्म जीवांची एक वसाहतच असते. टाईप २ मधुमेह किंवा हृदयविकारासारख्या गंभीर आजारांबाबतही त्यांची स्थिती महत्त्वाची ठरत असते. आता संशोधकांनी हे सूक्ष्म जीव किती हेल्दी म्हणजेच आरोग्यसंपन्न आहेत हे तपासण्यासाठी एक कॉम्प्युटेशनल टूल विकसित केले आहे. त्यासाठी सिंगल स्टूल सॅम्पलच्या तपासणीतून घेतलेला डाटा उपयोगात आणला जाईल.

संशोधकांनी हे टूल विकसित केले असले, तरी त्याच्या उपयुक्ततेबाबत अद्याप त्यांनाच पुरेशी खात्री नाही. हे नवे टूल प्रत्यक्ष रुग्णांबाबत किती उपयुक्त ठरू शकेल, हे आताच सांगता येणार नाही असे त्यांचे म्हणणे आहे. या टूलचे नाव गट मायक्रोबियम वेलनेस इंडेक्स २ (जीएमडब्ल्यूआय २) असे आहे. त्याच्या सहाय्याने यूजरला मायनस सिक्स व प्लस सिक्सदरम्यानचा स्कोअर मिळतो. हे गुण जितके अधिक तितके तुमच्या पोटातील सूक्ष्म जीवांचे आरोग्य चांगले आहे असे समजावे !

याउलट स्कोअर जितका कमी तितके पोटातील सूक्ष्म जीवांचे आरोग्य वाईट आहेत असे स्पष्ट होते.

नेचर कम्युनिकेशन्स या विज्ञान नियतकालिकात याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. आरोग्यसंपन्न (हेल्दी) व अनारोग्य (अनहेल्दी) जीवाणूंमध्ये फरक करण्याबाबत हे टूल ८० टक्क्यांपर्यंत अचूक ठरते असे दिसून आले. ८ हजार लोकांच्या स्टूल सँपल्सच्या सहाय्याने त्याला डेटा दिलेला आहे. तसेच त्याची ११४० लोकांच्या सँपलवर चाचणी घेण्यात आली. मिनेसोटामधील मायो क्लिनिकमधील शस्त्रक्रिया विभागातील सहायक प्राध्यापक जेयून सुंग यांनी याबाबतचे संशोधन केले आहे. त्यांनी बनवलेले हे टूल अर्थातच आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयवर आधारित आहे.



# एक यंत्रमानव भावनाप्रधान !



जगभरात अनेक प्रकारचे रोबोट म्हणजेच यंत्रमानव बनवण्यात आलेले आहेत. अमेरिका आणि जपानसारखे देश तर आता रोबोंचे माहेरघरच बनलेले आहेत. चेहऱ्यावर अनेक प्रकारचे हावभाव दर्शवणारे, विविध भाषा बोलू शकणारे, प्रश्नांची उत्तरे देणारेही रोबोट बनलेले आहेत. मात्र, ब्रिटनमध्ये एक भावनाप्रधान रोबोटही बनलेला आहे, याची तुम्हाला माहिती आहे का?

ब्रिटिश वैज्ञानिकांनी भावना असलेला यंत्रमानव तयार केल्याचा दावा केला असून, मानव व अँड्रॉईड यंत्रमानव यांच्यातील दीर्घकालीन नातेसंबंध अभ्यासण्यासाठी त्यांनी एरविन (इमोशनल रोबोट विथ इंटेलिजंट नेटवर्क) या यंत्रमानवाची निर्मिती केली आहे. ब्रिटनमधील लिंकन विद्यापीठाच्या संगणक विज्ञान विभागाचे डॉ. जॉन मरे यांनी भावना असलेल्या यंत्रमानवाची संकल्पना प्रथम मांडली होती. मानवसदृश यंत्रमानवातील वैचारिक भेद हे मानव-यंत्रमानव यांच्यातील नातेसंबंधांवर काय परिणाम करतात याचा अभ्यास करण्यासाठी या यंत्रमानवाचा वापर केला जाणार आहे. मानव व सहकारी यंत्रमानव यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यासाठी त्याचा वापर होणार आहे. बोधनातील भेदामुळे माणूस व यंत्रमानव वेगळे असतात, तसेच त्याचे स्वभाव, व्यक्तिमत्त्व वेगळे असतात. त्यांच्यात काही अपूर्णता असते. त्यामुळे बोधन भेद यंत्रमानवात आणले, तर यंत्रमानव हा माणसाप्रमाणे बोधन पातळीवर अपरिपूर्ण होईल व त्यामुळेच तो माणसासारखा होईल असा दावा संशोधक मृगांक विश्वास यांनी केला आहे.

# सुनीता अंतराळातून करणार मतदान

आठ दिवसांच्या मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेलेली सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बूच विल्मोर आता पुढील वर्षीच्या फेब्रुवारीपर्यंत म्हणजे आठ महिन्यांसाठी तिथेच राहणार आहे. त्यांना घेऊन जाणाऱ्या बोईंग स्टारलायनर यानातील समस्यांमुळे ही वेळ त्यांच्यावर आली.

आता हे यान रिकामेच पृथ्वीवर परतले असून त्याच्या या परतीच्या प्रवासावेळीही काही समस्या दिसून आल्याने यामधून दोन्ही अंतराळवीर परतले नाहीत, हे चांगलेच झाल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, सुनीता विल्यम्स आणि त्यांचा साथीदार बूच विल्मोर यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून पत्रकार परिषद घेतली. शुक्रवारी भारतीय वेळेनुसार रात्री १२.१५ वाजता सुरू झालेल्या या परिषदेत सुनीता आणि बूच यांनी अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. अमेरिकेच्या निवडणुकीत अंतराळातून मतदान करणार असल्याचे दोघांनी सांगितले.



मतदानासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना बूच म्हणाले की, आजपासूनच त्यांनी मतदानाशी संबंधित निवडणूक प्रक्रिया सुरू केली आहे. हे एक महत्त्वाचे कर्तव्य आहे. आपण मतदान कसे करू शकतो यावर नासा काम करत आहे. सुनीता विल्यम्स यांनी सांगितले की, त्या अंतराळातून मतदान करण्याबद्दल उत्साहित आहेत. पृथ्वीपासून ४०० किलोमीटर अंतरावर असलेल्या स्पेस सेंटरमधून सुनीता आणि बूच यांनी सांगितले की, त्यांनी नासाला अमेरिकेच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी पोस्टल बॅलेटची व्यवस्था करण्याची विनंती केली आहे. सुनीता आणि बूच यांनी ५ जून रोजी स्पेस स्टेशनवर उड्डाण केले. ते ६ जून रोजी अंतराळ स्थानकावर पोहोचले. ते १३ जूनला परतणार होते.

पण, नासाच्या बोईंग स्टारलायनर यानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे त्यांचे परतणे पुढे ढकलण्यात आले. आता दोघेही २०२५ मध्येच परत येण्याची शक्यता आहे. दरम्यान, सुनीता आणि बूच यांना अंतराळ स्थानकावर घेऊन जाणारे अंतराळ यान ३ महिन्यांनंतर ७ सप्टेंबर रोजी सुरक्षितपणे पृथ्वीवर उतरले. त्याचे लँडिंग ३ मोठे पॅराशूट आणि एअरबॅगच्या मदतीने झाले. पत्रकार परिषदेत सुनीता यांनी सांगितले की, आयएसएस हे त्यांच्यासाठी आनंदाचे ठिकाण आहे.

गरज पडल्यास, आम्ही येथे ८ महिने, ९ किंवा १० महिने राहू शकतो. पण, कुटुंब आणि पाळीव कुत्र्यांना मिस करतो. एकाच मोहिमेवर दोन भिन्न अंतराळयान उडवण्यास उत्सुक असल्याचे सुनीताने सांगितले. आम्ही परीक्षक आहोत, ते आमचे काम आहे. बूच म्हणाले, ते पहाटे साडेचार वाजता उठतात, तर सुनीता साडेसहा वाजता उठतात. अंतराळात राहिल्यामुळे हाडांची घनता कमी होण्यास सामोरे जाण्यासाठी दोघेही दोन तास व्यायाम करतात. बूच म्हणाले की स्टारलायनरचा पहिला चाचणी पायलट म्हणून, त्यांना येथे जास्त वेळ घालवावा लागेल अशी अपेक्षा नव्हती. तथापि, त्यांना माहिती होते की, काही समस्या असू शकतात, ज्यामुळे त्यांच्या परत येण्यास उशीर होऊ शकतो.

# टीशर्टच बनला मोबाईल




जगभरात काही भन्नाट संशोधने होत असतात. विशेषतः वेअरेबल गॅझेट्सच्या बाबतीत अनेक थक्क करणाऱ्या गोष्टी समोर येतात, ऑस्ट्रेलियात तर चवक मोबाईल फोनचे काम करू आहे.

वैज्ञानिकांनी पुढच्या पिढीचे तंत्रज्ञान शोधले असून त्याच्या मदतीने छोटे, कार्यक्षम, लवचिक मोबाईल फोन तुमच्या कपडावरच छापले जातील व ते काम करतील. ऑस्ट्रेलियातील मोनश विद्यापीठातील वैज्ञानिकांनी स्पॅसर तंत्रज्ञान वापरून हो मोबाइल छपाई केली आहे. त्यांनी जगातील पहिला स्पॅसर (सरफेस प्लासमॉन ॲम्प्लीफिकेशन बाय स्टिम्युलेटेड एमिशन ऑफ डिएशन) हा कार्बनचा बनवलेला मोबाईल तयार केला आहे. स्पॅसर हा अब्जांश पात्तळीवरील लेसर म्हणजे नॅनो लेसर असतो व तो मुक्त इलेक्ट्रॉन स्पंदित झाल्यानंतर प्रकाश सोडतो. नेहमीच्या लेसरमध्ये विद्युतचुंबकीय लहरी असतात. त्यामुळे जास्त जागा व्यापणारी उपकरणे असतात. मुख्य संशोधक चनाका रूपासिंगे यांनी सांगितले की, स्पॅसर डिझाईनमध्ये कार्बनचा वापर केल्याने त्याचे अनेक फायदे आहेत. इतर स्पॅसरचे डिझाइन हे सोने किंवा चांदीच्या नॅनो कणांमध्ये केले जात असे. अर्थवाहकातही त्यांचा वापर केला जात असे. आम्ही आता ग्राफिन रेझोनेटरचा वापर केला असून, कार्बन नॅनोट्यूबजमुळे बरेच फायदे झाले आहेत असे रूपासिंगे यांनी सांगितले. कार्बनचा स्पेंसर डिझाईनमध्ये वापर म्हणजे अधिक लवचिकता व जास्त तापमान सहन करण्याची क्षमता तसेच पर्यावरणस्नेही वस्तू हे त्यांचे वैशिष्ट्ये असते. या गुणधर्मामुळे अतिशय पातळ असा मोबाइल कपड्यांवर छापता येईल. स्पॅसर आधारित ट्रान्झिस्टर पर्याय उपकरणे सध्याच्या आधारित उपकरणांना आहेत. सध्याच्या उपकरणात सूक्ष्मसंस्कारक (मायक्रोप्रोसेसर) स्मृती, तरंगलांबी मर्यादा असतात, असे संशोधकांचे म्हणणे आहे. स्पॅसरचा वापर करून मोबाइल बनवण्यासाठी ग्राफिन व कार्बन नॅनोट्ब्जचा वापर करता येईल. कार्बनचे पोलादापेक्षा मजबूत असतात व तांब्यापेक्षा चांगले असतात, उच्च तापमानाला ते टिकून राहतात. ग्राफिन व कार्बन नॅनोटूब्ज एकत्र वापरून विजेचे वहन प्रकाशाच्या माध्यमातून करता येते. प्रकाशीय क्रिया वेगवान व ऊर्जासक्षम असतात व संगणक चिप्ससाठी सुलभ असतात. चनाका यांच्या मते ग्राफिन व कार्बन नॅनोटूब्ज यांचा वापर केल्याने वाहक व बनते. उपकरण मजबूत, हलके, औष्णिकदृष्ट्या स्थिर त्यांचे यांत्रिक, विद्युतीय व प्रकाशीय गुणधर्म वेगळे असतात. त्यांची चाचणीद्वारे सूक्ष्म अँटेना, विद्युतवाहक व तरंग मार्गदर्शक तयार करता येतात. चनाका यांच्या मते स्पेंसर तंत्राने तीव्र विद्युत क्षेत्र अगदी अब्जांश जागेत बनवता येते व तेही धातूचे नॅनोकण प्रदीप्त करण्याच्या क्षमतेचे असते, म्हणजेच ते लेसरपेक्षा प्रखर असते. एसीएस नॅनो या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.

# विमान चालवण्याची पद्धत बदलणार

मेंदूच्या संदेशाने कॉम्प्युटर चालवत बुद्धिबळ खेळण्याचा प्रयोगही अलीकडेच यशस्वी झालेला आहे. असाच प्रयोग चक्क विमान चालवण्याबाबतही करता येऊ शकतो का, याबाबतचे प्रयत्न गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहेत.



आगामी काळात वैमानिक केवळ त्यांच्या वैचारिक आदेशांन्वये विमान चालवू शकतील असे वैज्ञानिकांनी म्हटलेले आहे.

जर्मनीतील टेक्नीशी युनिव्हर्सिटी, मुंचेन या विद्यापीठातील संशोधकांनी म्हटले होते की, मेंदूच्या नियंत्रणाच्या मदतीने अतिशय अचूकतेने विमान चालवण्याची शक्यता आमच्या प्रयोगाने दाखवून दिली आहे. या विद्यापीठाच्या फ्लाईट सिस्टीम डायनॅमिक्स या संस्थेचे प्रा. फ्लोरियन होल्झाफेल यांनी मेंदू नियंत्रित विमानउड्डाणाचा अभ्यास केला होता. युरोपीयन संघाने बेनफ्लाईट या प्रकल्पाला अर्थसहाय्य दिले होते.

याबाबतचा प्रयोग काही वर्षांपूर्वी करण्यात आला होता. जास्तीत जास्त लोकांना हे तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले जाईल, असे एरोस्पेस अभियंता टिम फ्रीक यांनी सांगितले. मेंदूच्या नियंत्रणामुळे विमानाचे उड्डाण हा एक चांगला अनुभव असतो, त्यात एखादी व्यक्ती कॉकपीटचा प्रायोगिक अनुभव नसताना विमान चालवते. यात काही व्यक्तीची चाचणी घेतली असता त्या व्यक्तींनी दहा घटक जास्तीतजास्त अचूकतेने पूर्ण केले.

त्यातील एक वैमानिक सेंटरलाईनच्या काही मीटर अंतरावर उतरले. नवीन नियंत्रणपद्धतीनुसार नियंत्रण यंत्रणा व उड्डाण गतिकीत काय बदल करता येतील याचा विचार चालू आहे. साधारणपणे वैमानिकाला स्टेअरिंग हाताळणे जड जाते. त्या समस्येवर यात मात करता येते. प्रतिसाद हा मेंदू नियंत्रणाने विमान चालवण्याच्या प्रयोगात अजून साध्य झालेला नाही. त्यामुळे वैमानिकाच्या मेंदू संदेशाला मिळणारा प्रतिसाद महत्त्वाचा असतो.

# 'या' प्राण्याचे रक्त सर्वात महाग

पृथ्वीवर प्राण्यांच्या लाखो प्रजाती आढळतात. सर्व प्राण्यांची स्वतःची खासियत असते. पण, पृथ्वीवर जगण्यासाठी प्राण्यांनाही ऑक्सिजन आणि रक्ताची गरज असते. आज आम्ही तुम्हाला अशा प्राण्याविषयी सांगणार आहोत, ज्याच्या रक्ताची किंमत लाखो रुपये आहे. ही किंमत इतकी जास्त आहे की त्यापैशात एक कार सहज विकत घेता येईल.



पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या मानव आणि प्राण्यांना जगण्यासाठी रक्ताची गरज आहे. बहुतेक प्राणी आणि मानवाच्या रक्ताचा रंग लाल असला तरी काही प्राण्यांच्या रक्ताचा रंग पिवळा, निळा आणि हिरवा देखील असतो. पण, कोणत्या प्राण्याचे रक्त सर्वाधिक महाग, असा विचार क्वचितच केला गेला असेल. हे रक्त इतकं महाग आहे की, अगदी १ लिटर रक्ताच्या किमतीत आलिशान कार खरेदी करू शकता. खरं तर, या प्राण्याचे रक्त इतके महाग आहे कारण त्याचा वापर वैद्यकीय कारणांसाठी केला जातो. शिवाय ते खूप कमी प्रमाणात उपलब्ध आहे.

नॅचरल हिस्ट्री म्युझियम आणि मेरीलँड वेबसाईटनुसार, हॉर्सशू क्रॅब हा पृथ्वीवरील ४५० दशलक्ष वर्ष जुना जीव आहे. त्याचा इतिहास डायनासोरपेक्षा जुना असल्याचे म्हटले जाते. हे खेकडे इतर खेकड्यांसारखेच दिसतात. त्यांना कवच असते आणि शरीराला शेपूटही असते. या खेकड्यांचे रक्त निळे असते. हा निळा रंग त्यांच्या रक्तात आढळणाऱ्या हेमोसायनिनमुळे आहे. हे तांबे आधारित श्वसन रंगद्रव्य आहे. या रक्ताला निळे सोने असेही म्हणतात.

स्टडी डॉट कॉमच्या वेबसाईटनुसार, १ लिटर रक्ताची किंमत १५ हजार डॉलर्स म्हणजे सुमारे १२ लाख रुपये आहे. एवढ्या पैशात तुम्ही सहज कार खरेदी करू शकता. या रक्ताचे औषधी मूल्य खूप जास्त आहे. मेरीलँड वेबसाईटनुसार, या जीवाच्या रक्तात एक प्रोटिन असते, ज्याला लिमुलस अमीबोसाईट लायसेट (एलएएल) म्हणतात. हे औषध आणि वैद्यकीय उपकरण उत्पादक त्यांच्या उत्पादनांच्या चाचणीसाठी वापरतात. फाईन डायनिंग लव्हर्स वेबसाईटनुसार, हे प्राणी अमेरिकेत अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर आढळतात. या प्राण्यांच्या रक्तस्राव प्रक्रियेनंतर १० ते ३० टक्के खेकडे जगत नाहीत.

## उमेदवारांना मिळणार प्रत्यक्ष कामाचा अनुभव

# शहरात होणार रोजगार सर्वेक्षण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी :** राज्यातील युवकांना शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासनाने "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" जाहीर केली. चालू आर्थिक वर्षापासून युवकांना प्रशिक्षण देण्यासाठी योजना सध्या राज्यभर राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केलेल्या रोजगार इच्छुक उमेदवारांना सहा महिने कालावधीसाठी प्रशिक्षणार्थी म्हणून विद्यावेतन देण्यात येणार आहे. सदरची रक्कम शासनामार्फत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे प्रशिक्षणार्थींच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समाज विकास विभाग व लाईटहाऊस कम्यूनिटीज फाऊंडेशन संयुक्तरित्या महापालिका क्षेत्रामध्ये रोजगार सर्वेक्षण राबवित आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून १८ ते ४० वयोगटातील युवकांच्या आकांक्षा, आव्हाने आणि शैक्षणिक पार्श्वभूमी समजून घेण्यात येणार आहे.

महापालिकेच्या क्षेत्रातील लाखांहून अधिक कुटुंबांचा सर्वेक्षणामध्ये समावेश असून २४१ युवकांच्या मदतीने झोपडपट्टी क्षेत्र, कमी उत्पन्न गट याचबरोबर गावठाण क्षेत्रांमध्ये सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षणासाठी 'फिल्ड सर्वेक्षण प्रगणक' या पद निर्माण केले असून त्यासाठी २४१ जागा निश्चित करणेत आल्या आहेत. सदर सर्वेक्षणाच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील ठोस माहिती मिळणार असून त्याआधारे कौशल्य विकास व युवकांच्या रोजगाराविषयी प्रभावी निर्णय घेता घेऊन त्याआधारे धोरणे विकसित करता येणार आहेत. जे कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आणि रोजगाराच्या संधी देताना स्थानिक लोकसंख्येच्या गरजांशी सुसंगत असणार आहेत. सदर सर्वेक्षणाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव व प्रशिक्षण मिळणार असून याद्वारे त्यांची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

### फिल्ड सर्वेक्षण प्रगणक' या पदासाठी १७६ उमेदवारांना नियुक्ती

- 'फिल्ड सर्वेक्षण प्रगणक' या पदासाठी १७६ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली असून त्यापैकी ६६ उमेदवार रूजू झाले आहेत. रुजू झालेल्या उमेदवारांपैकी २० उमेदवारांच्या बॅचचे प्राथमिक प्रशिक्षण पुर्ण झाले असून सोमवार, दिनांक २३ सप्टेंबरपासून त्यांच्याद्वारे सर्वेक्षणाच्या कामास सुरुवात झाली आहे. त्याचबरोबर, दुस-या बॅचचे प्रशिक्षणाससुध्दा सुरुवात झाली आहे. शहरात सुरु असलेल्या सर्वेक्षणामध्ये शहरातील युवकांनी आवश्यक असलेली माहिती देऊन सहकार्य करावे. असे आवाहन समाज विकास विभागातर्फे करण्यात आले आहे.

"


'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने' अंतर्गत बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केलेल्या रोजगार इच्छुक उमेदवारांना सहा महिन्यांच्या कालावधीसाठी प्रशिक्षणार्थी म्हणून महानगरपालिकेमध्ये घेण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन देण्यात येणार असून त्यांना शासनामार्फत डीबीटाद्वारे थेट बँक खात्यामध्ये जमा करणेत येणार आहे. शहरातील युवकांच्या कौशल्य विकासासाठी व रोजगार निर्मितीसाठी महापालिका सदैव तत्पर असून शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा."

**— शेखर सिंह,**
आयुक्त तथा प्रशासक,
पिंपरी-चिंचवड महापालिक

राष्ट्रसंचार वीज बचत... रा

## घरकुल संकुलाची सौरउर्जा स्वयंपूर्णतेकडे वाटचाल

**पिंपरी :** महावितरण कंपनीच्या विजेवर अवलंबून न राहता चिखलीतील घरकुल संकुलमधील २७ इमारतींनी सौरऊर्जेचा अवलंब केला आहे. सध्या संपूर्ण संकुलाचा कारभार या सौर ऊर्जेवर सुरू आहे. परिणामी, घरकुलची विद्युत देयकापोटी महिन्याची पाच लाख रुपयांची बचत होत आहे. त्यामुळे, उर्वरित इमारती देखील सौरउर्जेने स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



महापालिकेने उभारलेल्या घरकुल संकुलात साधारण १५८ इमारती आहेत. या प्रकल्पामुळे पाणी पुरवठा मोटर, लिफ्ट आणि सोसायटीचे सार्वजनिक वीज सौरऊर्जेवर सुरू आहेत. सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे दररोज १ हजार युनिट वीज निर्मिती केली जाते. ती महावितरणकडे पाठवली जाते.

### एका इमारतीसाठी पाच लाखांचा खर्च

- सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी एका इमारतीसाठी साधारण पाच लाख खर्च येतो. त्यामुळे, इतर कंपन्यांनी आपल्या सीएसआर फंडातून रक्कम देऊन हा प्रकल्प उभारला आहे. त्यामुळे, या २७ इमारतींची महिन्याला एकूण ४ लाख ५ हजार रुपयांची बचत होत आहे. तर वर्षाला ४८ लाख ६० हजारांची बचत होत आहे.
- एका खासगी कंपनीच्या संयुक्त प्रयत्नातून हा प्रकल्प साकारण्यात आला. सुरेश जाधव, रवी लांडगे आणि अशोक मगर यांच्या प्रयत्नातून हा प्रकल्प कार्यान्वित झाला आहे.

### इलेक्ट्रिक बाईकला मोफत वीज

- साई बी ३१ सोसायटीमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प बसवून चार वर्षे झाली. एकीकडे बचत आणि दुसरीकडे जादा वीज निर्मिती होत असल्याने आम्ही आमच्या सोसायटीमध्ये इलेक्ट्रिक बाईकसाठी वीज मोफत देत आहोत. आता आमच्या सोसायटीमध्ये आठ ते दहा इलेक्ट्रिक बाईक आहेत. सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे. त्याने बचत झालेल्या रकमेचा आम्ही सोसायटी सुशोभीकरणासाठी वापर केला. त्यामुळे, आमची सोसायटी स्वच्छ आणि सुंदर बनली आहे, असे सोसायटीचे अध्यक्ष गणेश जोशी यांनी सांगितले.

### सन्मान अभियंत्यांचा...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिका आणि पिंपरी चिंचवड ज्युनियर इंजिनियर्स असोसिएशन यांच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृह येथे भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय अभियंता दिन साजरा करण्यात आला,

## पालिकेच्यावतीने 'राष्ट्रीय अभियंता दिन' साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** पिंपरी चिंचवड शहराने राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर जो नावलौकिक मिळविला आले त्यामध्ये अभियंत्यांचा मोलाचा वाटा आहे. शहरवासियांना सुलभ पद्धतीने जीवन जगता यावे यासाठी तसेच त्यांना सर्व आवश्यक सोयीसुविधा पुरविण्यामध्येही अभियंते महत्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या याच कार्याचा सन्मान करण्याचा आजचा दिवस आहे, असे प्रतिपादन करत आयुक्त शेखर सिंह यांनी सर्व अभियंत्यांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता मनोज सेठिया, अजय सुर्यवंशी, विजयकुमार काळे, बाबासाहेब गलबले, संजय खाबडे, तसेच नुकतेच महापालिका सेवेतून निवृत्त झालेले मुख्य अभियंता रामदास तांबे, श्रीकांत सवणे, सहशहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, पिंपरी चिंचवड ज्युनिअर असोसिएशनचे अध्यक्ष सुनिल बेळगांवकर, कार्याध्यक्ष चंद्रकांत कुंभार, सचिव संतोष कुदळे व पदाधिकारी यांच्यासह विविध विभागातील कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता तसेच त्यांचे कुटुंबीय आणि महापालिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापालिकेची निर्मिती झाल्यापासून अल्पावधीतच पिंपरी चिंचवड शहराने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविला आहे. पिंपरी चिंचवड शहराला नियोजित शहर बनविण्यासाठी विविध महापालिका सातत्याने लोकहिताचे विकासात्मक प्रकल्प उभारण्याचे कार्य करत असते. त्यामध्ये रस्ते, नाले, पूल, ब्रिज, उद्याने, क्रीडांगणे, जलशुद्धीकरण केंद्र, कचऱ्याचे व्यवस्थापन, नदी संवर्धन आदी प्रकल्प उभारून महापालिका शहराला नियोजित व सुविधायुक्त शहर बनविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. या शहराला नियोजित व राहण्यायोग्य, पर्यावरणपूरक शहर बनविण्यात अभियंत्यांचा सिंहाचा आहे.

## निळ्या पूररेषेतील बांधकामांवरील कारवाई पालिकेकडून स्थगित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सांगवी :** सांगवीतील पवना नदीलगतच्या निळ्या पूररेषेअंतर्गत असलेल्या निवासी आणि व्यावसायिक बांधकामांवरील कारवाईस अखेर पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह स्थगिती दिली. भारतीय जनता पक्षाचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या विनंतीवरून झालेल्या या निर्णयामुळे लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दरवर्षी नदीला पूर आल्यानंतर नदीपात्रा लगतच्या भागात पुराचे पाणी शिरते. त्यामुळे तेथील रहिवाशांना स्थलांतरित करावे लागते. पुराचा धोका असल्यामुळे निळ्या पूररेषेतील बांधकामामुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती असल्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाच्या वतीने अतिक्रमण कारवाई करण्याचा निर्णय आयुक्तांनी घेतला होता. या पार्श्वभूमीवर भाजपच्या शिष्टमंडळाने शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नेतृत्वाखाली तातडीने महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची भेट घेऊन यासंदर्भात सविस्तर चर्चा करीत सदर कारवाई तातडीने स्थगित करण्याची विनंती केली.

विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत बैठकीनंतर महापालिका प्रशासनाने कारवाईला स्थगिती दिली असून त्यामुळे निळ्या पूररेषेत येणाऱ्या लाखो नागरिकांना दिलासा मिळाला आहे. बैठकीस माजी महापौर उषा तथा माई ढोरे, माजी नगरसेवक हर्षल ढोरे, संतोष कांबळे, सुरेश भोईर, शारदाताई सोनावणे, राजू सावळे यांच्यासह सांगवी परिसरातील सर्व नागरिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगवीसह पिंपळे गुरव, रहाटणी, पिंपरी, काळेवाडी, वाकड या परिसरातील निळ्या पूररेषेत असलेल्या लाखो नागरिकांना महापालिकेच्या या कारवाईचा फटका बसणार आहे. या सर्वसामान्य नागरिकांच्या घरावर कोणतीही कारवाई करू नये, अशी मागणी करणारे निवेदन आयुक्तांना देण्यात आले.

## शहर, उपनगरात दहा तलाठी नव्याने नियुक्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहर आणि उपनगरातील तलाठी कार्यालयात दहा तलाठ्यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे तलाठी कार्यालयात विविध कामांसाठी हेलपाटे मारणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. पिंपरी चिंचवड अपर तहसील कार्यालयांतर्गत एकूण ३१ तलाठी कार्यालयांचा समावेश होतो. याठिकाणी आतापर्यंत केवळ आठ तलाठी कार्यरत होते. आठ तलाठ्यांवरच इतर कार्यालयाच्या कामकाजाचा अतिरिक्त भार पडला होता. एका तलाठ्यावर त्याच मंडलातील इतर तलाठी कार्यालयाचा पदभार दिला होता. त्यामुळे अवघे काही तासच तलाठी उपलब्ध होत होते. त्यामुळे, पिंपरी चिंचवड अपर तहसील कार्यालयांतर्गत तलाठ्यांची संख्या अपुरी असल्याची नेहमीच ओरड होत होती.

चिंचवड, निगडी, देहू, भोसरी आणि मोशी या चार मंडल कार्यालयांतर्गत तलाठी संख्या अगदी मोजकी होती. देहू येथील तलाठी कार्यालय केवळ अधिकारी नसल्याने अनेक दिवस बंद होते. नव्याने रुजू झालेल्या तलाठ्यांची त्या ठिकाणी नेमणूक झाली आहे.

### Selected



## महाराष्ट्र मजदूर संघटनेच्यावतीने अण्णासाहेब पाटील जयंती साजरी

**चिंचवड :** उद्योगातील, अनुचित प्रथा व गुंडगिरी प्रवृत्तीच्या घटकांमुळे माथाडी कायदा अडचणीत असल्याचे मत कामगार नेते तथा शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांनी व्यक्त केले. कष्टकरी गोरगरीब जनतेला स्वाभिमानाने जगता यावे यासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या अण्णासाहेब पाटील यांच्या जयंती निमित्त चिंचवड येथील अण्णासाहेब पाटील यांच्या पुतळ्याला महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी घटनेचे कार्याध्यक्ष परेश मोरे, सरचिटणीस प्रवीण जाधव, उपाध्यक्ष भिवाजी वाटेकर, सचिव सर्जेराव कचरे, मातोश्री माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष पांडुरंग कदम रायरेश्वर माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश कंठाळे, संघटनेचे खजिनदार नागेश व्हनवटे उपस्थित होते.

## 'माता रमाईच्या स्मारकाचे काम सुरू करा'; आरपीआय ची मागणी

**पिंपरी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याशेजारील जागेत माता रमाईच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध आहे. निधीचीही तरतूद आहे. परंतु, गेल्या अनेक महिन्यांपासून महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आठ दिवसांत काम सुरू करावे, अशी मागणी रिपब्लिक पार्टी ऑफ महाराष्ट्र प्रदेश प्रदेश उपाध्यक्ष संभाजी गायकवाड यांनी केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 'माता रमाईच्या स्मारकासाठी आंबेडकरी समाजाचे कार्यकर्ते उपोषण करीत आहेत. स्मारकाचे काम रखडले आहे. स्मारकाच्या आंदोलनाकडे जाण्यापूर्वी लक्ष करत आहे. अन्यथा आंदोलन करण्यात येणार आहे.

## रुपीनगर, तळवडेत वारंवार वीजपुरवठा खंडित; नागरिक त्रस्त

**पिंपरी :** रुपीनगर, तळवडे भागात गेल्या काही महिन्यांपासून वीज समस्यांनी नागरिक हैराण झाले आहेत. सतत पाच ते आठ तासांपर्यंत वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे, अनियमित वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी शिवसेनेच्या शिष्टमंडळाने अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांची भेट घेऊन केली.



महावितरणच्या गणेशखिंड कार्यालयात वीज समस्येवर पदाधिकारी आणि रुपीनगर, तळवडे शाखेचे शिवसेना विभाग प्रमुख नितीन बोंडे यांची सकारात्मक बैठक पार पडली. यावेळी अधीक्षक अभियंता गायकवाड, भोसरीचे कार्यकारी अभियंता अतुल देवकर, प्राधिकरणाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता किरण सरोदे, तळवडे येथील सहाय्यक अभियंता बनसोडे, रुपीनगर-तळवडे शाखेचे शिवसेना विभाग प्रमुख नितीन बोंडे उपस्थित होते.

## सांगवी, निगडीमध्ये वाहनांची तोडफोड; परिसरात दहशत



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात वाहन तोडफोडीचे सत्र थांबत नसल्याचे दिसून येत आहे. चिंचवड पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाल्हेकरवाडी येथे दोघांनी १५ ते २० वाहनांची तोडफोड केली आहे. ही घटना बुधवारी (ता. २५) मध्यरात्री दोनच्या सुमारास घडली.

परिसरात दहशत पसरविण्याच्या उद्देशाने दोघांनी वाहनांना लक्ष्य केले. गुरुद्वारा परिसरातच निगडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत देखील पाच ते सहा वाहनांची आरोपींनी तोडफोड केली आहे. यामध्ये वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच चिंचवड पोलिसांनी तपास करत दोघांना ताब्यात घेतले. सांगवीतही वाहनांची तोडफोड करण्याची घटना घडली आहे. एका व्यक्तीने बुधवारी (ता. २५) मध्यरात्री रस्त्याच्या बाजूला उभ्या केलेल्या वाहनांची तोडफोड केली. यामध्ये पाच ते सहा वाहनांचे नुकसान झाले आहे. तोडफोडीचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

### मुर्तीकारांचा देवी मुर्तीवर अखेरचा हात

## शहरात नवरात्रोत्सवाची जोरदार तयारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जुनी सांगवी :** नवरात्र उत्सवासाठी जुनी सांगवी, दापोडी, पिंपळे निलख परिसरातील मंदिरांच्या रंगरंगोटी सुशोभीकरण सजावटीची कामे सुरू करण्यात आली आहेत. सार्वजनिक मंडळांची मांडव उभारणी देखावे उभारणी करण्यात येत आहे.

सांगवीतील कुंभारवाड्यात आता नवरात्र उत्सवाच्या तयारीसाठी देवीच्या मुर्त्या तयार करून रंगरंगोटी करण्याची लगबग सुरू आहे. तीन ते चार फूट उंचीच्या आकर्षक मुर्त्या बनविण्यासाठी कारागिरांची कामे सुरू आहेत. येथील मुर्त्यांना सांगवीसह परिसरातून मोठी मागणी असते. मंडळांनी विसर्जन न करता प्रतिष्ठापना केलेल्या मुर्त्यांना पुन्हा नव्याने रंगरंगोटी करण्यात येते. कलाकार कपिल कुंभार, नितीन पाटकर म्हणाले की, 'ऑर्डरप्रमाणे मंडळांना मूर्ती तयार करून दिल्या जातात. काही मंडळे वर्षानुवर्षे मूर्ती कायम ठेवत रंगकाम करून घेतात.'

यंदा देवीच्या मूर्तींच्या किमती मध्ये ३५ टक्के वाढ झाली आहे. या वाढीचा फटका हा ग्राहकांना बसला असला तरीही ग्राहकांचा उत्साह मात्र कमी झालेला नाही. सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळांकडून यंदाही मोठ्या प्रमाणात मूर्तींना मागणी आहे मूर्ती शाळांमध्ये मूर्ती तयार करण्याच्या कामाला आता वेग आले असून जास्तीत जास्त कामगार लावून त्यांना जास्तीचा मोबदला देऊन काम सुरू असल्याचे मूर्तिकार सांगतात. #रा

## प्रकल्पाच्या विकासासाठी १० कोटी रुपायांची तरतूद

# 'बायोडायर्व्हसिटी पार्क'ला 'ग्रीन सिग्नल'


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहराच्या लौकीकात भर घालणारा 'बायोडायर्व्हसिटी पार्क' (जैवविविधता उद्यान) तळवडे येथे विकसित करण्यात येत आहे. सुमारे ७० एकर जागेत होणाऱ्या या प्रकल्पामुळे निगर्स परिसंस्थेचा जीर्णोद्धार होणार आहे. महानगरपालिका स्थायी समिती सभेत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मान्यता दिली आहे. भोसरी विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी तळवडे येथे 'बायोडायर्व्हसिटी पार्क' विकसित करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी त्यांनी महानगरपालिका, राज्य सरकारकडे सातत्त्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आहे. राज्य सरकारच्या 'माझी वसुंधरा' योजनेतून आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करण्यात येणार आहे.

महापालिका सहशहर अभियंता मनोज सेठिया म्हणाले की, तळवडे येथील जैवविविधता उद्यान मानव आणि निसर्ग यांच्यातील अधिक शाश्वत आणि सामंजस्यपूर्ण सहअस्तित्वाचा मार्ग प्रकाशित करेल. पुनर्संचयित उपक्रम, शैक्षणिक कार्यक्रम आणि सामुदायिक सहभाग याद्वारे पार्क जागरूक पर्यावरणीय कारभाराच्या परिवर्तनीय शक्तीचे उदाहरण देईल. या पुनरुज्जीवित लँडस्केपच्या सौंदर्याचा विचार करता भविष्यातील शहराच्या सौंदर्याला आकार देईल. जैवविविधतेचे संरक्षण ही केवळ गरज नाही, तर एक सामूहिक जबाबदारी आहे.

### .... असे आहे बायोडायर्व्हसिटी पार्क

● बायोडायर्व्हर्सिटी पार्कचे नियोजन सुमारे ७० एकर जागेत केले आहे. याठिकाणी देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. किंबहुना जंगल विकसित करण्यात येणार आहे. प्राणी, पक्षी अधिवास या ठिकाणी निर्माण करण्यात येणार आहे. मृदा संवर्धन, विविध थीमद्वारे वृक्षारोपण, एन्ट्रान्स गेट, बर्ड नेस्ट वॉल, पार्किंग, गोल्फ कार्ट अ‍ॅन्ड सायकल स्टेशन, ३ एन्ट्रान्स प्लाझा, अ‍ॅम्पिथिएटर, सोयुवेनिअर शॉप, वर्कशॉप, कॅफे, बटरफ्लाय गार्डन, रिपेरिअन अ‍ॅन्ड वेटलॅन्डस, ऑर्चिडट्रम, थीम पार्क- कलर्स् अॅड कोअर फॉरेस्ट, टॉयलेट ब्लॉक्स, बायो डिझास्टर, किऑक्स, स्ट्रिम क्रॉसिंग, साइनेज, साईनेज अ‍ॅन्ड ग्राफीक फॉर इकॉलॉजी अवेअरनेस, बेन्चेस, लाईटिंग- जनरल लाईटींग, पाथवेज, पिकनिक स्पॉट, रेस्टॉरंट एरिआ, ब्रिज लाईटिंग, व्हिजीबिलीटी लाईटिंग फॉर साईट, पब्लिक अ‍ॅड्रेस सिस्टीम, वेस्ट मॅनेजमेंट, साईल अ‍ॅन्ड वेस्ट वॉटर मॅनेजमेंट असा अत्याधुनिक सोयी-सुविधांचा बायोडायर्व्हर्सिटी पार्क पिंपरी-चिंचवडच्या सौंदर्यामध्ये भर घालणार आहे.




पर्यावरण प्रदूषण वसुंधरेचा ऱ्हास रोखण्याचे आव्हान मानवजातीसमोर आहे. 'चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित होत आहे. मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात येत आहेत. या परिस्थितीमध्ये पर्यावरणाचा समतोल टिकावा. महानगरपालिका, राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या सहयोगातून पिंपरी-चिंचवड परिसरातील जैवविविधता टिकावी. त्याचे संवर्धन व्हावे. निसर्ग परिसंस्थेचे जतन व्हावे. भावी पिढीला स्वच्छ हवा आणि नैसर्गिक सहवास लाभावा. या करिता जैवविविधता उद्यान विकसित करण्याचा संकल्प केला होता. त्याअनुशंगाने महानगरपालिका प्रशासनाने कार्यवाही सुरू केली. या प्रकल्पाला भेट देण्यासाठी जगभरातून पर्यटक येतील, असा विश्वास वाटतो. आगामी काळात या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामाला सुरूवात करावी, अशी अपेक्षा आहे.
**— महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

## » Selected



## रावेतमध्ये अतिक्रमणावर महानगरपालिकेची कारवाई

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य प्रकल्प विभागांतर्गत भक्ती-शक्ती ते मुकाई चौक या बीआरटी कॉरीडॉर वरील ४५ मीटर उर्वरीत रस्ता विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठी नगरचना व विकास विभागाने मंजूर विकास आराखड्यानुसार सदर रस्त्याचे भूसंपादन विशेष अधिका-यांच्या निवड्यानुसार केले होते. या भूसंपादनाच्या अनुषंगाने मूळ मालकांनी अडथळा करून अडवलेल्या ठिकाणी कारवाई करण्यात आली. सदर कारवाईस ३ पोकलेन, ४ जेसीबी, ५ डंपर सोबत पोलीस शाखेचे ७ महिला कॉंस्टेबल, ११ पुरुष कॉंस्टेबल व १ सहाय्यक पोलीस निरीक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे ७ महिला व १३ पुरुष यांच्यासह पिपंरी-चिंचवड महापालिकेचे अ क्षेत्रिय कार्यालयाचे अतिक्रमण विभागाकडील १०मजुर कर्मचारी होते. नगररचना विभागाचे २ सर्व्हेअर व अभियंता उपस्थित होते. उर्वरीत कारवाई पुढील दोन दिवस चालू राहणार आहे. सदर रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर सदरचा रस्ता ४५ मीटर रुंदीच्या पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे मुंबईकडे जाणारी किवळे येथील माळवले नगर या ठिकाणची वाहतूक सुरळीत होणार असल्याचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सांगितले.

# समांतर पुल लवकरच वाहतुकीसाठी खुला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चिंचवड :** पिंपळे सौदागर ते पिंपरीकडे जाताना पवना नदीवर नविन समांतर पुल बांधण्यात आला असून तो लवकरच नागरिकांना वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. गुरुवार (दि. २६) या पुलाच्या कामाची माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी पाहणी केली. पुलाच्या वाहतुकी दरम्यान नागरिकांच्या सुरक्षिततेच्या उपायांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी अशा सूचना यावेळी नाना काटे यांनी दिल्या.

पिंपरीगाव पिंपळे सौदागर दरम्यानच्या समांतर पुलाचे काम पूर्ण झाले आहे. काही तांत्रिक बाबी तसेच वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने पडताळणी झाल्यानंतर हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर माजी विरोधी पक्ष नेते नाना काटे यांनी या कामाची पाहणी केली. यावेळी कार्यकारी अभियंता बापू गायकवाड उपस्थित होते. सुरक्षिततेच्या दृष्टीने कामात कोणतीही कुचराई होता कामा नये अशा सुचना संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. नाना काटे यावेळी म्हणाले, पिंपरीगाव ते पिंपळे सौदागर दरम्यानच्या समांतर पुलाचे काम आता पूर्णत्वाला गेले आहे. गेल्या १०-१५ वर्षांपासून पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाकडे समांतर पुलाच्या मागणीसाठी पाठपुरावा केला. हि मागणी आता पूर्ण झाली आहे. या पुलामुळे पिंपरीतील रहिवासी तसेच रहाटणी, पिंपळे गुरव, पिंपळे निलख येथील नागरिकांना ये- जा करताना मोठा दिलासा मिळणार आहे. हा पुल सुरु झाल्यानंतर नक्कीच वाहतुकीची समस्या कमी होण्यास मदत होणार आहे.

## तळेगाव दाभाडेत व्याख्यानामाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे:** सरसेनापती खंडेराव येसाजीराव दाभाडे यांच्या २९५व्या पुण्यतिथीनिमित्त सरसेनापती उमाबाई दाभाडे सेवा प्रतिष्ठान, शिवसह्याद्री प्रतिष्ठान, जनसेवा डायग्नॉस्टिक यांच्या वतीने तळेगाव दाभाडे येथे 'व्याख्यानमालेचे' आयोजन करण्यात आले आहे.

आज २७ व २८ सप्टेंबर रोजी व्याख्यान तर २९ सप्टेंबर रोजी एकपात्री प्रयोग होणार आहे.

यासह कै. चंद्रकांत मुकुंदराव दाभाडे स्मृती पुरस्कार सोहळा, शस्त्र प्रदर्शन आणि रक्तदान शिबिर असे कार्यक्रम होणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुनील शेळके उपस्थित राहणार आहेत.

# 'महाआरोग्य शिबिर सप्ताहा'चे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते मयूर जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी श्री मयूर भरत जाधव मित्रपरिवार यांच्यावतीने 'महाआरोग्य शिबिर सप्ताहा'चे आयोजन करण्यात आले आहे. तसेच या सप्ताहामध्ये नागरिकांना मोफत चष्मा वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती मयूर जाधव यांनी दिली.

सदर शिबिर सप्ताह आज शुक्रवार (दि. २७ सप्टेंबर २०२४ ते २ ऑक्टोबर २०२४) दरम्यान राबविण्यात येणार आहे. तसेच पिंपरी विधानसभा मतदारसंघाच्या प्रत्येक प्रभागात सदर शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

यामध्ये नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात येतील. तसेच डोळे तपासणी, आरोग्य विषयक तपासणी तसेच औषधे वाटप करण्यात येणार असून, सदर शिबीर सप्ताह आज म्हणजेच २७ सप्टेंबर पासून सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या दरम्यान सुरु राहणार आहे. तसेच हे शिबीर दापोडी येथील नरवीर तान्हाजी मालसुरे स्मारक येथे आयोजित करण्यात आला आहे.

## रोटरी क्लब ऑफ निगडीतर्फे रविवारी मॅरेथॉनचे आयोजन

**निगडी :** - पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने, निगडी प्राधिकरण येथे रविवारी (ता.२९) 'रनाथॉन ऑफ होप' या मॅरेथॉनचे आयोजन केले असल्याची माहिती क्लबचे अध्यक्ष सुहास ढमाले, रनाथॉनचे संचालक केशव मानगे यांनी दिली. निगडी भेळ चौक येथील नियोजित महापौर निवास मैदान येथून पहाटे पाच वाजता स्पर्धेला सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत सुमारे ५ हजार स्पर्धक सहभागी होत आहे. स्पर्धकांना २१ किमी, १०किमी, ५ किमी आणि कॉर्पोरेट ५ किमी, फॅमिली गटात २ किमी गटात धावता येईल. तसेच महिला व ४५ वर्षे वरील वयोगटातील स्पर्धकांना स्वतंत्र बक्षिसे दिली जाणार आहेत. रनाथॉन स्पर्धेचे यंदा १३ वे वर्ष आहे, अशी माहिती रनाथॉनचे संचालक मानगे यांनी दिली. या स्पर्धेच्या माध्यमातून संकलित होणाऱ्या निधीतून रोटरी क्लब ऑफ निगडीतर्फे ग्रामीण भागात काही समाजपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये आनंदी शाळा, आनंदी ग्राम, वैद्यकीय प्रकल्पाचा समावेश आहे. त्यासाठी हा निधी खर्च केला जाणार असल्याची माहिती ढमाले यांनी दिली.

## पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्याला रस्त्यात मारहाण

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागात मीटर निरीक्षक पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याला रस्त्यात अडवून बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना मंगळवारी (दि. २४) सकाळी नऊ वाजताच्या सुमारास शास्त्री गार्डन पिंपरी कॅम्प येथे घडली.विनोद ताठे (रा. पिंपरी) असे जखमी अधिकाऱ्याचे नाव आहे. याबाबत माहिती अशी की, विनोद ताठे हे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागात मीटर निरीक्षक पदावर काम करतात. त्यांचे कार्यालय पिंपरी कॅम्प येथे शनी मंदिराजवळ आहे. मंगळवारी सकाळी पावणेनऊ वाजताच्या सुमारास ते घरातून त्यांच्या दुचाकीवरून कार्यालयात जाण्यासाठी निघाले. पिंपरी कॅम्प परिसरातील शास्त्री गार्डन जवळ आल्यानंतर दोन दुचाकीवरून आलेल्या अज्ञातांनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला. मला का मारताय, अशी विचारणा ताठे यांनी आरोपींकडे केली. मात्र त्यांना काहीही उत्तर न देता आरोपींनी मारहाण सुरूच ठेवली. बेदम मारहाण केल्यानंतर आरोपी शास्त्री गार्डन जवळील पहिल्या गल्लीतून पळून गेले. या घटनेत विनोद ताठे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्या डाव्या पायाला फ्रॅक्चर झाले असून त्यावर मोठी शस्त्रक्रिया करावी लागणार आहे. तसेच उजव्या पायाला आणि हाताला देखील गंभीर दुखापत झाली आहे.

पान १ वरून

## मोदींच्या सभेसाठी आता २९ किंवा ५ ऑक्टोबरचा मुहूर्त ?

भाजप कार्यकर्त्यांनी अविश्रांत मेहनत करून नरेंद्र मोदी यांचा कार्यक्रम न भूतो न भविष्यात असा करायचा आणि या निमित्ताने विधानसभेचे नर्सिंग फुंकायचे असा चंग बांधला होता परंतु दुर्दैवाने पावसामुळे या कार्यक्रमावर पाणी पडले आणि कार्यकर्त्यांचा उत्साह देखील मावळला. परंतु आज भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यातील सर्व पदाधिकाऱ्यांची ऑनलाईन संवाद साधला. सुमारे तासभर भाजपाच्या दोन-तीन ज्येष्ठ नेत्यांनी सर्व भाजपा कार्यकर्त्यांचे मनोबळ वाढविले हा कार्यक्रम रद्द झाला नसून तो केवळ पोस्टपोन झाला आहे हे आपल्या मनाला सांगून ठेवा , अशा शब्दात चंद्रकांत दादांनी कार्यकर्त्यांना साथ घातली कोणीही नाव उमेद होऊ नका विधानसभेची तयारी आपल्याला करायचे आहे आणि हा कार्यक्रम पुन्हा एकदा तेवढ्याच दिमाखात करायचा आहे असे त्यांनी सांगितले. गेल्या काही दिवसांपासून कार्यकर्त्यांनी गाड्या घोडे बॅनर्स जाहिरात बाजी कार्यकर्त्यांना पुण्यापर्यंत आणण्याचे नियोजन या सगळ्यांकरिता खूप कष्ट घेतले आणि खूप पैसा देखील खर्च केला त्या सर्वांच्या मनाची मला जाणीव आहे परंतु पक्षकार्याच्या यज्ञातील या समिधा कधीही वाया जात नाहीत . आपण पुन्हा जोमाने हा कार्यक्रम करू असे त्यांनी सांगितले. गुरुवारी सकाळी साडेदहा ते साडेअकरा वाजेपर्यंत हे ऑनलाईन बैठक सुरू होती .

## महालक्ष्मीची मर्डर मिस्ट्री; तब्बल ५९ केले तुकडे

महालक्ष्मीची हत्या झाल्यानंतर तिच्या मृतदेहाचे तुकडे तिच्याच घरातल्या फ्रिजमध्ये ठेवण्यात आले. या प्रकरणात मुक्तीरंजन प्रताप राय हा प्रमुख संशयित होता. मात्र याच मुक्तीरंजनचा मृतदेह भुईनपूर गावात आढळून आला. २१ सप्टेंबर या दिवशी महालक्ष्मीच्या मृतदेहाचेतुकडे तिच्याच घरातल्या फ्रिजमध्ये आढळले आणि तिची हत्या झाल्याची घटना समोर आली. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष पथकं तयार केली होती. मुक्तीरंजन राय हाच या प्रकरणातला संशयित आहे या निष्कर्षापर्यंत पोलीस पोहचले होते.

## तरुणींवर सामुहिक बलात्कार

करण्यात आला. त्यातील एक आरोपी हा महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे. इतर अन्य महाविद्यालयातील आहेत. दोघे जण अल्पवयीन असून दोघांना अटक करण्यात आली आहे. त्यांचा

## आता पहिल्यादांच एसटी 'एलएनजी'वर धावणार

करणार आहे. पंप बांधण्याचा खर्च कंपनी करणार आहे. पुणे विभागात केवळ इंदापूर आगारात हा पंप बांधण्यात येणार आहे. यासाठी मोठी जागा लागते. शिवाय अन्य काही तांत्रिक कारणांमुळे स्वारगेटसारख्या महत्त्वाच्या आगारात ही सुविधा उपलब्ध नसेल. वर्षाला २३४ कोटी रुपयांची बचत

● 'एलएनजी'च्या वापरामुळे प्रदूषण होणार नाही

● डिझेलच्या तुलनेत 'एलएनजी'चे दर किमान सात रुपयांनी कमी आहे-महामंडळाची दरवर्षी २३४ कोटी रुपयांची बचत होणार डिझेलच्या एक लिटरमध्ये एसटी चार ते साडेचार किलोमीटर धावते'एलएनजी'वर एसटी प्रतिकिलो ५.५ किलोमीटर धावेल

● -एसटी प्रशासनाला मोठा फायदा होईल.

## पुजा खेडकरांना दिलासा

पद्धतीने ओबीसी आणि दिव्यांग सवलत घेतल्याचा आरोप आहे. सध्या त्या अंतरिम जामिनावर आहेत.पूजा खेडकर यांच्या जामीन अर्जालाही युपीएससीने विरोध केला होता. खेडकर यांनी फक्त आयोगाचीच फसवणूक केलेली नाही तर जनतेचीही फसवणूक केलेली आहे, असे युपीएससीने म्हटले होते. जुलै महिन्यात युपीएससीने त्यांची प्रोबेशनवरील उमेदवारी रद्द केली होती. खेडकर यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. अखेर केंद्र सरकारने सात सप्टेंबर रोजी पूजा खेडकर यांना भारतीय प्रशासकीय सेवेतून कार्यमुक्त केले होते. आयएएस (प्रोबेशनरी) नियम १९५४ च्या नियम १२ अन्वये त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली होती.

## धर्मा-धर्मात भिडवणे काँग्रेसची पॉलीसी

बच्चू कडू यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केलाय. छत्रपती संभाजीनगरमध्ये काल दि.२६ तिसऱ्या आघाडीची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, लोक जातीपातीत गुंतवून ठेवले आहेत, एका एका मतदारसंघात 100 कोटी खर्च होण्याची शक्यता आहे. आम्ही छत्रपतीचे भक्त आहेत. ज्याने भाव दिला नाही त्यांना आमचे मत नाही. काँग्रेसला वाटते दलित मुस्लिम आमच्यासोबत आहे आणि भाजपला वाटते हिंदू आमच्यासोबत आहे, पण आमच्यासोबत शेतमजूर आहे. डोक्यात बदलाची आग आहे, आणि बदला घायचा आहे. आमच्यावर आरोप केले जातील, भाजपची बी टीम म्हटले जाईल.

## काँग्रेसमध्ये पुन्हा वादाची शक्यता ?

काँग्रेसचे विद्यमान शहराध्यक्ष अरविंद शिंदे, पुण्याच्या पहिल्या महिला महापौर कमल व्यवहारे या कसबा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. अरविंद शिंदे यांना कार्यकर्त्यांकडून भाऊ तसेच भाई देखील म्हंटले जाते. तर कमल व्यवहारे या ताई नावाने सर्वत्र परिचित आहेत. या दोन्ही नेत्यांना टार्गेट करून धंगेकर यांच्या कार्यकर्त्यांकडून हे फ्लेक्स लावण्यात आल्याची चर्चा रंगलीय.

## 'तो' अभियंता पोलीसांच्या ताब्यात

रद्द करण्यात आला.

गुरुवारी सकाळी एका अभियंता तरुणाने "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाचवा..., त्यांना मदत करा", असा कॉल आपत्कालीन नियंत्रण कक्षाला केला. या कॉल नंतर राज्य पोलीस दलात एकच खळबळ उडाली. तांत्रिक तपासाद्वारे हा तरुण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील थेरगाव परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, काही मिनिटातच वाकड पोलिसांनी बस थांब्यावर बसची वाट पाहत असलेल्या तरुणाला ताब्यात घेतले. तरुण मूळचा उदगीर येथील असून तो थेरगाव येथे त्याच्या मित्राकडे आला होता.

अभियंता तरुणाने असा कॉल का केला. तसेच, त्याच्याकडे नेमकी काय माहिती आहे, याची कसून चौकशी सुरू आहे. पोलिसांसह राज्य दहशतवाद विरोधी पथकाने देखील या कॉलची गंभीर दखल घेतली असून त्यांच्याकडून देखील समांतर चौकशी सुरू आहे.

## राज्य सरकारची...

परवानगीशिवाय कर्नाटकमध्ये तपास करू शकत नाही. मंत्रिमंडळाच्या या निर्णयानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना कायदामंत्री एच.के.पाटील म्हणाले की, आम्ही राज्यातील सीबीआय तपासासाठी दिलेली खुली परवानगी मागे घेत आहोत. तसेच, आम्ही सीबीआयच्या गैरवापराबद्दल चिंतित आहोत.

## विधानसभा निवडणुका ...


या दोघांबरोबर चर्चा करून पुणे महापालिकेतील समाविष्ट गावांच्या मालमत्ता कराचा प्रश्न मार्गी लावला जाईल. लोकसभेच्या निवडणुकीनंतर प्रश्न मार्गी लावणार असल्याचे सांगितले होते, मात्र इतर कामांच्या व्यापामध्ये राहून गेले. परंतु आता तातडीने हा प्रश्न मार्गी लावू. तेरा तालुक्यांसह पुणे शहरामध्ये डीपीसीचा व्यवस्थित निधी दिलेला आहे.खासदार आणि आमदार हे डीपीसीला निमंत्रित आहेत. त्याच्यामुळे त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे.योजना मंजूर करताना आम्ही पक्ष म्हणून विचार करत नाही. राज्यसरकारचे प्रतिनिधित्व करत आहोत

### इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली

# आळंदीतील नदी प्रदूषणाचा विषय ऐरणीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** आळंदी येथून वाहणाऱ्या इंद्रायणी नदीला प्रदूषणामुळे ग्रासले आहे. हे ग्रहण सुटता सुटत नसल्याने भाविक व नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. गेल्या दोन महिन्यांत अनेक वेळा प्रदूषणाने नदी फेसाळली असून यात बुधवारी (दि. २५) पुन्हा इंद्रायणी नदीचे पाणी फेसाळले. पुलावर फेसाळलेली नदी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. तसेच नागरिकांनी सेल्फी घेत सोशल मीडियावर आळंदीतील नदी प्रदूषणाचा विषय ऐरणीवर आणला. पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पीएमआरडीएकडून इंद्रायणी सुधार प्रकल्प हाती घेण्याच्या घोषणा कागदावरच राहिल्या आहेत.



आळंदी-देहूसह पुण्यातील नद्या प्रदूषणमुक्त होण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने प्राधान्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिक, भाविक सतत म्हणत असतात. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या इंद्रायणी नदीचे पावित्र्य जोपासण्यास तत्काळ उपाय योजना हाती घेण्याची मागणी नमामि इंद्रायणी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश रहाणे, आळंदी जनहित फाउंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र घुंडरे पाटील यांनी केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ई- मेल द्वारे इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त व्हावी, यासाठी निवेदन देण्यात आले आहे.

जिल्ह्यातील नद्या प्रदूषण मुक्त होण्यासाठी निवडणूक आचार संहिता लागू होण्यापूर्वी प्रभावी निर्णय घेऊन विकास कामांना मंजूरी द्यावी. सांडपाणी थेट नदीत जाऊ नये यासाठी इंद्रायणी नदीच्या दुतर्फा नाली विकसित करण्याचे काम सुरू व्हावे अशी मागणी आळंदीकरांनी केली आहे. या वर्षामध्ये वारंवार फेसाळणारी इंद्रायणी आणि प्रदूषणामध्ये होणारी वाढ लक्षात घेता स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. केवळ आश्वासन आणि पाहणी दौरा करून कोणताही प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे प्रशासनावर कोणताही विश्वास राहिला नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

#रा

### मेधा सोमय्या यांनी भरला होता अब्रुनुकसानीचा खटला

# संजय राऊत न्यायालयात दोषी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांनी दाखल केलेल्या अब्रुनुकसानीच्या खटल्यात ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना न्यायालयाने दोषी ठरवले आहे. या प्रकरणी राऊत यांना १५ दिवसांची कैद सुनावण्यात आली आहे. २५ हजारांचा दंडही आकारण्यात आला आहे. शिवडी कोर्टाने हा निकाल दिला आहे. त्यानंतर लगोलग संजय राऊत यांचा अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे. १५ हजारांच्या जातमुचलक्यावर राऊतांना जामीन मंजूर झाला आहे. ३० दिवसांच्या आत वरच्या कोर्टात अपिल करून दाद मागण्याची मुभाही कोर्टाकडून देण्यात आली आहे.

मीरा भाईंदर शौचालय प्रकरणात राऊत यांनी मेधा सोमय्यांवर आरोप केला होता. मेधा सोमय्या शौचालय घोटाळ्यात सहभागी असल्याचा आरोप त्यांनी केला होता. याविरोधात मेधा सोमय्या यांनी शिवडी कोर्टात अब्रुनुकसानीचा खटला दाखल केला होता. या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होऊन न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. आज न्यायालयाने संजय राऊत दोषी असल्याचा निकाल दिला.

१५ दिवसाची कैद असल्याने संजय राऊत जामीनास पात्र आहेत. त्यानंतर आता संजय राऊत यांना रितसर न्यायालयासमोर हजर व्हावे लागेल. ते स्वत:ला सरेंडर करतील. त्यानंतर कोर्ट त्यांना जामीन मंजूर करण्याची शक्यता आहे. सुनावणीवेळी संजय राऊत कोर्टात उपस्थित नव्हते.

निकालानंतर मेधा सोमय्या म्हणाल्या की, आजही भारतातील न्यायव्यवस्था रामशास्त्री प्रभुणे यांच्या पावलावर पाऊल टाकून चालत आहे. कुटुंबावर, मुलावर कोणी आँच आणायचा प्रयत्न केला तरी एक सामान्य गृहिणी कशी लढेल, तशीच मी लढले. मला न्यायालयाने योग्य तो न्याय दिला आहे.

#### १०० कोटींचा मानहानीचा दावा

● शौचालय घोटाळा आरोपाचे पुरावे द्यावेत असे आव्हान किरीट सोमय्या यांनी संजय राऊत यांना दिले होते. मात्र संजय राऊत यांनी कोणतेही पुरावे न दिल्याने मेधा सोमय्या यांनी संजय राऊत यांच्यावर १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केला होता. संजय राऊत यांना यापूर्वीच मानहानी, बदनामीची नोटीस दिली आहे. मुलुंड पोलिस स्टेशन येथे तक्रार ही दाखल केली आहे. संजय राऊत यांनी फक्त भीतीसाठी, बदनाम करण्यासाठी हा अपप्रचार केला आहे, असा आरोप किरीट सोमय्या यांनी केला होता.

राष्ट्रसंचार वीजनिर्मिती रा

## पंप स्टोरेज क्षेत्रात तीन मोठे करार

### १५ हजार मेगावॅट वीजनिर्मिती

**मुंबई :** जलसंपदा नियामक मंडळाच्या बैठकीत पंप स्टोरेज क्षेत्रात तीन मोठे करार करण्यात आले आहेत. जलसंपदा विभाग आणि एसजेव्हीएन लि., मेघा इंजिनिअरिंग, जेएसडब्ल्यू निओ एनर्जी यांच्यात हे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. राज्यात एकूण १५ हजार १०० मेगावॅट इतक्या वीजनिर्मितीसाठी हे करार करण्यात



आली असून त्या माध्यमातून ८२ हजार २९९ कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे. राज्यात होणाऱ्या या गुंतवणुकीमधून जवळपास १८ हजार ४४० जणांना रोजगार मिळणार आहे. आतापर्यंत राज्यात एकूण ५५ हजार ९७० मेगावॅट वीजनिर्मितीसाठी करार करण्यात आले आहेत. ज्यात एकूण ३ लाख कोटींची गुंतवणूक होणार आहे तर ९० हजार ३९० रोजगार निर्मिती होणार आहे. राज्यात पारंपरिक ऊर्जा क्षेत्रातून वीजनिर्मितीसाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. महाजेनको आणि एसजेव्हीएन यांच्यात लोअर वर्धा येथे ऊर्जा प्रकल्प होणार असून ३०३० कोटी गुंतवणूक, तर १४०० जणांना रोजगार मिळणार आहे. मुन्बैत आरईसी पॉवर ३००० कोटींची गुंतवणूक करणार असून याद्वारे १६६३ जणांना रोजगार मिळणार आहे. टीएचडीसीआयएल इंडिया २९३२५ कोटी गुंतवणूक करून ग्रीन हायड्रोजन प्रकल्प उभारत १४१३० जणांना रोजगार देणार आहे. एचपीआरजीएल आणि एचपीसीएल यांच्या ग्रीन हायड्रोजन प्रकल्पात १२००० कोटींची गुंतवणूक केली जाणार असून १६३५ जणांना रोजगार मिळणार आहे.

» Selected

## कारच्या धडकेत दोन ठार

**नाशिक** : नांदगाव-मनमाड रस्त्यावर दोन कारची समोरासमोर धडक झाल्याने दोन जण जागीच ठार झाले असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात गाड्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. हिरेनगर शिवारात गुरुवारी सकाळी हा अपघात झाला असून मृत व जखमी जळगाव जिल्ह्यातील पाचोरा व नाशिक जिल्ह्यातील मोहाडी या गावातील आहेत. अपघातानंतर तातडीने पोलीस व आमदार सुहास कांदे यांच्या कार्यकर्त्यांनी जखमींना रुग्णवाहिकेद्वारे शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलविले. जखमींना प्राथमिक उपचारानंतर मालेगाव येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. शिवाजी भास्कर देशमुख (६०, रा. मोहाडी, जि. नाशिक) व उषा नारायण महाजन (६०, पाचोरा, जि. जळगाव) अशी मृतांची नावे आहेत. आशा शिवाजी देशमुख, विकास शिवाजी देशमुख, गयाबाई आदिक देशमुख व नारायण सुकदेव महाजन अशी जखमींची नावे आहेत.

## धनगर समाजाच्या आंदोलकांची जलसमाधी?

**नगर** : नेवासा फाटा येथे गेल्या नऊ दिवसांपासून धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी उपोषण सुरु आहे. मात्र सरकार या आंदोलनाची दाखल घेत नसल्याने जलसमाधीचा इशारा आंदोलकांकडून देण्यात आला. त्यातच आता दोन आंदोलक उपोषणस्थळावरून गायब झाल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे. या आंदोलकांनी धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी जलसमाधी घेण्याचा इशारा दिला होता. यानंतर आता दोन आंदोलक बेपत्ता झाले आहेत. प्रल्हाद सोरमारे आणी बाळासाहेब कोळसे अशी या आंदोलकांची नावे आहेत. आम्ही जलसमाधी घेत आहोत. यास सर्वस्वी सरकार जबाबदार अशा मजकुराची चिठ्ठी जिल्ह्यातील प्रवरासंगम येथील गोदावरी नदीकाठी आढळून आली आहे. दोघांचे फोन देखील नॉट रीचेबल असून गोदावरी नदीकाठच्या पुलावर चपला आढळल्या आहेत.

## सीआरपीएफ केंद्रावरून वाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नगर :** कर्जत-जामखेडमध्ये आमदार रोहित पवार यांना सीआरपीएफ केंद्रावर पोलिसांनी अडवले. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये बाचाबाची झाली.

जामखेड तालुक्यात सीआरपीएफ केंद्राचे लोकार्पण वादात सापडले आहे. केंद्राबाहेर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला. रोहित पवार यांच्या कार्यकर्त्यांकडून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी आमदार राम शिंदे यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

कुसडगावामध्ये एसआरपीएफ केंद्राच्या लोकार्पणाला प्रशासनाचा विरोध आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि माजी परिवहन मंत्री अनिल परब यांच्या हस्ते हे लोकार्पण होणार होतं.

### संभाजीराजे छत्रपती यांची टीका

# आमच्या आयुष्याचा खेळ केला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी पक्ष यामुळे मी गोंधळून गेलो आहे. गाव दोन नावांचे असतात, तसे कोण आहेत? राष्ट्रवादी खुर्द कोण आहेत ? राष्ट्रवादी बुद्रुक कोण आहे? शिवसेना खुर्द आणि शिवसेना बुद्रुक कोण? हे का जनतेच्या हितासाठी झाले का? तुम्ही आमच्या आयुष्याचा खेळ केला, अशी टीका संभाजीराजे छत्रपती यांनी केली.



महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षांमध्ये प्रचंड राजकीय उलथापालथीच्या घटना घडल्या आहेत. या घटनांमुळे महाराष्ट्रात दोन बड्या प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पडली. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांमध्ये मोठी फूट पडली. यानंतर राज्यात विधानसभेची निवडणूक जवळ आली आहे. दोन पक्षांचे चार पक्षांमध्ये रुपांतर झाल्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच वेळ आहे. सध्या महाराष्ट्रात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे काही छोटे पक्ष आणि संघटना तिसरी आघाडीसाठी प्रयत्न करत आहेत. यामध्ये छत्रपती घराण्याचे कोल्हापूर गादीचे वंशज संभाजीराजे छत्रपती यांचा स्वराज्य पक्ष आणि आमदार बच्चू कडू यांचा प्रहार जनशक्ती पक्ष नवी राजकीय क्रांती घडवण्याच्या तयारीत आहेत. या दोन्ही नेत्यांमध्ये बैठकही पार पडली आहे. यानंतर संभाजीराजे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना सध्याच्या राजकीय परिस्थितीवर मिश्किलपणे भाष्य केले.

ते म्हणाले, आमदार बच्चू कडू आणि माझी मुंबईत नावीन्यपूर्ण महाराष्ट्र घडवण्याचा प्रयत्न करू, अशी चर्चा झाली. ही चर्चा सुरु असताना शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी एकत्र आलो.

'तुम्ही किल्ल्यांसाठी किती पैसे दिले हे सांगा. ७५ वर्षात फक्त १ कोटी खर्च. फक्त शिवाजी महाराजांचे नाव घ्यायचे. राजकोट किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा पुतळा बसवला तेव्हा मी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहिले होते.

# 'एवढे अकार्यक्षम मुख्यमंत्री पाहिले नाहीत'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एवढे अकार्यक्षम मुख्यमंत्री महाराष्ट्राने कधीच पाहिले नाहीत, अशा शब्दात शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर टीकास्त्र सोडले.

ते म्हणाले की, शिंदे म्हणतात, पुढल्या एक दोन वर्षांत मुंबई पॉटहोल मुक्त करू, पण ही तर त्यांची जुनीच टेप आहे. जवळपास अडीच वर्षांपासून त्यांचं हे घटनाबाह्य सरकार सत्तेवर आहे, गेल्या वर्षीचा किंवा या वर्षीचा रस्ता घोटाळा असेल, दोन्ही आम्ही एक्स्पोज केले. पण अजूनही रस्ते खोदून ठेवले आहेत, अर्धा किलोमीटर देखील रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम झालेले नाही असे सांगत ठाकरे यांनी सरकारवर हल्लाबोल केला.

त्यांनी अनेक मुद्यांवरून सरकारवर निशाणा साधला. संध्याकाळपासून महाराष्ट्रात, मुंबईत जोरदार पाऊस झाला. काही मिनिटांच्या पावसात राज्यात, मुंबईतही अनेक भागांत पाणी साचलं, लोकांचे हाल झाले. मुंबई असो किंवा ठाणे, पुणे या शहरांकडे लक्ष देण्यासाठी कोणीही नाही. तेथे वॉर्ड ऑफिसर नेमलेले नाहीत. मुंबई अक्षरश: ठप्प झाली. अनेक ठिकाणी ट्राफिक कोंडी झाली, रेल्वेतून प्रवास करणाऱ्यांचे हाल झाले.

#### राऊत स्वत: लढत आहेत

● शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांना न्यायालयाने अब्रुनुकसानीच्या खटल्यात दोषी ठरवत १५ दिवसांच्या कैदेची शिक्षा आणि २५ हजार रुपयांचा दंडही ठोठावला. याबद्दल आदित्य ठाकरे यांना प्रश्न विचारण्यात आला असता ते म्हणाले, संजय राऊत कशालाही घाबरत नाहीत. ते त्यांचं उत्तर देतील. ते स्वतः लढत आहेत.

# पालघर, कोकणात आघाडीत धुसफुस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणूक जागावाटपावरून रस्सीखेच, धुसफुस, नाराजी पाहायला मिळत आहे. पालघर जिल्ह्यात ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे.

ठाकरे गटाच्या पदाधिकारी, शिवसैनिकांकडून स्वतःच्याच पदाधिकाऱ्यांविरोधात आक्रोश सभा घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील विविध विधानसभा क्षेत्रातील अनेक स्थानिक पदाधिकारी, सहसंपर्कप्रमुख आणि उपनेत्या ज्योती ठाकरे यांच्या विरोधात नाराजी आहे. ठाकरे गटातील स्थानिक शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांकडून वरिष्ठ नेत्यांविरोधात आक्रोश सभा घेण्यात येणार आहे



पालघरच्या स्थानिक शिवसैनिकांमध्ये ज्योती ठाकरे भांडण लावत असल्याचा शिवसैनिकांचा आरोप आहे. तसेच पालघर जिल्ह्यातील अनेक वरिष्ठ पदाधिकारी शिंदे गटाला मदत करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ऐन विधानसभा निवडणुकी अगोदर अनेक पद बदलण्यात आली मात्र शिवसैनिकांना विश्वासात न घेतल्याचे शिवसैनिकांचे म्हणणं आहे.

बारामतीत काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या बॅनरची जोरदार चर्चा होत आहे. काँग्रेस पक्षाचा बारामतीचा आमदार व्हावा अशी बॅनरमधून इच्छा व्यक्त केली आहे. बॅनरवर भावी पंतप्रधान म्हणून राहुल गांधी यांचा तर भावी मुख्यमंत्री म्हणून नाना पटोले यांचा उल्लेख करण्यात आला आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून वर्षा गायकवाड यांचा तर भावी गृहमंत्री म्हणून रविंद्र धंगेकरांचा बॅनरवर उल्लेख करण्यात आला आहे. बॅनरमधून बारामती विधानसभेच्या राष्ट्रवादीच्या उमेदवाराला केला विरोध जात आहे. या अगोदरही निलेश गजरमल यांनी पक्षश्रेष्ठींना पत्र लिहीत बारामती विधानसभेसाठी काँग्रेसचा उमेदवार देण्याची मागणी केली होती.

रत्नागिरी- कोकणातल्या तीन जागांवरून महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरु आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तीन जागांवर दावे - प्रतिदावे केले जात आहेत.

## पावसाच्या सरी...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



» मुंबई आणि उपनगरात गुरुवारी देखील पावसाच्या सरी बरसल्या. मात्र, बुधवार पेक्षा पावसाचा जोर कमी असल्याने रस्त्यावरील रहदारी व्यवस्थित सुरू होती.

## गंज, वेल्डिंगमुळे पुतळा कोसळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सिंधुदुर्ग :** राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या दुर्घटनेप्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीने अहवाल राज्य सरकारकडे सादर केला आहे. गंज, कमकुवत फ्रेम आणि चुकीच्या वेल्डिंगमुळे शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याचे या अहवालात नमुद करण्यात आले आहे. पुतळा तयार करताना, त्याची डिझाईन योग्य पद्धतीने तयार केली नसल्याचाही अहवालात उल्लेख आहे.

भारतीय नौदलात वीस वर्षांहून अधिक अनुभव असलेले कमोडोर पवन धिंग्रांच्या अध्यक्षतेखाली, पाच सदस्य समितीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, बांधकाम विभागाचे माजी मुख्य अभियंता विकास रामगुडे, आयआयटीचे प्रा. जांगिड, प्रा. परिदा यांचा समावेश होता. हा अहवाल आल्यानंतर राज्य सरकार दोषींवर नक्की कारवाई करेल अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली.

### अजित पवार यांनी पुन्हा बोलून दाखवली इच्छा

# मुख्यमंत्री व्हायचे आहे, पण..

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी पुन्हा एकदा एका कार्यक्रमामध्ये मुख्यमंत्री पदाबाबतची इच्छा बोलून दाखवली आहे. त्यांनी सांगितले की, मला मुख्यमंत्री व्हायचे आहे, पण वारंवार उपमुख्यमंत्रीपदावर अडकतो.

पवार म्हणाले, 'मला मुख्यमंत्री व्हायचे आहे, पण मी पुढेच जात नाही. मला संधी मिळत नाही. २००४ मध्ये राष्ट्रवादीला मुख्यमंत्री करण्याची संधी होती, पण पक्षाने ती गमावली. तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद काँग्रेसच्या खात्यात आले. यावेळी त्यांनी महायुती म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्यातील जागावाटपावरही भाष्य केले.





२००४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. त्यावेळी पक्षाला ७१ जागा मिळाल्या होत्या. तर काँग्रेस ६९ जागांवर विजय मिळवत दुसऱ्या क्रमांकावर होता. त्यानंतर काँग्रेस नेते विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले.

२०१९ मध्ये अविभाजित राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेससोबत आघाडी करून निवडणूक लढवली होती. त्याच वेळी भाजप आणि नंतर अविभक्त शिवसेना एकत्र होते. भाजपने १६४ जागा लढवत १०५ जागा जिंकल्या. तर शिवसेनेने १२६ पैकी ५६ जागा जिंकल्या. त्यानंतर राष्ट्रवादी ५४ जागा जिंकून दुसरा सर्वात मोठा पक्ष ठरला तर काँग्रेसला ४४ जागा मिळाल्या.

#### २०० जागांवर फॉर्म्युला स्पष्ट

● २०१९ मध्ये पक्षाने जिंकलेल्या जागांच्या आधारे जागावाटप केले जाईल, असे पवार यांनी कार्यक्रमात बोलताना सांगितले. ते म्हणाले, 'भाजप २०१९ मध्ये जिंकलेल्या जागांवर निवडणूक लढवेल. राष्ट्रवादी आणि शिवसेनेचेही तेच होईल. अशा स्थितीत २०० जागांवर जागावाटपाचा फॉर्म्युला स्पष्ट झाला आहे. उर्वरित ८८ जागांवर महायुतीत चर्चा केली जाईल.'

#रा

### जयंत पाटील यांची अकोलेत माहिती

# आघाडीचे जागा वाटप एक रोजी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अकोले :** एक तारखेला महाविकास आघाडीच्या जागा वाटपावर शिक्कामोर्तब होणार आहे. आम्हाला आघाडी टिकवायची आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील केले.

विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. सर्वच राजकीय पक्षांकडून विधानसभेसाठी तयारी सुरु आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाने राज्यभरात शिवस्वराज्य यात्रेचे आयोजन केले आहे. ही यात्रा अकोले येथे धडकली. या यात्रेच्या जाहीर सभेतून बोलताना पाटील म्हणाले की, आगामी निवडणुकीत आपला उमेदवार निवडून यावा, यासाठी तुमचा उत्साह गरजेचा आहे. महाराष्ट्रातील ३१ खासदार दिल्लीला आपण



पाठवले. भाजपाला लक्षात आले आता त्यांचं सरकार येणार नाही. त्यामुळे तिजोरीचे दार उघडून पाहिजे तशा घोषणा केल्या जात आहेत. सव्वा लाख कोटींचं कर्ज आम्हाला द्या, अशी मागणी सरकार आरबीआयकडे करत आहे. त्यांची लाडकी खुर्ची सोडेपर्यंत राज्यावर सव्वानऊ लाख कोटींचे कर्ज हे सरकार करणार आहे, असा हल्लाबोल त्यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, हे सरकार थकबाकीत गेलं आहे. सरकारने अनेक जीआर काढले मात्र काम होतील की नाही ही शंका आहे. आदिवासींच्या खात्यातून पैसे काढून या योजना सध्या हे सरकार चालवत आहे. हे सरकार केवळ पैशांची उधळपट्टी करत आहे. केवळ ठेकेदारांसाठी या योजना केल्या जात आहेत, असा निशाणा पाटील यांनी यावेळी महायुती सरकारवर साधला. अमित भांगरे यांचे नाव न घेता जयंत पाटील यांनी उमेदवारीच जाहीर केली.

सध्या पितृपक्ष सुरू आहे. घट बसल्यावर मुहूर्त आहे. त्यामुळे उमेदवाराची घोषणा तेव्हाच होईल. शेतीमालाचे भाव वाढू द्यायचे नाही ही भाजपची रणनीती आहे. कांद्याला भाव वाढला की हे लगेच कांदा आयात करतात. त्यामुळे ४०० पार जाणारे लोक २४० वर थांबले. चंद्राबाबू व नितेश कुमार यांचा टेकू घेऊन सरकार स्थापन केले. पुढच्या वर्षभरात हे दोघेही पलटी मारतील.

## हित जपण्यापेक्षा मार्केटिंग करण्यात विश्वस्त मंडळ मश्गुल

# माजी विश्वस्तांसह कांग्रेस पदाधिकार्यांचा आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी:** जेजुरी येथील खंडेरायाच्या मंदिर गडकोट आवाराचे व्यवस्थापन आणि जत्रा यात्रा उत्सवांसह धार्मिक विधींचे नियोजन करणारे आणि सुमारे दीड वर्षांपूर्वी सहधर्मादाय आयुक्त यांनी नियुक्त केलेले सात जणांचे विश्वस्त मंडळ हे ग्रामस्थांना विश्वासात न घेता कार्यरत असून दीड वर्षात कोणताही ठोस निर्णय घेता आला नाही .सर्वात धक्कादायक बाब म्हणजे देवसंस्थानच्या भक्तनिवासचा वापर लोकसभेच्या वेळी राजकीय पक्षाच्या बैठकीसाठी करण्यात आला .तसेच देवसंस्थानच्या हिताचे निर्णय घेण्यापेक्षा स्वतःला उच्चविध्याविभूषित अशी बिरुदावली मिरवणारे प्रसिद्धी आणि मार्केटिंग करण्यात विश्वस्त मंडळ मश्गुल असल्याचा आरोप कांग्रेसचे माजी नगरसेवक हेमंत सोनवणे ,देवसंस्थानचे माजी प्रमुख विश्वस्त पंकज निकुडेपाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला आहे.

गुरुवारी (दि.२६)झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये सोनवणे व निकुडेपाटील यांनी देवसंस्थानवर अनेक गंभीर आरोप केले आहेत. सध्याचे विश्वस्त मंडळ हे सत्ताधारी भाजपा व आरएसएस संघाशी निगडित आहे .खंडोबा मंदिर हे धार्मिक स्थळ आरएसएस चे केंद्रबिंदू बनवायचे आहे काय? न्यासावर चार विश्वस्त वाढीची ग्रामस्थांची मागणी होती त्यासाठी मोठे आंदोलन उभारण्यात आले होते विश्वस्त वाढीची घटनेत तरतूद नाही. याबाबत धर्मादाय कार्यालयात घटना दुरुस्तीची सुनावणी प्रलंबित असताना धार्मिक न्यासाचा कोणताही अनुभव नसलेल्या मात्र संघाचे सदस्य असलेल्या एका व्यक्तीची व्यवस्थापक पदी निवड करण्यात आली .ही सुद्धा घटनाबाह्य आहे.

जानेवारी २०२४ पासून टेंडर प्रक्रिया आणि विना टेंडर प्रक्रिया राबवत केलेल्या खर्चाची माहिती "माहिती अधिकारात "मागविण्यात आली आहे.देवसंस्थानवर नियुक्त करण्यात आलेल्या विश्वस्तांला वैयक्तिक फंड नसतो .सर्वसामान्य भाविक भक्तांच्या देणगी दानावर मंदिराचा कारभार चालतो मात्र प्रसार माध्यमांवर स्वतःच्या मतदार संघात "वैयक्तिक फंड" असे नाव देत देवसंस्थांचा निधी खर्च केला जातो.

### देवसंस्थान विश्वस्त मंडळ पारदर्शक कारभारासाठी बांधील -प्रमुख विश्वस्त अनिल सौन्दडे

● विश्वस्त मंडळावर झालेल्या आरोपांबाबत प्रमुख विश्वस्त अनिल सौन्दडे यांच्याशी संपर्क साधून माहिती घेतली असता .गेली दीड वर्षापासून कोणतेही मतभेद न ठेवता सातही विश्वस्त भाविकभक्तांच्या सोयीचे व हिताचे निर्णय घेत आहेत.धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून मार्गदर्शन घेऊनच एका व्यक्तीची व्यवस्थापकपदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.देवसंस्थांनच्या तिजोरीतून पारदर्शकपणे नियम घटनेच्या अधीन राहून खर्च केला जात आहे.सरसंघचालक मोहन भागवत यांची अचानक जेजुरी भेट ठरली त्यामुळे त्यांच्या केंद्रीय सुरक्षेच्या अनुषंगाने येथे खर्च करणे अपरिहार्य होते.ग्रामस्थांच्या व भाविकांच्या सूचना व मार्गदर्शनाचा आदर करत पुढील काळात अनेक विकासकामे मार्गी लावणार असल्याचे अनिल सौन्दडे यांनी सांगितले.

## रांजणगावात चक्कर येऊन पडल्याने मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** रांजणगाव गणपती ता. शिरुर येथील सोनेसांगवी रोड लगत असलेल्या पार्किंग मध्ये लक्ष्मण म्हस्के यांना चक्कर आल्याने ते खाली कोसळले, यावेळी शेजारील नागरिकांनी त्यांना उपचारासाठी जवळील रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी लक्ष्मण बाबाराव म्हस्के वय ३५ वर्षे रा. बाबुरावनगर शिरुर ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. भटसावली ता. हिंगोली जि. हिंगोली यांचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे घोषित केले, याबाबत दिलीप म्हस्के यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने आकास्मात मृत्यू प्रकरणी नोंद केली.

## पाबळमध्ये पाईपलाईनच्या वादातून युवकाला मारहाण

**शिक्रापूर** : पाबळ ता. शिरुर येथील थापेवाडी येथे शेतातील पाईपलाईन खोदण्याच्या वादातून एका युवकाला मारहाण करण्यात आल्याची घटना घडल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे प्रणव काळुराम गव्हाणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पाबळ ता. शिरुर येथील थापेवाडी येथे प्रणव गव्हाणे हा प्रवीण गव्हाणे यांच्या शेतात पाईपलाईन साठी शेतात खोदत असल्याचे दिसल्याने प्रवीण याने आमच्या शेतात कशाला खोदुन पाईपलाईन करतो यापूर्वी सुद्धा तुला सांगितले आहे, असे म्हटल्याने प्रणव याने शिवीगाळ, दमदाटी करत प्रवीणला हातातील खोऱ्याने मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली, याबाबत प्रवीण कारभारी गव्हाणे वय ३५ वर्षे रा. थापेवाडी पाबळ ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी प्रणव काळुराम गव्हाणे रा. थापेवाडी पाबळ ता. शिरुर जि. पुणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संतोष शेळके हे करत आहे.


AAER'S
**ASIAN COLLEGE OF SCIENCE & COMMERCE**
Affiliated to Savitribai Phule Pune University & Approved by Govt. of Maharashtra

**Walk in Interview**

The application are invited for the following posts are purely Adhoc and Tamporary basis to be filled in the following Institution of **"ASIAN Academy of Education & Research, Pune's"** (ASIAN College of Science & Commerce)

| Sr. No. | Name of the Post | Subject | Post | Which Category Reservation |
|---|---|---|---|---|
| 2. | Assistant Professor | English | 01 | 01(open to all) |
| | | Marathi | 01 | 01(open to all) |
| | | Economics | 03 | 1 OPEN ,1SC,1DTA |
| | | Commerce | 06 | 2 OPEN ,1 SC, 1 OBC,1 EWS,1 DTA |
| | | Mathematics | 04 | 2 OPEN ,1 SC,1 DTA |
| | | Electronics | 04 | 2 OPEN ,1 SC,1 DTA |
| | | Chemistry | 02 | 1 OPEN , 1SC |
| | | Physics | 01 | 01(open to all) |
| | | Zoology | 01 | 01(open to all) |
| | | Botany | 01 | 01(open to all) |
| | | Microbiology | 02 | 1 OPEN , 1SC |
| | | Computer Science | 06 | 2 OPEN ,1 SC, 1 OBC,1 EWS,1 DTA |
| | | Management | 04 | 2 OPEN ,1 SC,1 DTA |
| | | BBA | 02 | 1 OPEN , 1SC |
| | | BBA(CA) | 02 | 1 OPEN , 1SC |
| | | M.COM | 02 | 1 OPEN , 1SC |
| | | M.SC.Electronics | 02 | 1 OPEN , 1SC |
| | | M.SC. Chemistry | 02 | 1 OPEN , 1SC |
| | | M.SC. Comp.Sci. | 04 | 2 OPEN ,1 SC,1 DTA |
| 3. | Librarian | | 01 | 01(open to all) |
| 4. | Physical Director | | 01 | 01(open to all) |

I) Qualifications, Experience & Pay Scales as per the S.P.Pune University/ UGC/ Govt. of Maharashtra rules, applicable from time to time. As per 8 March 2019 GR
II) Application along with Bio-data, two passport size photographs & attested copies of mark list etc.
**III) Walk in on date 28th September at 11.00 am**

PRESIDENT: **ASIAN ACADEMY OF EDUCATION & RESEARCH,PUNE**
S.No.28/15/16,Narhe –Dhayri Road, (Pari Company Chowk), Dhayri,Tal.: Haveli, Pune – 411041.
Ph.No.-**020-24690620/10,9975976605**
**E-mail:asianacademypune@gmail.com, www.asianacademypune.ac.in**

**President** **Secretary**


# शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेसाठी १२०९ विद्यार्थी प्रवीष्ठ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जेजुरी:** कला संचालनालयाद्वारे घेतल्या जाणा-या शासकीय रेखाकला परीक्षेला बुधवार (दि.२५)रोजी प्रारंभ झाला. एलिमेंटरी व इंटरमिजिएट या दोन श्रेणी स्वरुपाच्या उत्तीर्ण होणा-या विद्यार्थांना सवलतीचे वाढीव गुण दहावीच्या गुणपत्रकात मिळत असल्याने या परीक्षेला महत्व प्राप्त झाले आहे. पुरंदर तालुक्यातील जिजामाता हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज जेजुरी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यमंदिर,जेजुरी या परीक्षा केंद्रावर 23 विद्यालयातील एलिमेंटरी या परीक्षेसाठी 464 व इंटरमिजिएटसाठी 565 असे एकूण 1209 विद्यार्थी प्रवीष्ठ झाले असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव व केंद्राचे केंद्रसंचालक नंदकुमार सागर व प्राचार्य सुबोध गुरव यांनी दिली.

परीक्षेचे नियोजन पुरंदर तालुका कला शिक्षक संघाचे अध्यक्ष योगेश घोरपडे, सचिव मनोज सोनवणे,,श्रीमती बारभाई यांनी केले.



नितीन राऊत

नवरात्र उत्सवाची सर्वत्र चाहूल सुरू असून या पार्श्वभूमीवर देवींच्या मूर्तींवर रंगकाम करताना मूर्तिकार.

## नवरात्र उत्सवाची उत्कंठा; मूर्तीकारांची लगबग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** श्री गणेशाच्या विसर्जना नंतर देवीच्या आगमनाची चाहूल सर्वत्र आहे. घट स्थापने पासून नवरात्र उत्सवाला 3 ऑक्टोंबर पासून प्रारंभ होणार आहे. या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जेजुरीतील कुंभारवाड्यात देवींच्या मूर्तींवर रंगकामाचा शेवटचा हात देण्याची लगबग सुरू आहे. जेजुरीतील मूर्तिकार नीलम कुंभार परिवारातील सर्व महिला व पुरुष कलाकार मूर्ती साकार करण्यात दंग झाले आहेत.

तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत मूर्तिकार तुषार कुंभार परिवारात गेल्या चार पिढ्या पारंपरिक पद्धतीने व पर्यावरण पूरक श्री गणेशाच्या व देवींच्या मूर्ती तयार करून त्याची विक्री केली जात आहेत. श्री गणेशाच्या विसर्जना नंतर देवींच्या मुर्ती तयार करण्याला वेग आला असून सुबक,आकर्षक रंगरंगोटी करण्याचे काम सध्या सुरू आहे.

## अन्यायकारक करवाढीला अखेर...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




# चाकण पालिकेच्या वाढीव कर रचनेस स्थगिती राज्य शासनाचे निर्देश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** चाकण पालिकेने केलेल्या अन्यायकारक करवाढीला अखेर राज्य शासनाने स्थगिती दिली आहे. या बाबत महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने जिल्हाधिकारी पुणे व मुख्याधिकारी चाकण नगरपरिषद यांच्या नावे पत्रे पाठवून चाकण पालिकेच्या मालमत्ता संदर्भातील २०२२/२३ ते २०२५/२६ या चतुर्थ वार्षिक कालावधीसाठी निश्चित केलेल्या वाढीव कर रचनेस तूर्त स्थगिती देण्याबाबत शासनाचे निर्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

चाकण पालिकेने केलेल्या भरमसाठ करवाढीच्या विरोधात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे व त्यांच्या सहकार्यांनी निवेदन दिले होते. मुख्यमंत्र्यांनी या बाबत सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यानंतर नितीन गोरे यांच्या पत्राचा संदर्भ देत शासनाने वाढीव करवाढीस स्ठगीती दिली आहे.

चाकण पालिकेच्या हद्दीतील मिळकत धारकांना घरपट्टी व नळपट्टी मध्ये मागील वर्षी भरमसाठ वाढ करण्यात आली होती. पालिकेने दिलेल्या देयकांत नव्यानेच शिक्षण कर हा लावण्यात आला होता. शिक्षणकर खूप मोठ्या प्रमाणावर लावण्यात आल्याचा नागरिकांचा आरोप होता. चाकण पूर्वी स्थापन झालेल्या पालीकांत एवढा मोठा शिक्षण कर लावण्यात आलेला नाही. मात्र चाकण पालिकेने एवढा कर का लावला ? असा संतप्त प्रश्न नागरिक विचारात होते. मिळकतधारकांना त्यांच्या मिळकतीच्या एकूण किमतीवर सहा टक्क्यांप्रमाणे शिक्षण कराचा मोठा बोजा पडलेला असल्याच्या तक्रारी करून हा कर रद्द करण्याची मागणी करण्यात येत होती. मात्र पालिकेने पत्र देऊन सदरचा कर रद्द करता येणार नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी आंदोलने केली. दरम्यान नितीन गोरे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना चाकण नगरपरिषदेने केलेली कर आकारणी तसेच त्यात समाविष्ट केलेले इतर अनावश्यक कर कमी करून पुन्हा नव्याने कर आकारणी दर निश्चिती करून त्याप्रमाणे कर वसुली करण्यात यावी याबाबत सकारात्मक चर्चा करून निवेदन दिले होते. त्यानंतर आता शासनाने वाढीव कर रचनेस तूर्त स्थगिती देण्याबाबत निर्देश दिले आहेत.


**जाहिर नोटीस**
**अतिरिक्त विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे समोर**

क्र. आरटीएस/रि/पुणे/५९/२०२०
आयुक्त कार्यालय पुणे विभाग पुणे
विधानभवन, पुणे
दिनांक २३/०८/२०२४
संगणक क्र. २०२०/०००५९

१) श्री. महाराष्ट्र व्हॅली व्हयु प्रा.लि.,
युनिट नं. १०९, ११०, ११९, १२०, बोनांझा बिल्डींग ए, विंग
सहार प्लाझा कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०००५९. ....अर्जदार

**विरुध्द**
१. श्रीमती. गोरा कृष्णा दिघे ऊर्फ लक्ष्मीबाई दामू पठारे रा. तुंगी, लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे.
कु. मु. दिपनारायण आर मिश्रा
रा. वलवण लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे. २.राघू बाबु दिघे - रा.भांबुर्डे, ता. मुळशी, जि. पुणे.
३. श्री. लक्ष्मण कृष्णा दिघे म. वा
३अ - जिजाबाई लक्ष्मण दिघे ३क कृष्णा लक्ष्मण दिघे
३ब- भाऊ लक्ष्मण दिघे
३ड- राजू लक्ष्मण दिघे - सर्व रा. भांबुर्डे, ता. मुळशी, जि. पुणे.
४. फक्रद्दीन तैयब्बअली पेटीवाडा
रा. काळे कॉलनी, पो. पवना नगर, लोणावळा, ता. मुळशी, जि. पुणे.
५. श्रीमती दुरीया ताहीर परडीवाला - रा. औंधले खुर्द, ता. मावळ, जि. पुणे.
६. ताहीर फेटालभाई परडीवाला - रा. आँधले खुर्द, ता. मावळ, जि. पुणे.
७. श्रीमती. राजकुमारी ए. पाशीचीया
रा. ११ ड्रीम क्वीन, व्ही. पी. रोड, सांताक्रुझ (प), मुंबई - ४०००१४. ८. श्रीमती. इंदीरा फिलीप्स- मयत वारस तर्फे
८अ ) फिलीप्स विवेक डोनाल्ड
८अ) फिलीप्स शैलेश डोनाल्ड
दोघेही रा. ११ / ब, केनेड अपार्टमेंट, पाली हील रोड, युनीयन पार्क, खेर, मुंबई - ४०००५०. ८क) फिलीप्स राकेश डोनाल्ड
रा. ११/ब, केनेड अपार्टमेंट, पाली हील रोड, युनीयन पार्क, खेर, मुंबई - ४०००५०. ९. राकेश सेनन द्वारा सुरेंद्र सेनन - रा. १०२, गोल्फ लिंग, न्यु दिल्ली ०३.
१०. श्री. सुहास विलास गायकवाड
रा.५६/१८,१/२/२, घर नं. १८९, सम्राट अशोकनगर, वडगाव शेरी, जि. पुणे- १४.
११. श्रीमती. मधुबाई नानाजीभाई शैलेदीया
रा. जीरा, ता.धारी, ता. अमरेली, गुजरात.
१२. श्री. उमेश शंकर दिघे
रा. भांबुर्डे, ता. मुळशी, जि. पुणे.
१३. श्री. अशोक मोहन माकीजा
रा.परीहास बंगलो, १८ रोड, खेर, (प), मुंबई - ४०००५२. ...जाब देणार

मौजे भांबर्डे, ता. मुळशी, जि. पुणे येथील गट नं. ३१३ फेरफार क्र. १०४ बाबत अपर जिल्हाधिकारी पुणे यांचेकडील आदेश क्र. आरटीएस/२अ/१२१०/२०१६ दि.२८/११/२०१६ अन्वये दिलेल्या निर्णयाविरुध्द अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये रिव्हीजन अर्ज क्र. अ/पुणे / ५९ / २०२० दाखल केलेला आहे. सदर रिव्हीजन अर्जाचे अनुषंगाने सर्व जाब देणार यांना नोंदणीकृत पोहच डाकद्वारे अपिलार्थी यांनी नोटीसा बजावणेची कार्यवाही केलेली आहे. तथापी प्रकरणातील जाब देणार यांना नोटीस बजावणी झालेली नसल्याने सदरच्या नोटीसा परत आलेल्या आहेत, त्यामुळे जाहिर नोटीस करण्याची परवानगी मिळणेबाबत अर्जदार यांचे विधिज्ञांनी दिनांक.१३/०९/२०२४ रोजी विनंती अर्ज सादर करण्यात आलेला असुन अर्ज मंजुर करण्यात आलेला आहे.

सबब, या जाहीर नोटीसीव्दारे अर्जदार यांनी दाखल केलेल्या रिव्हीजन अर्जाची पुढील सुनावणी दिनांक ०४.१०.२०२४ रोजी सकाळी ११-०० वाजता अतिरिक्त विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयात, विधान भवन ( कौन्सिल हॉल) पुणे- ४११००१ येथे नेमण्यात आली आहे. तरी उपरोक्त तारखेस जाब देणार यांनी न्यायालयात समक्ष अथवा आपले कायदेशीर प्रतिनिधी मार्फत सुनावणीसाठी हजर रहावे. प्रस्तूतची नोटीस माझ्या सही शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

ठिकाण - पुणे-१
दिनांक. २५/०९/२०२४
शिक्का
**(कविता व्दिवेदी)**
**अतिरिक्त विभागीय आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे.**

**प्रतः** गावकामगार तलाठी भांबर्डे, ता. मुळशी, जि. पुणे यांनी सदरची जाहिर नोटीस आपल्या सजाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.


# फसवेगिरी करणाऱ्यांवर कारवाई करा; माथाडी कामगारांची फसवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती :** माथाडी कामगारांना इतर कामगारांपेक्षा जास्त कष्टाची कामे करावी लागत असतात, मात्र इतर कामगारांना मिळत असलेल्या सुविधांप्रमाणे या कामगारांना कोणत्याही सुविधा देण्यास कंपनी अथवा संबंधित ठेकेदार टाळाटाळ करतात. अशा कंपनी व ठेकेदारांवर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे. शासनाकडे माथाडी कामगारांसाठी अनेक कल्याणकारी योजना आहेत. मात्र, संबंधित माथाडींच्या ठेकेदाराकडून मिळत असलेल्या मलिद्यामुळे अनेक माथाडींच्या नोंदी माथाडी बोर्डाकडे केल्या जात नाहीत. परिणामी या माथाडी कामगारांना मिळणाऱ्या शासकीय सुविधांपासून वंचित ठेवण्याचे काम कंपनी प्रशासन व संबंधित ठेकेदारांकडून केले जात आहे. काही ठेकेदार हे माथाडी बोर्डाच्या अधिकारी वर्गालाच हाताशी धरून त्यांना चहापाणी करून कामगारांच्या हितापेक्षा आपले हित साधून घेण्यात धन्यता मानत आहेत. त्यामुळेही कामगारांना शासन पातळीवरील सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. त्याचबरोबर अमक्याच्या माथाडीत कामाला लावतो, एवढे पैसे द्या, शंभर टक्के काम होईल, अशी खात्री देऊन अनेक महाभागांनी ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील तरुणांना गंडवले आहे.

सुरवातीच्या काळात तीन ते चार लाख रुपये भरून अनेक जण माथाडीत कामाला लागले. काही काम नाही, नुसता बसून पगार मिळतो, फक्त गाड्या अडवायच्या आणि पावत्या फाडायच्या अशा प्रकारची जाहिरात सुरवातीला माथाडीत कामाला लागलेल्या कामगारांनी केल्याने माथाडीमध्ये कामाला लागण्यासाठी अनेक तरुणांनी घरातील चीज वस्तू, दागिने विकून पैसा उभा केला व कामाला लागले. मात्र नव्याचे नऊ दिवस संपताच या माथाडी कामगारांना वास्तवाची जाणीव झाली. मात्र वेळ आणि पैसा दोन्ही हातून निघून गेल्याने या कामगारांना आहे त्या स्थितीत काम करून जीवन जगण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. त्यामुळेच फसवेगिरी करण्यांवर कारवाई करण्याची मागणी आता होत आहे.

### प्रशासन फक्त कामगारांच्या टाळू वरील लोणी खाण्यातच व्यस्त

● माथाडीमध्ये कामाला लागण्यासाठी अनेक तरुणांनी घरातील चीज वस्तू, दागिने विकून पैसा उभा केला व कामाला लागले. मात्र नव्याचे नऊ दिवस संपताच या माथाडी कामगारांना वास्तवाची जाणीव झाली. मात्र वेळ आणि पैसा दोन्ही हातून निघून गेल्याने या कामगारांना आहे त्या स्थितीत काम करून जीवन जगण्याशिवाय गत्यंतर उरले नाही. मात्र एवढे असूनही कंपनी प्रशासन , माथाडी महामंडळ व माथाडीचा ठेकेदार या कामगारांच्या टाळू वरील लोणी खाण्यातच धन्यता मानत आहेत.




**निविदा नोटीस क्र.१**
**ग्रामपंचायत खडकी, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे**

जावक क्र. दि. / /२०२

खालील १५ वित्त निधी अंतर्गत कामांची सीलबंद निविदा ग्रामपंचायत खडकी, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे है नोंदणीकृत ठेकेदारांकडून (०२ लिफाफा पद्धतीने) मागवीत आहे. कोरी निविदा एक ग्रामपंचायत, खडकी, ता- आंबेगाव, जिल्हा पुणे यांसकडून दिनांक २७/०९/२०२४ ते दि. ४/१०/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते ४.३० या वेळेत उपलब्द होईल.

| अ.क्र. | सन | कामाचे नाव | तरतुद रक्कम |
|---|---|---|---|
| १. | २०२०/२१ | शाळांकरिता कावायत साहित्य खरेदी करणे | ७७६९०/- |
| २. | २०२०/२१ | गावात सी.सी.टी.वी. कैमेरे बसविणे | २०००००/- |
| ३. | २०२०/२१ | दिगद पुनर्वसन बैठक कट्टे बसविणे | ५८७९८/- |
| ४. | २०२१/२२ | पोषण आहार पुरवणे | ७७९९०/- |
| ५. | २०२२/२३ | मेडीक्लोर खरेंदी करणे | ५००००/- |
| ६. | २०२३/२४ | घनकचरा व्यवस्थापन (कचरा कुंड्या) | ५७६४५/- |
| ७. | २०२३/२४ | वाडीवस्ती बाकडे बसविणे | १०००००/- |

**टीप :**
१. ठेकेदाराने / दुकानदार कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित दाखला सादर करणे आवश्यक आहे.
२. बंद लिफाफा पोस्टाने किंवा सक्षम ७ दिवसांच्या आत दि. २७/०९/२०१४ ते दि. ०४/१०/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी सायंकाळी ४ वाजे पर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.
३. सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती इत्यादीबाबतचे तपशील निविदा संचात नमूद असून त्या अटी व शर्तीस आधिन राहून निविदाधारक ठेकेदारास लागू राहतील याची नोंद घ्यावी.
४. विहित मुदतीनंतर बंद लिफाफा दर पत्रके स्वीकारले जाणार नाहीत.
५. प्राप्त दर पत्रके ४/१०/२०२४ रोजी सायंकाळी साडेचार वाजता सर्व समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात उघडली जाईल याची नोंद घ्यावी.
६. दर पत्रकाबाबत काही हरकत असल्यास त्याच ठिकाणी समक्ष घेण्यात यावी.
७. दर पत्रक स्वीकृतीनंतर तक्रार हरकत विचारात घेतली जाणार नाही.
८. सदर कामाचे अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही.
९. दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणेचे अधिकार राखून ठेवले आहेत.
१०. दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणेचे अधिकार राखून ठेवले आहेत.
बांगर डी.जे. सरपंच ग्रामपचायत खडकी, ता.आंबेगाव, जि. पुणे.

**सरपंच**
**ग्रामपंचायत खडकी,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे**

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत खडकी,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे**


## डॉ. प्रदीप दळवे काळेवाडी येथे शिवार फेरीचे आयोजन

# चालू वर्षी अंजिराच्या मीठा बहराचे काटेकोर नियोजन करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन प्रकल्प, जाधववाडी व कृषि विभाग तसेच महाराष्ट्र शासन आणि पुरंदर तालुका सिताफळ बागायतदार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे काळेवाडी येथे पुरंदर तालुका सिताफळ बागायतदार संघाचे अध्यक्ष निलेश काळे, यांच्या सिताफळ व अंजीर बागेमध्ये शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान उपस्थित शेतकऱ्यांच्या अनुभवाची देवाण घेवाण झाली. सद्यस्थितीतील सिताफळ बागेचे अन्नद्रव्य, पाणी व्यवस्थापन, सीताफळ भेगाळणेची समस्या व उपाय यावर मार्गदर्शन तसेच चालू वर्षी समाधानकारक पर्जन्यमान असलेने अंजिराच्या मीठा बहराचे काटेकोर नियोजन करावे असे आवाहन उद्यानविद्यावेत्ता डॉ. प्रदीप दळवे यांनी यावेळी केले. अंजीर व सीताफळ पिकाचे एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, सिताफळावरील पिठ्या ढेकूण व्यवस्थापन, सिताफळ काळे पडणे व उपाय, मीठा बहर व्यवस्थापन करताना बोर्डो मिश्रणाचा वापर या विषयावर डॉ. युवराज बालगुडे, वनस्पती रोगशास्त्रज्ञ यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर उपस्थित शेतकऱ्यांच्या शंकाचे निरसन केले.

यावेळी श्री. विजयदादा कोलते, माजी उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, पुरंदर तालुका सिताफळ बागायतदार संघाचे पदाधिकारी, श्री. माऊली मेमाणे, श्री. आदिनाथ काळे, श्री. अमित काळे, श्री. मंगेश लवांडे, श्री. भाऊ टिळेकर, श्री. प्रदीप काळे, श्री. अरुण काळे, श्री. उमेश झेंडे, श्री. समीर काळे, श्री. रवींद्र काळे, श्री. गणेश काळे, श्री. राहुल झेंडे आणि तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि सहाय्यक श्री. योगेश पवार व श्री. कोंडीबा जरांडे तसेच परिसरातील अंजीर व सीताफळ उत्पादक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.



काळेवाडी (ता.पुरंदर) येथे पुरंदर तालुका सिताफळ बागायतदार संघाचे अध्यक्ष व शेतकरी नितीन काळे यांच्या बागेत शिवार फेरी प्रसंगी शेतकरी.

#रा

## अन्यथा आंदोलन: आरपीआयचे पंकज धिवार यांची मागणी

# भेसळयुक्त भंडारा विक्रीवर निर्बंध घाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**जेजुरी :** अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीच्या खंडेरायाच्या देवदर्शन व धार्मिक विधींमध्ये अविभाज्य घटक असलेल्या पवित्र भंडाऱ्याला भेसळीचे ग्रहण लागले असून भाविकभक्तांच्या श्रद्धेशी आणि आरोग्याशी खेळ करणाऱ्या वितरकांवर कारवाई करून भेसळयुक्त भंडारा विक्रीवर निर्बंध आणावेत अन्यथा आरपीआय च्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याचे पत्र तालुकाध्यक्ष पंकज धिवार यांनी तहसीलदार विक्रमसिंह राजपूत यांना दिले आहे. तसेच अन्न व औषध भेसळ प्रशासन ,पोलीस प्रशासनाला याबाबत पत्र देणार असल्याचे धिवार यांनी सांगितले. तीर्थक्षेत्र जेजुरीमध्ये वर्षातून आठ ते दहा मोठ्या यात्रा भरतात .यामध्ये किमान एक कोटीहून अधिक भाविक जेजुरीत दाखल होत खंडेरायाचे देवदर्शन धार्मिक विधी करतात .या विधींमध्ये भंडाऱ्याला अनन्य साधारण महत्व आहे.तसेच यामधून शहरामध्ये मोठी आर्थिक उलाढाल होत असते .त्यामुळे गेली काही वर्षांपासून भेसळयुक्त भंडाऱ्याची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असून सर्वात धक्कादायक बाब म्हणजे हा भंडारा देवाच्या चरणी अर्पण करताना प्रसाद म्हणून भाविक भक्षण करतात व कपाळावर माखतात .कपाळाला काळे व्रण उमटले खाज सुटणे त्वचा लालसर होणे अशा तक्रारी नित्याचाचआहेत. सध्या महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभाग मार्फत तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत गडकोट ,पायरीमार्ग ,सज्जा ,दीपमाळा ,वेशी व देवकुळे यांची डागडुजी ,दुरुस्ती व पुनर्निर्माण आदी कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत .भेसळयुक्त भंडाऱ्यामुळे पुरातन दगडी बांधकामांवर परिणाम होत असून हा भंडारा विक्री व वापरावर निर्बंध आणावेत असा स्पष्ट अहवाल पुरातत्व विभागाने मागील काळात म्हणजे काम सुरू करण्यापूर्वी दिलेला असूनही कोणीही याबाबत गांभीर्याने घेतलेले नाही .जत्रा-यात्रा उत्सवांमध्ये भेसळीच्या भंडारा विक्रीचे प्रमाण लक्षणीय असते. विजयादशमीपासून खंडेरायाच्या जत्रा यात्रा उत्सवांना सुरुवात होणार असून प्रशासनाकडून ठोस उपाययोजना राबविण्यात यावी अशी मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे.

### शहरात विकला जाणारा पेढा -खवा याचा दर्जा व गुणवत्ता तपासावी

● खंडेरायाच्या धार्मिक विधींमध्ये भंडारा व खोबरे हा प्रसाद महत्वपूर्ण मानला जातो मात्र गेल्या काही वर्षात महाद्वार व पायरीमार्गावर प्रसाद म्हणून पेढा व खवा मोठ्या प्रमाणावर विकला जात आहे. एका टपरीवजा दुकानात किंवा टेबलवर पातेल्यात असुरक्षित असलेला पेढा व खवा प्लास्टिक पिशवी किंवा डब्यामध्ये विक्री करणारी अनेक दुकाने-विक्रेते दिसून येतात.राज्याच्या विविध प्रांतातून येणारा भाविक मोठ्या श्रद्धेने व विश्वासाने पेढा खरेदी करतो .मात्र या पेढा व खव्याचा दर्जा व गुणवत्ता तपासण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली असून प्रसंगी न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे पंकज धिवार यांनी सांगितले

# सहकार टिकला तरच शेतकरी टिकणार आहे : विनोद सपकळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**भवानीनगर :** सहकारी संस्था हि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आर्थिक कणा असुन सहकार टिकला तरच शेतकरी टिकणार आहे असे मत सपकळवाडीचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष विनोद नर्सिंग सपकळ यांनी व्यक्त केले

सपकळवाडी सोसायटीची ७४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवारी (दि २६) संपन्न झाली इंदापूर तालुक्यामध्ये सर्वाधिक आठ टक्के लाभांश सपकळवाडी सोसायटीच्या वतीने सभासदांना जाहीर करण्यात आला असून संस्थेच्या कर्मचाऱ्यांना एक महिन्याचा पगार देण्यात आला आहे यावेळी सोसायटीचे अध्यक्ष नरसिंग सपकळ यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली यावेळी श्री छत्रपती कारखान्याचे माजी संचालक बापूराव सपकळ कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक बी के सपकळ उपाध्यक्ष राजेंद्र लालासो सपकळ सचिव बाबासो सपकळ ज्ञानेश्वर सपकळ तुकाराम सपकळ पांडुरंग सपकळ निलेश सपकळ विजय सपकळ आप्पासो सपकळ अजित चव्हाण चंद्रकांत सपकळ पोपट पवार राजेंद्र सपकळ दत्तात्रय सपकळ विष्णू भुजबळ रामभाऊ सपकळ व सभासद उपस्थित होते विनोद सपकळ म्हणाले सहकारी संस्थांच्या माध्यमातूनच शेतकऱ्यांचा विकास होत आहे त्यामुळे सहकारी संस्था टिकवणे ही काळाची गरज आहे सपकळवाडी सोसायटीने अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले असून संस्थेचा अमृत महोत्सव लवकरच साजरा करण्यात येणार आहे संस्थेमध्ये शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेऊन पारदर्शक कारभार करण्यात येत आहे सोसायटीने शेतकऱ्यांसाठी असलेली बळीराजा कर्ज योजनेच्या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांना लाभ मिळवून दिला आहे अमृत महोत्सवाच्या निमित्ताने संस्थेच्या इमारतीला संपूर्ण रंगरंगोटी व संस्थेच्या अमृत महोत्सवाचा खर्च तसेच सोसायटीच्या अमृत महोत्सवानिमित्त सपकळवाडी गावाला स्वखर्चातून जेवण देण्याचे विनोद सपकळ यांनी जाहीर केले.

## संगणक व लॅपटॉप भेट

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



# पवार महाविद्यालयास विप्रा स्किल इंडियाकडून मदतीचा हात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान पुरंदरच्या ,जेजुरी येथील शरदचंद्रजी पवार महाविद्यालयास विप्रा स्किल इंडिया प्रा.लि. ,पनवेल या कंपनीकडून २७ संगणक व २८ लॅपटॉप भेट स्वरूपात प्रदान करण्यात आले. ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी संगणक साक्षर व्हावे , या उद्देशाने कंपनीचे प्रमुख विकास चव्हाण यांनी महाविद्यालयाच्या संगणक कक्षाची गरज ओळखून या वस्तू भेट स्वरूपात देण्यात आल्या. यानिमित्त भेटवस्तू प्रदान कार्यक्रम महाविद्यालयात संपन्न झाला.

यापसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनाजी नागणे, उपप्राचार्य बेबी कोलते, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुलांची गरज ओळखून विप्रा.स्किल इंडिया प्रा. लि.पनवेल या कंपनीने प्रमुख विकास चव्हाण यांनी ही भेट दिल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते ,प्राचार्य डॉ. धनाजी नागणे ,सचिव शांताराम पोमण यांनी आभार मानले आहेत.

## Selected



### केंदूरमध्ये शेतकऱ्यांना कांदा व चारा पिकाचे मार्गदर्शन

**शिक्रापूर प्रतिनिधी :** केंदूर ता. शिरुर येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय शेतकरी परिसंवाद संपन्न झाले असून यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना कांदा पीक लागवड व चारा पिकाचे व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

केंदूर ता. शिरुर येथे आयोजित शेतकरी परिसंवाद कार्यक्रम प्रसंगी उपसभापती सविता पऱ्हाड, सरपंच अमोल थिटे, तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे, कृषी सहाय्यक अशोक जाधव, शिवाजी खेडकर यांसह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ. विकास भालेराव यांनी कांदा पिकावरील रोगनियंत्रण, योग्य काळजी आणि उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी आवश्यक तंत्रे यावर चर्चा केली. तर क्षेत्र अधिकारी डॉ. रोहित निरगुडे यांनी पीक उत्पादन खर्च योजना अंतर्गत शेतकऱ्यांना शेतीचे अर्थशास्त्र समजावून सांगत पीक उत्पादन खर्चाचा नीट विचार करुन उत्पादन खर्च कमी करण्याच्या पद्धतींबद्दल माहिती दिली.



### बी. टेक. संगणक अभियांत्रिकी अभ्यासक्रम नियोजन बैठक संपन्न

**धनकवडी, पुणे:** पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (पीआयसीटी) स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात बी. टेक. संगणक अभियांत्रिकी शाखेच्या अभ्यासक्रम नियोजनासाठी उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. गीतांजली काळे यांनी भूषविले, तर प्राचार्य डॉ. संजय गंधे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक झाली. बैठकीत डॉ. गिरीश पोतदार यांनी विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सॉफ्टवेअर आणि औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्यांचा समावेश करण्यावर भर दिला आणि अभ्यासक्रमात लेखी व प्रात्यक्षिक भागांचा समन्वय साधण्याचे महत्त्व नमूद केले. बैठकीस डॉ. कल्याणी वाघमारे, डॉ. शीतल सोनावणे, डॉ. आरती देशपांडे, डॉ. अनुपमा फाकटकर, प्रा. वीरेंद्र बगाडे यांच्यासह अनेक प्राध्यापक उपस्थित होते.



### खासदार कोल्हे वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**राजगुरूनगर :** संसदरत्न खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त खेड तालुक्यात आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य आणि रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. चास आणि वाफगाव या दोन शिबिरात सुमारे २५० जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली तर ७० जणांनी रक्तदान केले.

'मी सेवेकरी फाऊंडेशन'चे सुधीर मुंगसे आणि आदित्य बिर्ला हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष हिरामण सातकर यांच्या हस्ते या शिबिरांचे उद्घाटन करण्यात आले. चास, वाफगाव, कडधे, कान्हेवाडी, मोहकल, कमान, आखरवाडी, पापळवाडी, बहिरवाडी, चिंचबाईवाडी, वरुडे, वाकळवाडी, जऊळके, गुळाणी या गावातील नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. यावेळी संजय घनवट युवा मंचचे अध्यक्ष संदीप घनवट, महिला जिल्हा उपाध्यक्षा मनीषा सांडभोर, मंगल राक्षे, ॲड. विशाल झरेकर, चास परिसरातील सरपंच विनायक मुळूक, उपसरपंच पूनम नवनाथ रासकर, चेअरमन वैभव राक्षे, व्हा. चेअरमन मच्छिंद्र मुळूक, सरपंच सविता विलास पोखरकर, मोहकलच्या सरपंच अश्विनी भागवत, चासचे माजी सरपंच अनिल टोके, नवनाथ वाळुंज, अनिल रहाणे यांच्यासह ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व शिरुर पोलिसांची संयुक्त कामगिरी



# पोलिसाची कार चोरणारा आंतरजिल्हा मोरक्या जेरबंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर शहरात वाहन चोरीच्या घटना वाढत असताना नुकतेच एका पोलिसाची कार चोरीला गेली होती, सदर गुन्ह्याचा तपास करत चारचाकी वाहने चोरणाऱ्या आंतरजिल्हा टोळीच्या मोरक्याला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व शिरुर पोलिसांना यश आले असून नदीम दाऊद शेख असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या आरोपीचे नाव आहे.

शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी योगेश गुंड यांनी त्यांची एम एच १२ टी डी ०७०२ हि कार घरासमोर लावलेली असताना अज्ञात चोरट्याने कार चोरून नेलेली असताना याबाबत गुन्हा दाखल करत तपास करताना सदर कार अहमदनगरच्या दिशेने गेल्याचे समोर आले, दरम्यान स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार तुषार पंदारे, जनार्दन शेळके, संजू जाधव, राजू मोमीन, अतुल डेरे, मंगेश थिगळे, सागर धुमाल, शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक एकनाथ पाटील, पोलीस हवालदार नाथासाहेब जगताप, विजय शिंदे, निलेश थोरात, योगेश गुंड हे गुन्ह्याचा तपास करत असताना वाहन चोरणारा आरोपी नदीम शेख हा बुलढाणा येथे असल्याचे समोर आल्यानंतर पोलिसांनी बुलढाणा येथे जात नदीम दाऊद शेख वय ३२ वर्षे रा. धाड ता. बुलढाणा जि. बुलढाणा याला याब्यात घेत त्याच्याजवळून चोरीची कार आणि गुन्ह्यात वापरत असलेल्या बनावट चाव्या व चाव्या बनवण्याचे मशीन जप्त केले.

### संतोष परदेशी यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिक्रापूर :** मांडवगण फराटा ता. शिरूर येथील प्रसिद्ध व्याख्याते आणि निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष संतोष शामराव परदेशी यांना विश्वशांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था भारत व इन्स्टिट्यूट मिनोझीस बांग्राझा पणजी आणि संज्योती पब्लिकेशन यांच्या वतीने देण्यात येणारा राष्ट्रीय आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मांडवगण फराटा ता. शिरूर येथील संतोष परदेशी यांनी संस्काराचे जीवनातील महत्व तसेच पर्यावरण विषयावर अनेक व्याख्याने देत पर्यावरण वाचवण्यासाठी तसेच वृक्ष संगोपणासाठी भरीव काम केले, कोरोना काळातही विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न केले.

# जुन्नर ते कारखाना फाटा रस्ता त्वरित दुरुस्त करा

## अन्यथा वृक्षारोपण करु - वंचित बहुजन आघाडीची मागणी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** जुन्नर ते कारखाना फाटा हा रस्ता जुन्नर शहर ते शिरोली विविध कार्यकारी सोसायटी दरम्यान अत्यंत खराब झाला असून, रस्त्यामध्ये ठिकठिकाणी खड्डे पडले असून वाहनांना प्रवास करताना अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झालेली आहे. त्यामुळे प्रवासी नागरिकांमध्ये या रस्त्यावर प्रवास करणे जिकिरीचे आणि धोक्याचे होवून बसले आहे. त्यामुळे हा रस्ता ताबडतोप दुरुस्त करावा या मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग, जुन्नर येथे उपअभियंता यांना देण्यात आले. ३ ऑक्टॉबर २०२४ पर्यंत हा रस्ता दुरुस्त करण्यात आला नाही तर या रस्त्यामध्ये वृक्षारोपण करण्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने कर्मचारी मयूर सांगडे यांनी निवेदन स्विकारले असून लवकर काम चालू होईल असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जुन्नर तालुका अध्यक्ष गणेश वाव्हळ, जुन्नर तालुका महासचिव सागर जगताप,युवक अध्यक्ष महेश पठारे, ई. पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोटार व जीपची धडक; १ ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



मोटार कार व जीपची धडक झाल्यानंतर वाहनांची झालेली अवस्था.

**चाकण :** मोटार कार व पिकअप जीपची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात कारमध्ये बसलेल्या एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाला आहे. तर चालकासह दोघे गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात मंगळवार (दि.24) बिरदवडी फाटा ते पुणे नाशिक महामार्ग दरम्यान घडला आहे .

हर्षदा केतन खानेकर (वय 27 सध्या रा. भायखळा मुंबई , मूळ रा.नारायणगाव, जुन्नर) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी मोटार कार चालक रामेश्वर गणपत सांगवे (वय 23) यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चाकण पोलिसांनी पिकअप चालक सचिन मुरलीधर गोरे (वय 29 रा. चाकण) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे त्यांची कार घेऊन मुंबईकडे जात होते. यावेळी कारमध्ये हर्षदा या पाठीमागे बसला होत्या. त्यांची गाडी चाकण येथील रसिका हॉटेल समोर आली. त्यावेळी समोरून येत असलेल्या पिकअप जीपची व मोटारीची समोरासमोर जोरात धडक झाली. दोन्ही वाहनांच्या समोरील बाजूचा चक्काचूर झाला. या अपघातात हर्षदा व फिर्यादी आणि हर्षदा यांच्या सासू हे दोघे गंभीर जखमी झाले. हर्षदा यांना जवळील खाजगी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## महाराष्ट्रातल्या कुशल तरुण - तरुणींनी फायदा घ्यावा: अमृता भालशंकर

# युवकांनी जर्मनीमध्ये रोजगाराच्या संधीचे सोनं करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**उरुळी कांचन :** जर्मनीत जाऊन आपले करिअर घडविण्याची संधी महाराष्ट्र सरकारने उपलब्ध करून दिली आहे त्याचा महाराष्ट्रातल्या कुशल तरुण - तरुणींनी फायदा घ्यावा असे आवाहन प्रादेशिक परिवहन विभागाच्या वरिष्ठ निरीक्षक (RTO)अमृता भालशंकर यांनी उरुळी कांचन येथे आयोजित मेळाव्यात केले.

उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायकीकरण या योजनेचा विस्तार करून जर्मनीतील बाडेन - बूटेनबर्ग या राज्यास महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील कुशल मनुष्यबळ पुरविण्याबाबतचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. यामध्ये ३० विविध तांत्रिक कोर्स पूर्ण केलेल्या युवकांना जर्मनीमध्ये रोजगार उपलब्ध करून दिला जाणार आहे. या योजनेची माहिती देण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे अंतर्गत वाहन नोंदणी करण, नूतनीकरण, वाहन परवाना आदींचे कँम्प जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी घेतले जातात त्या कँम्पच्या वेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबोधन करणारा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.अशाच प्रबोधन मेळाव्याचे आयोजन उरुळी कांचन येथील एलाईट चौकाशेजारी असलेल्या मैदानात, बुधवारी (ता. 25) करण्यात आले होते. यावेळी उपस्थित असलेल्या तरुणांना व नागरिकांना ही माहिती देण्यात आली. त्यावेळी भालशंकर बोलत होत्या.

मोटार वाहन निरीक्षक समीर शिरोडकर, उपनिरीक्षक प्रशांत पोतदार, कर्मचारी दत्तात्रय माळी, राजेंद्र बगाडे, महेश फलटणकर, कुंभारकर आदी नागरिक व परिसरातील तरुण - तरुणी यापसंगी उपस्थित होत्या. #रा

### अमेरिकेसह मित्रराष्ट्रांचा ठराव इस्रायलने नाकारला

# शस्त्रसंधी फेटाळली...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तेल अवीव :** लेबनॉनमध्ये इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यात संघर्ष सुरू आहे. इस्रायलच्या भीषण हल्ल्यात हिजबुल्लाहच्या अनेक दहशतवाद्यांना आपले प्राण गमवावे लागले. आता इस्रायलने अमेरिकेसह इतर देशांनी दिलेला २१ दिवसांचा शस्त्रसंधीचा प्रस्ताव फेटाळून लावत, लेबनॉनमधून हिजबुल्लाहचा नायनाट करणे हेच अंतिम उद्दिष्ट असल्याचे म्हटले आहे.

इस्रायलचे अर्थमंत्री बेझेल स्मोट्रिच यांनी सांगितले की, लेबनॉनमधील हिजबुल्लाहचा खात्मा करणे हा उत्तरेकडील नव्या हल्ल्याचा अंतिम परिणाम असावा. स्मोट्रिच यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर म्हटले आहे की, "उत्तरेतील मोहिमेचा एकच परिणाम असावा: हिजबुल्लाहला चिरडून टाकणे आणि उत्तर कोरियातील रहिवाशांना हानी पोहोचविण्याची त्याची क्षमता नष्ट करणे."

अमेरिका आणि मित्रराष्ट्रांनी प्रस्तावित केलेल्या शस्त्रसंधीमुळे हिजबुल्लाहला पुनर्रचनेसाठी वेळ मिळेल, असा दावा इस्रायलच्या मंत्र्यांनी केला. इस्रायल आणि इराणसमर्थित हिजबुल्लाह यांच्यातील लढाई संपवण्यासाठी लवकरच शस्त्रसंधी होऊ शकते, अशी आशा लेबनॉनचे पंतप्रधान नजीब मिकाती यांनी व्यक्त केली आहे. इस्रायल जमिनीवर आक्रमण करण्याच्या विचारात असताना दोन्ही देशांमध्ये युद्धाचा धोका निर्माण झाला आहे.

इस्रायलच्या लष्कराने गुरुवारी सांगितले की, इस्रायलच्या हवाई हल्ल्यांमध्ये बेका खोरे आणि दक्षिण लेबनॉनमधील हिजबुल्लाहच्या सुमारे ७५ लक्ष्यांना लक्ष्य करण्यात आले आहे.

इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यातील संघर्ष पूर्ण युद्धात रुपांतरित होण्याचा धोका आहे, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन यांनी दिला आहे. इस्रायलच्या मंत्र्यांचे हे विधान फ्रान्स आणि अमेरिकेच्या २१ दिवसांच्या शस्त्रसंधी योजनेलाही धक्का मानले जात आहे. फ्रान्सचे परराष्ट्रमंत्री जीन-नूएल बॅरोट यांनी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत सांगितले की, आम्हाला आशा आहे की दोन्ही बाजूंनी विलंब न करता हा कायदा स्वीकारावा.

दरम्यान, हिजबुल्लाहने तेल अवीवसह इस्रायलच्या अनेक ठिकाणांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. तेल अवीववर हिजबुल्लाहचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला असल्याचे मानले जाते.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही उत्थानाची मोहीम

देशाकारण

"**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ** केवळ एक संघटना नसून भारताच्या उत्थानाची मोहीम आहे. ही राष्ट्रीय जीवनातील एक महत्त्वाची चळवळ आहे," असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे यांनी केले. नुकत्याच जैसलमेर




येथे झालेल्या दौऱ्यादरम्यान त्यांनी नगर एकत्रिकरणात स्वयंसेवकांना संबोधित केले. 'हिंदू राष्ट्र' या संकल्पनेवर बोलताना ते म्हणाले की, हिंदू हा केवळ धर्म नसून जीवनपद्धती आहे. या संघटित विचाराने स्वामी विवेकानंदांनी धर्माचा प्रचार केला. अशा महापुरुषांच्या प्रेरणेने संघाने देशातील सर्वसामान्य जनतेमध्ये हिंदू संघटीत होऊ शकतात, असा आत्मविश्वास निर्माण केला. हिंदुत्वाबाबत सुरुवातीला लोक म्हणायचे की ते जातीयवादी आणि संकुचित विचारसरणीचे आहे. पण संघाने हिंदू हा संप्रदाय नसून जीवनाचे तत्वज्ञान असल्याचे स्पष्ट केले. मानवतेच्या उद्धारासाठी देशातील ऋषी-मुनींनी परिश्रम घेतले. ते म्हणाले, १९२५ मध्ये नागपुरातील एका छोट्या ठिकाणाहून सुरू झालेले संघाचे कार्य देशातील सर्व राज्ये आणि जिल्ह्यांमध्ये पोहोचले आहे. ते देशातील प्रत्येक विभाग आणि शहरापर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे, जे फार दूर नाही. सुरुवातीच्या काळात सामान्य लोक संघाची खिल्ली उडवत असत, पण स्वयंसेवकांच्या त्याग आणि समर्पणाने निर्माण झालेली ही संघटना जगातील सर्वात मोठी सामाजिक संघटना म्हणून ओळख मिळवण्यात यशस्वी ठरली आहे.

» Selected

## निर्देशांकाची उसळी

**मुंबई :** विविध क्षेत्रांतील खरेदी आणि सकारात्मक जागतिक बाजारांमुळे बेंचमार्क निर्देशांक ंनी नव्या विक्रमी उच्चांकावर झेप घेतल्याने गुरुवारी तेजीने पकड आणखी घट्ट केली. सेन्सेक्स ६६६.२५ अंकांनी वधारून ८५,८३६.१२ वर, तर निफ्टी २११.८० अंकांनी वधारून २६,२१६ वर बंद झाला. दिवसभरात सेन्सेक्स आणि निफ्टीने अनुक्रमे ८५,९३०.४३ आणि २६,२५०.९० चा नवा उच्चांक गाठला. निफ्टी बँक निर्देशांकानेही दिवसभरात ५४,४६७.३५ चा नवा उच्चांक गाठला. निफ्टीवर मारुती सुझुकी, टाटा मोटर्स, श्रीराम फायनान्स, ग्रासिम इंडस्ट्रीज आणि महिंद्रा अँड महिंद्रा यांचे समभाग वधारले, तर ओएनजीसी, सिप्ला, एनटीपीसी, हीरो मोटोकॉर्प, एल अँड टी यांचे समभाग घसरले. धातू, वाहन निर्देशांक प्रत्येकी २ टक्के, एफएमसीजी, पीएसयू बँक निर्देशांक प्रत्येकी १ टक्क्यांनी वधारले. भांडवली वस्तू निर्देशांक मात्र ०.६ टक्क्यांनी घसरला.

## अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन

**नवी दिल्ली :** देशामध्ये २०२३-२४ या वर्षात एकूण अन्नधान्य उत्पादन ३३२२.९८ लाख टन झाल्याचा अंदाज असल्याचे केंद्रीय कृषी मंत्रालयाने जाहीर केले. २०२२-२३ मध्ये झालेल्या ३२९६.८७ लाख टन अन्नधान्य उत्पादन झाले होते. त्यापेक्षा हे प्रमाण २६.११ लाख टन अधिक आहे. तांदूळ, गहू आणि धान्याच्या चांगल्या उत्पादनामुळे अन्नधान्य उत्पादनात विक्रमी वाढ झाली असल्याचे मंत्रालयाने सांगितले. कृषी मंत्रालयाने सांगितले की, २०२३-२४ या वर्षात तांदळाचे उत्पादन १३७८.२५ लाख टन झाले. गेल्या वर्षीच्या १३५७.५५ लाख टन तांदूळ उत्पादनापेक्षा हे प्रमाण २०.७० लाख टन अधिक आहे. तर यंदा गव्हाचे उत्पादन ११३२.९२ लाख टन झाल्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या ११०५.५४ लाख टन गव्हाच्या उत्पादनापेक्षा हे २७.३८ लाख टन अधिक आहे. यंदा महाराष्ट्रासह दक्षिणेकडील राज्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती राहिली, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

### भूखंड घोटाळा भोवण्याची स्पष्ट चिन्हे

# सिद्धरामय्यांची चौकशी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट ॲथॉरिटीने (एमयूडीए) मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती बीएम यांना बेकायदा भूखंड वाटप केल्याच्या आरोपांची चौकशी करण्याचे आदेश विशेष न्यायालयाने लोकायुक्त पोलिसांना दिले. लोकायुक्त पोलिसांना या तक्रारीची चौकशी करून तीन महिन्यांत न्यायालयात अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते.

बेनामी मालमत्ता व्यवहार प्रतिबंधक कायदा १९८८ आणि कर्नाटक जमीन हडप प्रतिबंधक कायदा २०११ मधील तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने कर्नाटक लोकायुक्तांच्या म्हैसूर विभागाचे पोलिस अधीक्षक (एसपी) यांना दिले आहेत. कर्नाटक उच्च न्यायालयाने राज्यपाल थावरचंद गेहलोत यांना एमयूडीए प्रकरणाची चौकशी करण्यास मंजुरी दिली होती.

विशेष न्यायालयाने मुख्यमंत्री पार्वती, त्यांचे मेहुणे मल्लिकार्जुन स्वामी, देवराजू जे आणि इतरांविरोधात एमयूडीएने त्यांच्या पत्नीला बेकायदेशीररित्या नुकसान भरपाईच्या जागा वाटप केल्याप्रकरणी खाजगी तक्रार दाखल केली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात लोकायुक्त पोलिस चौकशीचे आदेश विशेष न्यायालयाने दिल्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत विरोधी पक्ष भाजपने गुरुवारी निदर्शने केली.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते आर. अशोक आणि विधान परिषदेचे चलवडी नारायणस्वामी यांच्या नेतृत्वाखाली विधानसौध येथील महात्मा गांधी पुतळ्यासमोर झालेल्या आंदोलनात पक्षाचे अनेक खासदार आणि नेते सहभागी झाले होते.

विशेष न्यायालयाच्या आदेशानंतर भाजप नेत्यांनी मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची आणि स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशीसाठी स्वतंत्र एजन्सी सीबीआयकडे तपास सोपवण्याची मागणी केली. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सिद्धरामय्या यांनी राजीनामा देणार नसल्याचे मंगळवारी स्पष्ट केले होते. विशेष न्यायालयाच्या निकालानंतर मुख्यमंत्र्यांनी आपण चौकशीला सामोरे जाण्यास तयार असल्याचे सांगितले होते.

## पाकला नाणेनिधीचे अर्थसहाय्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इस्लामाबाद :** आर्थिक संकटात सापडलेल्या पाकिस्तानच्या प्रयत्नांना बळ देण्यासाठी आयएमएफने पाकिस्तानसाठी सात अब्ज डॉलरच्या नव्या बेलआऊट पॅकेजला मंजुरी दिली असून, १.१ अब्ज डॉलरपेक्षा कमी रकमेचा पहिला कर्जाचा हप्ता तातडीने देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या संचालक मंडळाची वॉशिंग्टन येथे झालेल्या बैठकीत याचा निर्णय घेण्यात आला. नाणेनिधीच्या कार्यकारी मंडळाने ३७ महिन्यांच्या विस्तारित निधी सुविधेला (ईएफएफ) एकूण ७ अब्ज डॉलरची मंजुरी दिल्याची माहिती पंतप्रधान कार्यालयाने दिली. आयएमएफच्या कर्जावर पाकिस्तान सुमारे पाच टक्के व्याज देईल.

# भारतीयांना लेबनॉन सोडण्याचे निर्देश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यातील युद्धाबाबत भारत सरकारही अलर्ट मोडवर असून, भारताने आपल्या नागरिकांना लेबनॉन सोडण्याचा सल्ला दिल्याचे वृत्त आहे. तसेच भारतीयांना लेबनॉनला न जाण्यास सांगण्यात आले आहे. इस्रायल लवकरच लेबनॉनवर हल्ला करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. अलीकडेच इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यात जोरदार हवाई हल्ले झाले.

लेबनॉनमध्ये आधीच असलेल्या सर्व भारतीय नागरिकांना लेबनॉन सोडण्याचा सल्ला देण्यात आला आहे. जे लोक कोणत्याही कारणास्तव थांबत आहेत, त्यांनी कडक दक्षता घ्यावी, हालचाली मर्यादित कराव्यात आणि बैरूतमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहावे, असा सल्ला देण्यात आला आहे.

बैरूतमधील भारतीय दूतावासाच्या वेबसाईटनुसार, देशात सुमारे चार हजार भारतीय राहतात. यातील बहुतांश कंपन्यांमध्ये कर्मचारी आहेत. तर काही बांधकाम आणि कृषी क्षेत्रात आहेत. यापूर्वी १ ऑगस्ट रोजी भारतीय दूतावासाने नागरिकांना लेबनॉन सोडण्यास सांगितले होते. हमास आणि हिजबुल्लाहच्या नेत्यांच्या मृत्यूवरून या भागात तणाव निर्माण झाला होता.

### इस्रायलच्या हल्ल्यात म्होरक्या ठार

# हिजबुल्लाहला धक्का

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बेरूत :** हिजबुल्लाहचा वरिष्ठ कमांडर इब्राहिम कुबैसीला ठार करण्यात आल्याचे वृत्त आहे. इस्त्रायलवर हवाई हल्ले घडवून आणण्यात त्याचा हात होता. मात्र, आता त्याच्यावर हल्ला करण्यात आल्याची माहिती प्रसारमाध्यमाने दिली आहे.

इस्त्रायलच्या लष्कराने सांगितले की, इब्राहिम कुबैसी हा हिजबुल्लाहचा मिसाईल मॅन होता. त्याने याआधी इस्त्रायलवर अनेकदा हवाई हल्ले केले होते. लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने याबाबत माहिती दिली नाही. मात्र काही वेळानंतर कुबैसीला ठार केल्याबाबतची माहिती देण्यात आली. यावेळी एनडीएफने सांगितले की, याआधी इस्त्रायलवर झालेल्या हल्ल्यात इब्राहिम कुबैसी जबाबदार होता. त्याला मिसाईल क्षेत्रातील ज्ञान होते.

दरम्यान, २०२३ मध्ये इस्त्रायल आणि हमास युद्धाचा हिजबुल्लाह आणि इस्त्रायल यांच्या युद्धाशी संबंध असल्याचे बोलले जात आहे. या युद्धात इस्त्रायलने हिजबुल्लाहच्या पेजरवर हल्ला केला. त्यानंतर सोलार पॅनल आणि वॉकी टॉकीवर हल्ला केला. त्यानंतर आता तर इस्त्रायलने मिसाईल मॅनवर हल्ला करत ठार केले.

## पाकमधील शाळेला मनमोहनसिंहांचे नाव

**नवी दिल्ली :** भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचा गुरुवारी वाढदिवस असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. मनमोहन सिंग २००४ ते २०१४ या काळात भारताचे पंतप्रधान होते. लालकृष्ण अडवाणींप्रमाणेच तेही पाकिस्तानशीही संबंध असलेले व्यक्तिमत्त्व आहेत. मनमोहन सिंग यांचा जन्म पंजाबमधील चकवाल जिल्ह्यातील गाह गावात झाला. ते पंतप्रधान झाल्यानंतर पाकिस्तानातही चर्चा झाली होती. तेथील शाळेला त्यांचे नाव देण्यात आले.

## वणव्यातून वाटचाल

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**क्लिटो :** इक्वाडोरमध्ये वणव्यात आग लागल्यावर एक चालक मोटारसायकल घेऊन त्यातून मार्ग काढताना दिसून आला.

# अफस्पाची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हिंसाचाराच्या वाढत्या घटनांची दखल घेत केंद्र सरकारने सशस्त्र दल (विशेषाधिकार) कायद्याची (अफस्पा) व्याप्ती वाढवली आहे. या कायद्यानुसार सुरक्षा दलांना एखादा भाग अशांत घोषित करण्याचे स्वातंत्र्य आहे. नागालँड आणि अरुणाचल प्रदेश या ईशान्येकडील दोन राज्यांतील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतल्यानंतर केंद्राने अफस्पाची व्याप्ती वाढवली आहे.

अफस्पा अंतर्गत, सशस्त्र दलांना त्यांच्या ऑपरेशनमध्ये मदत करण्यासाठी एखादा भाग किंवा जिल्हा अशांत क्षेत्र म्हणून अधिसूचित केला जातो. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक वाटल्यास शोध, अटक आणि गोळीबार करण्याचे अधिकारही या भागात तैनात जवानांना मिळतात.

केंद्रीय गृह मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे की, सशस्त्र दल (विशेषाधिकार) अधिनियम, १९५८ च्या कलम ३ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून केंद्र सरकारने नागालँडमधील आठ जिल्हे आणि इतर पाच जिल्ह्यांतील २१ पोलिस ठाण्यांना १ एप्रिल पासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी 'अशांत क्षेत्र' म्हणून घोषित केले आहे. नागालँडमधील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यात आल्याचे गृहमंत्रालयाने सांगितले. नागालँडमधील ज्या जिल्ह्यांमध्ये अफस्पा पुन्हा लागू करण्यात आला आहे त्यात दीमापूर, न्यूलँड, चुमौकेदिमा, मोन, किफिरे, नोकलाक, फेक आणि पेरेन या जिल्ह्यांचा समावेश आहे.

# औषध प्रकरणी टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** देशातील सर्वोच्च औषध नियामक संस्थेने सुमारे ५० औषधांचे नमुने निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर समाजवादी पक्षाचे सर्वेसर्वा अखिलेश यादव यांनी भाजपप्रणित केंद्र सरकारवर टीका केली आहे.

केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटनेला असे आढळले आहे की पॅरासिटामॉल, पॅंटोप्राझोल आणि बॅक्टेरियाच्या संसर्गावर उपचार करण्यासाठी वापरल्या जाणार्या काही अँटीबायोटिक्ससह सुमारे ५० औषधांचे नमुने निकृष्ट दर्जाचे होते.

भ्रष्ट भाजप सरकारने याचे उत्तर द्यावे, असे औषध घेतल्याने बरे होईल की आजारी पडणार? जोपर्यंत भाजप कंपन्यांकडून देणग्या गोळा करत राहील, तोपर्यंत निकृष्ट दर्जाच्या औषधांचा धंदा सुरूच राहणार आहे. या अहवालानंतरही काही कारवाई करणार का, असेही ते म्हणाले.

### मिशनरी रॅकेट उत्तर पोलिसांच्या कारवाईत उद्ध्वस्त

# मथुरेत घडत आहे धर्मांतर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मथुरा :** मथुरा येथे गरिबांना आमिष दाखवून धर्मांतर करणाऱ्या मिशनरी रॅकेटचा उत्तर प्रदेश पोलिसांनी पर्दाफाश केल्याची माहिती समोर आली आहे. समाजातील गरीब, गरजू आणि निष्पाप लोक या मिशनऱ्यांच्या टार्गेटवर होते. त्यांना मोफत शिक्षण आणि आरोग्याचे आमिष दाखवून त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न मिशनऱ्यांकडून केला जात होता. या छाप्यात मिशनरीशी संबंधित पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सक्तीचे धर्मांतर केल्याच्या माहितीवरून मथुरा येथील हायवे पोलीस स्टेशनच्या इंद्रपुरी कॉलनीतील घरावर छापा टाकण्यात आला. मिशनरी एजंट गरीब हिंदूंना आमिष दाखवून धर्मांतर करण्याचा कट रचत असल्याची माहिती हिंदू संघटनांना मिळत होती.

प्रसिद्धीच्या नावाखाली ५० हून अधिक लोक घरात जमा झाले. या कार्यक्रमाला प्रार्थना सभेचे नाव देण्यात आले होते. या रॅकेटचा म्होरक्या सॅनसान सॅम्युअल असून तो गुरुग्रामचा रहिवासी आहे. राकेश रा. तुळशीनगर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी पाच जणांविरोधात गुन्हा नोंदविला आहे. स्थानिक पातळीवर मिशनरी रॅकेटमध्ये किती एजंट कार्यरत आहेत, याचा तपास सध्या पोलीस करत आहेत.

### चीन धार्जिणे मोईज्जू सरकार आल्यानंतर

# मालदीवकडे भारतीयांनी फिरवली पाठ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मालदीवमध्ये चीनचे समर्थक मोहम्मद मोईज्जू यांचे सरकार स्थापन झाल्यापासून या देशाचे भारताशी असलेले संबंध बिघडले आहेत. मालदीवने अनेकवेळा भारतावर बहिष्कार टाकून भारतासोबतचे संबंध ताणले आहेत. मालदीवशी संबंध बिघडल्यानंतर भारतीय पर्यटकांनी त्याकडे पाठ फिरवण्यास सुरुवात केली आहे.

मालदीवमध्ये भारतीय पर्यटकांच्या अनुपस्थितीचा फटका तेथील पर्यटन उद्योगाला बसला आहे. मालदीवमध्ये पूर्वी मोठ्या संख्येने असणारा भारतीय पर्यटकांचा ओघ आता बराच कमी झाला आहे. आकडेवारीनुसार, २४ सप्टेंबर पर्यंत मालदीवमध्ये केवळ ८८,२०२ भारतीय पर्यटक आले होते. गेल्या वर्षी याच कालावधीत १,४६,०५७ पर्यटक मालदीवमध्ये आले होते. ५७,८५५ भारतीय पर्यटक कमी असल्याने मालदीवच्या पर्यटन उद्योगाला या घसरणीचा फटका बसला आहे.

भारतीय पर्यटकांच्या कमतरतेमागे अनेक कारणे आहेत. सर्वात मोठे कारण म्हणजे मालदीवच्या तीन उपमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात



सोशल मीडियावर केलेली आक्षेपार्ह पोस्ट. या घटनेनंतर भारतातील काही सामाजिक संघटना आणि व्यक्तींनी मालदीववर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले होते. नंतर या मंत्र्यांना निलंबित करण्यात आले असले तरी भारतीय पर्यटकांची संख्या कमी होऊ लागली. त्याचबरोबर मालदीवमधील राजकीय बदलांमुळेही ही घसरण झाली.

नवे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईज्जू यांची चीनसमर्थक भूमिका आणि भारतापासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न चर्चेत आहे. भारत आणि मालदीव यांच्यातील संबंध बिघडवणाऱ्या चीनशी जवळीक साधल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या राजकीय बदलाचा परिणाम भारतीय पर्यटकांच्या ट्रेंडवर झाला असून त्यांनी मालदीवला जाणे कमी केले आहे.

पर्यटन उद्योग रुळावर आणण्यासाठी मालदीव सरकारने अनेक पावले उचलली आहेत. 'वेलकम इंडिया' मोहीम म्हणजे भारतीय पर्यटकांना पुन्हा आकर्षित करण्याच्या दिशेने केलेला प्रयत्न आहे. पर्यटन उद्योगातील मंदीवर मात करण्यासाठी भारतीय पर्यटकांनी मालदीवमध्ये परत यावे, अशी सरकारची इच्छा आहे. त्याचबरोबर मालदीवमध्ये चिनी आणि पश्चिम युरोपीय पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली असून, त्यामुळे पर्यटन मंत्रालयाला काही प्रमाणात आधार मिळाला आहे. या पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे या उद्योगाला काहीप्रमाणात स्थैर्य आले आहे.

#रा



विनेशने पॅरिसहून परत येऊन देशाची माफी मागायला हवी होती. तर बबिताने विनेशला अपात्र होण्यासाठी जबाबदार धरले आहे. विनेश फोगटचे पॅरिसहून परतल्यानंतर विमानतळावर केलेले स्वागत चुकीचे होते. तो म्हणाला, “ऑलिम्पिकमधील अपात्रतेबद्दल बोलूया. सर्वप्रथम, जेव्हा एखादा खेळाडू अपात्र ठरतो तेव्हा त्याने देशाची माफी मागितली पाहिजे की त्याने चूक केली आणि माझ्यामुळे देशाला पदक गमवावे लागले. यासाठी तिने पंतप्रधानांवर आरोप केले. या घटनेला षडयंत्र म्हटले.” — योगेश्वर दत्त



### धर्मशाळा क्रिकेट स्टेडीयम मधील संग्रहालयाला अनुराग ठाकूर यांची भेट

# हे संग्रहालय ऐतिहासिक क्षणांचा साक्षीदार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** माजी केंदीय मंत्री, भाजपचे वरिष्ठ नेते व बीसीसीआयचे माजी अध्यक्ष अनुराग ठाकूर यांनी पुण्यातील सहकार नगर येथे असलेल्या ब्लेड्स ऑफ ग्लोरी या सुप्रसिद्ध क्रिकेट संग्रहालयाला भेट दिली. यावेळी संग्रहालयाचे संस्थापक रोहन पाटे यांनी संग्रहालय स्थापन करण्यामागची भूमिका व येथील क्रिकेट वस्तूंचा संग्रह याविषयीची माहिती ठाकूर यांना दिली.

संग्रहालय पाहून झाल्यावर आपल्या भावना व्यक्त करताना अनुराग ठाकूर म्हणाले, “मी १७ वर्षांहून अधिक काळ क्रिकेट व्यवस्थापनात काम केले. मला देखील असे संग्रहालय साकारायचे होते पण हे काम माझ्याकडून झाले नाही. ते काम रोहन पाटे यांनी करून दाखवले. या संग्रहालयात असलेल्या क्रिकेट मधील ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार असलेल्या कित्येक वस्तूंनी माझे लक्ष वेधून घेतले. अशा प्रकारचा संग्रह



आणि तोही इतक्या मोठ्या प्रमाणात एकाच ठिकाणी ही खूप वैशिट्यपूर्ण बाब असून असे संग्रहालय अजूनतरी माझ्या पाहण्यात आले नाही.”

“आमच्या हिमाचल प्रदेशातील धर्मशाळा येथील क्रिकेट स्टेडियमला दरवर्षी सुमारे ५ लाख पर्यटक भेट देतात. क्रिकेटचा सामना सुरु नसताना देखील येथून दिसणारे विहंगम दृष्य येथे पर्यटकांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करते. पर्यटकांची या स्टेडीयमला भेट ही आणखी संस्मरणीय व्हावी म्हणून आम्ही लवकरच येथे काही नवीन सुविधा निर्माण करणार आहोत. यामध्ये स्थानिक पदार्थांचा आस्वाद देणारे खास फूड कोर्ट, स्थानिक कलाकारांनी घडवलेल्या कला वस्तुंचे दालन आणि ब्लेड्स ऑफ ग्लोरी सारखे एक क्रिकेट संग्रहालय आदी सुविधांचा समावेश असेल”, अशी माहिती यावेळी ठाकूर यांनी दिली.

“सात वर्षांपूर्वी धर्मशाळा येथील आमच्या या क्रिकेट स्टेडीयमला अशा प्रकारचे संग्रहालय उभारण्यासाठी मी रोहन पाटे यांच्याशी बोललो होतो. आता प्राधान्याने या संग्रहालयाचे काम हाती घेऊ. सदर संग्रहालयासाठी १५००० चौरस फुट इतकी जागा निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये काही क्रिकेट वस्तू या आमच्या तर काही या ब्लेड्स ऑफ ग्लोरी या संग्रहालयातील असतील”, असे ठाकूर म्हणाले.



## योधि तायक्वांदो अकॅडमी चा ब्लॅक बेल्ट वितरण सोहळा संपन्न

**पुणे :** पुण्यातील योधि तायक्वांदो अकॅडमी तर्फे डॉ. शामराव कलमाडी प्रशालेत ब्लॅक बेल्ट वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमा साठी प्रमुख पाहुणे म्हणून कावेरी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट चे अध्यक्ष कुशल हेगडे आणि ७वा डॅन ब्लॅक बेल्ट ग्रँडमास्टर परवेझ खान उपस्थित होते. या ब्लॅक बेल्ट वितरण सोहळ्या मध्ये एकूण ६२ विद्यार्थ्यांना ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आले. या मधे १ला डॅन ब्लॅक बेल्ट ३७ विद्यार्थ्यांना, २रा डॅन ब्लॅक बेल्ट १९ विद्यार्थ्यांना, ३रा डॅन ब्लॅक बेल्ट ४ विद्यार्थ्यांना आणि ४था डॅन ब्लॅक बेल्ट २ विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना मास्टर राजेश पुजारी यांच्या सह सुवर्णा जोगळेकर, स्मिता सावर्डेकर आणि योगेश ठीक यांच्याकडून प्रशिक्षण लाभले. मास्टर राजेश पुजारी यांच्या मार्गदर्शना खाली ४०० हून अधिक विद्यार्थ्यांना आतापर्यंत ब्लॅक बेल्ट मिळाले आहेत. नुकतेच साऊथ कोरिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांचे सत्कारही या समारंभात करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये योधि तायक्वांदो अकॅडमीचे अध्यक्ष नरेंद्र निकम, सचिव राजेश पुजारी, खजिनदार केतकी पुजारी आणि सदस्य चंद्रकांत हरकुडे, संतोष शिंदे, दीपक पाटील, वैभव गायकवाड, शशिकांत बोराडे, रवी आठवले, अरविंद साळवे, राहुल भवल, कौस्तुभ मुंगसे, अंजली लोकरे आणि रोहित पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेदिका पुजारी आणि श्रीया केळकर यांनी केले तर आभार प्रदर्शन केतकी पुजारी यांनी केले.

## शाकिबला बांगलादेशात जायची वाटतेय भीती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशाचा दिग्गज अष्टपैलू खेळाडू शाकिब अल हसन याने कसोटी फॉरमॅटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. घरच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मीरपूर येथे होणारी कसोटी लढत ही शेवटची असल्याचे आज त्याने जाहीर केले. पण, त्याला बांगलादेशमध्ये जाण्याची भीती वाटत आहे आणि त्यामुळे ग्रीन पार्क कसोटी ही त्याच्या कारकीर्दितील शेवटची कसोटी ठरू शकते.

शाकिब अल हसनने ७० कसोटी सामन्यांत ४६०० धावा केल्या आहेत आणि २४२ विकेट्स त्याच्या नावावर आहेत. ट्वेंटी-२०त त्याने १२९ आंतरराष्ट्रीय सामन्यांत २५५१ धावा केल्या आहेत आणि १४९ विकेट्स आहेत. वन डे क्रिकेटमध्ये २४७ सामन्यांत ७५७० धावा व ३१७ विकेट्स त्याच्या नावावर आहेत.



"दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी मालिका खेळल्यानंतर बांगलादेश क्रिकेट संघटनेने मला परदेशात जाण्यासाठी सुरक्षित मार्ग दिल्यास मी तेथे खेळेन, कारण तेथील परिस्थिती वेगळी आहे. तसे झाले नाही तर तिथे जाणे अवघड आहे," असे शाकिबने सांगितले.

शाकिब हा माजी पंतप्रधान शेख हसिना यांच्या पक्षाचा खासदार राहिला आहे. बांगलादेशमध्ये सध्या काळजीवाहू सरकार आहे आणि शाकिबवर या सरकारने गुन्हे दाखल केले आहेत. अशा परिस्थितीत बांगलादेशात पोहोचताच त्यांना अटक होण्याची भीती आहे.

### कोणाला संधी मिळणार कुलदीप की अक्षर

**नवी दिल्ली :** भारत आणि बांगलादेश यांच्यातील कसोटी मालिकेतील दुसरा सामना उद्यापासून कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. दोन सामन्यांच्या मालिकेत भारत १-० ने आघाडीवर आहे. ग्रीन पार्कमध्ये वेगवान गोलंदाजांपेक्षा फिरकीपटूंना जास्त विकेट मिळाल्या आहेत. याचा विचार करता भारतीय संघ ३ फिरकीपटूंना संधी देऊ शकतो. ३ फिरकीपटू असतील तर कुलदीप यादव किंवा अक्षर पटेल यांना संधी मिळू शकते. कानपूरच्या फलंदाजीत कोणताही बदल होण्याची शक्यता आहे. यामध्ये पाच फलंदाज आणि एका यष्टीरक्षकाला संधी मिळणार आहे. विराट कोहली, केएल राहुल आणि यष्टिरक्षक ऋषभ पंत यांसारखे वरिष्ठ खेळाडू कसोटी संघात परतले आहेत. पंतने पहिल्या कसोटीच्या दुसऱ्या डावात शतक झळकावून शानदार पुनरागमन केले. रोहित शर्मा, यशस्वी जैस्वाल आणि शुभमन गिल हे टॉप-३ स्थानांवर खेळतील हे निश्चित आहे. टॉप-६ फलंदाजांनंतर टीम इंडिया रवींद्र जडेजा आणि रविचंद्रन अश्विन यांच्या रूपाने दोन वरिष्ठ फिरकी गोलंदाजी अष्टपैलू खेळाडूंना संधी देईल,

### १६ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत

## १५० हुन अधिक खेळाडू सहभागी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या वतीने आयोजित एमएसएलटीए शेपिंग फाऊंडेशन पुणे पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १६ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत देशभरांतून १५० हुन अधिक खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा २८ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत म्हाळुंगे बालेवाडी येथील टेनिस संकुलात पार पडणार आहे.

स्पर्धेचे संचालक गौरव चतुर यांनी सांगितले कि, स्पर्धेत महाराष्ट्र, तेलंगणा, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, दिल्ली, मध्यप्रदेश, हरयाणा, पश्चिम बंगाल, केरळ, आसाम, उत्तातरप्रदेश या ठिकाणांहून १५० हुन अधिक खेळाडू झुंजणार आहेत.

ही स्पर्धा १६वर्षाखालील मुले व मुलींच्या एकेरी गटात होणार आहे. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्याा करंडक व प्रशस्तिपत्राक अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी आयटीएफ व्हाईट बॅच रेफ्री वैशाली शेकटकर यांची निवड करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

खेळाडूंची मानांकन यादी खालीलप्रमाणे:

मुले:१.वरद पोळ (महा), २.सार्थक गायकवाड (महा), ३. आराध्या म्हसदे (महा), ४.अहान शेट्टी (महा), ५.सक्षम भन्साळी(महा), ६.विश्वजीत सणस (महा), ७.आदित्या अरुण (महा), ८.नील केळकर (महा);

मुली: १.स्वानिका रॉय(महा), २.तनिष्का भटनागर(छत्तातीसगढ), ३.रिया पुडियोक्काडा(कर्नाटक), ४.काव्या देशमुख(महा), ५. सना शेष राजन(कर्नाटक), ६.अदिती खानापुरी(कर्नाटक), ७. रिशीता पाटील(महा), ८.सान्वी मिश्रा(महा).



## हर्षल पवारच्या गोलंदाजीमुळे योगेश इलेव्हनचा सहज विजय !

**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित तिसऱ्या ‘स्पोटर्सफिल्ड मान्सुन लीग’ अजिंक्यपद १४ वर्षाखालील ३०-३० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत हर्षल पवार याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर योगेश इलेव्हन संघाने मेट्रो क्रिकेट अॅकॅडमीचा ४ गडी राखून पराभव केला. सातारा रोड येथील टेंभेकर फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या मेट्रो क्रिकेट अॅकॅडमीचा डाव ८७ धावांवर गडगडला. हर्षल पवार याने १५ धावात ६ गडी बाद करताना मेट्रो संघाच्या फलंदाजीला खिंडार पाडले. आरूष कुमार याने ३३ धावांची खेळी केली. हे लक्ष्य योगेश इलेव्हनने १७.१ षटकात व ६ गडी गमावून पूर्ण केले. अव्दिका एस. हिने ४२ धावांची तर, आदित्य शिंदे याने नाबाद १३ धावांची खेळी करून संघाला सहज विजय मिळवून दिला. योगेश संघाचा स्पर्धेतील हा पाचवा विजय ठरला.

## पंतप्रधानांची सुवर्णवीरांशी भेट

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णकमाई करणाऱ्या भारताच्या पुरुष आणि महिला संघांतील खेळाडूंची बुधवारी आपल्या निवासस्थानी भेट घेतली. भारताने इतिहास घडवताना प्रतिष्ठेच्या ऑलिम्पियाड स्पर्धेत प्रथमच सुवर्णपदक पटकावले. रविवारी झालेल्या अखेरच्या फेरीत भारतीय पुरुष संघाने स्लोव्हेनिया, तर महिला संघाने अझरबैजानचा पराभव करत सुवर्णयश संपादन केले. पुरुष संघात डी. गुकेश, आर. प्रज्ञानंद, अर्जुन एरिगेसी, नाशिककर विदित गुजराथी आणि पेंटाला हरिकृष्णा यांचा समावेश होता. महिला संघात द्रोणावल्ली हरिका, आर. वैशाली, नागपूरची दिव्या देशमुख, वंतिका अग्रवाल आणि तानिया सचदेव या खेळाडू होत्या. हरिकृष्णा भेटीसाठी उपस्थित राहू शकला नाही. अन्य सर्व खेळाडूंसह प्रशिक्षक श्रीनाथ नारायणन (पुरुष संघ) आणि अभिजित कुंटे (महिला संघ) यांच्याशी मोदी यांनी भेट घेतली. मोदी यांनी या सुवर्णवीरांशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी प्रत्येकाबरोबर छायाचित्रही काढले. या खेळाडूंनी मिळून पंतप्रधानांना बुद्धिबळाचा पट (चेस बोर्ड) भेट दिला. यावर प्रज्ञानंद आणि एरिगेसी यांच्यात झटपट लढत झाली, जी मोदी यांनी या दोघांच्या शेजारीच उभी राहून पाहिली. अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाने (एआयसीएफ) ऑलिम्पियाड विजेत्या संघांना ३.२ कोटी रुपयांचे रोख पारितोषिक जाहीर केले आहे.

### लोयोला फुटबॉल चषक २०२४; १२ वर्षांखालील गटात ३-२ असा निसटता विजय

# सेंट पॅट्रिक्सने जे. एन. पेटिटला क्लीन स्वीपपासून रोखले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** असद शेखच्या दोन गोलच्या जोरावर सेंट पॅट्रिक स्कूलने १२ वर्षांखालील गटात जे. एन. पेटिट टेक्निकल हायस्कूलवर ३-२ अशी निसटती मात करताना टाटा संचालित लोयोला फुटबॉल चषक २०२४ मध्ये दिवसातील तिसऱ्या विजयापासून रोखले.

टाटा ऑटोकॉम्प संचालित लोयोला एचएस मैदान, पाषाण येथे सुरू असलेल्या फुटबॉल स्पर्धेमध्ये



मंगळवारी दिवसातील शेवटच्या सामन्यात, व्हिन्सेंट पुट्टूने (११') सेंट पॅट्रिक स्कूलला जे.एन. पेटिट टेक्निकल हायस्कूलविरुद्ध आघाडी मिळवून दिली.

तथापि, सेंट पॅट्रिक्स हायस्कूलसाठी आघाडीचा आनंद अल्पकाळ टिकला. ओंकार बर्गे (१६') आणि सिद्धांत वाघमारेने (२७') जे. एन. पेटिट टेक्निकल हायस्कूलला २-१ असे आघाडीवर नेले.

मध्यंतरानंतर, असद शेखने ( ३१') सेंट पॅट्रिक्स स्कूलला २-२ अशी बरोबरी साधून दिली. त्यानंतर तय्यानेच ४१व्या मिनिटाला पेनल्टी-किकचे गोलमध्ये रूपांतर करताना सेंट पॅट्रिक स्कूलला ३-२ असा विजय मिळवून दिला.

१४ वर्षांखालील विभागात, युग चौहानचे (१३', २७', ५०') तीन आणि ऋग्वेद घुलेचा (४३' पेनल्टी) एक गोल सेंट पॅट्रिक्स स्कूलला ४-० असा विजय मिळवून देण्यासाठी पुरेसा ठरला.

पहिल्या सामन्यात, १६ वर्षांखालील गटात जेएन पेटिट टेक्निकल हायस्कूलने सेंट पॅट्रिक स्कूलचा ५-१ असा पराभव केला. तनिष्क नदेशनचे (८', ४४') दोन आणि नैतिक पांडे (१२'), मानव भालेकर (२५') आणि सिद्धांत साळुंखेचा (३५') प्रत्येकी गोल निर्णायक ठरला. सेंट पॅट्रिक स्कूलकडून एकमेव गोल ऑस्टिन हॉस्पेटने (१६') केला.

### टेबल टेनिस स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशन ऑफ संभाजीनगरच्या टेबल टेनिस स्पर्धेमध्ये

# नैशा रेवसकर हिला दुहेरी मुकुट; शौरेन सोमणचे सनसनाटी विजेतेपद



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याची राष्ट्रीय खेळाडू नैशा रेवसकर हिने तिसऱ्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील अनुक्रमे १५ व १७ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट मिळविला. मुलांच्या सतरा वर्षाखालील गटात पुण्याच्या शौरेन सोमण यानेही विजेतेपद मिळवित सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला.

टेबल टेनिस स्पोर्ट्स वेल्फेअर असोसिएशन ऑफ संभाजीनगर यांनी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात संभाजीनगर जिल्हा टेबल टेनिस संघटना आणि महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

मुलींच्या पंधरा वर्षाखालील गटात रेवसकर हिने अंतिम फेरीत नाशिकची द्वितीय मानांकित खेळाडू स्वरा करमरकर हिचा पराभव करीत आपले अग्रमानांकन सार्थ ठरविले. हा सामना तिने ११-९,११-४, १३-११ असा सरळ तीन गेम्स मध्ये जिंकताना काउंटर अटॅक पद्धतीचा बहारदार खेळ केला.

पाठोपाठ सतरा वर्षाखालील गटाच्या अंतिम फेरीत तिने ठाण्याची पाचवी मानांकित खेळाडू रितिका माथुर हिचे आव्हान ९-११,११-७, ११-४,११-५ असे परतविले. पहिली गेम गमावल्यानंतर तिने सर्व्हिस व परतीचे फटके याच्यावर नियंत्रण ठेवीत विजय मिळविला. ती नीरज होनप यांच्या मार्गदर्शनाखाली एम्स अकादमीत प्रशिक्षण घेत आहे. हिमाचल प्रदेश मध्ये नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय मानांकन स्पर्धेत तिने रौप्य पदक जिंकले होते.

मुलांच्या सतरा वर्षाखालील गटात सोमण याने अंतिम फेरीत अग्रमानांकित खेळाडू पार्थ मगर (मुंबई महानगर जिल्हा) याला पराभवाचा धक्का दिला. मात्र हा सामना जिंकताना त्याला खूपच संघर्ष करावा लागला. चुरशीने झालेला हा सामना त्याने ११-८,११-७,११-७,१०-१२,१२-१० असा जिंकला. सोमण हा नीरज होनप यांच्या मार्गदर्शनाखाली एम्स अकादमीत प्रशिक्षण घेत आहे.

मुलांच्या पंधरा वर्षाखालील गटात ठाण्याचा द्वितीय मानांकित खेळाडू मयुरेश सावंत याला विजेतेपद मिळाले अंतिम सामन्यात त्याने आपला सहकारी व अग्रमानांकित खेळाडू नीलय पाटेकर याचा ८-११,११-९, ११-४,७-११,११-७ असा पराभव केला. त्याने अष्टपैलू खेळाचा प्रत्यय घडविला.

#रा